त्रैमासिक

# आरंभ

जून जुलै ऑगस्ट 2019

(वर्ष दुसरे, एकूण अंक 11 वा)

बुक स्ट्रक आणि अर्थ मराठी

यांचा संयुक्त उपक्रम





## आरंभ टीम

**संस्थापक:** अभिषेक ठमके

**संपादक:** निमिष सोनार

**सह-संपादक:** सविता कारंजकर

**कार्यकारी संपादक:** आशिष कर्ले

**व्यवस्थापकीय संपादक:** सिद्धेश प्रभुगावकर

**प्रुफ रीडर:** मीना झाल्टे / विश्वास पाटील

**व्यंगचित्र विभाग:** सिद्धेश देवधर

**टेक्निकल विभाग:** सिद्धेश प्रभुगावकर

**सल्लागार:** अक्षर प्रभू देसाई, गौरी ठमके, अभिषेक ठमके

**कव्हर डिझाईन (जून):** निमिष सोनार

**कंटेंट ऑर्गनायझर:** निमिष सोनार

**ईमेल:** aarambhmasik@gmail.com

**फेसबुक पेज:** https://www.facebook.com/aarambhmagazine

**बुक स्ट्रक:** https://www.facebook.com/groups/bookstruck/

**वाचनस्तु: एक वाचन चळवळ:** https://www.facebook.com/vachanastu/

**सूचना:** लेखकाला डायरेक्ट त्याच्या ईमेल आयडीवर लेख आवडल्याची प्रतिक्रिया द्यायची असल्यास त्याच मेलच्या CC मध्ये आरंभ मासिकाचा ईमेल आयडी सुद्धा असावा.

अंक आवडल्यास गुगल प्ले स्टोर वर 5 स्टार रेटिंग द्यायला विसरू नका: https://play.google.com/store/apps/details?id=com.marathi.magazine.aarambh

या अंकासाठी कुणाला स्वयंसेवक म्हणून काम करायचे असल्यास ईमेल आयडी वर संपर्क साधावा.

**(या अंकात जाहिरात द्यायची असल्यास आरंभ च्या ईमेल आयडी वर संपर्क/चौकशी करावी.)**

**महत्वाची सूचना:** या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेल्या प्रत्येक मताशी आरंभ टीम आणि संपादक सहमत असतीलच असे नाही.

📖 ⌘ ✶

( आरंभ त्रैमासिक असल्याने पुढील अंक सप्टेंबर महिन्यात प्रकाशित होईल याची नोंद घ्यावी)

# आरंभ अनुक्रमणिका (जून जुलै ऑगस्ट 2019)


आरंभ टीम ........ 2
संपादकीय (जून 2019) ........ 5
आई नावाचं विद्यापीठ - अविनाश हळबे........ 7
केविन फायगी – अभिषेक ठमके ........ 11
मोहुनिया तुजसंगे - हेमंत बेटावदकर ........ 14
दादामामा: एक प्रसन्न व्यक्तिमत्व- किरण दहीवदकर........ 16
फॅमिली फार्मसिस्ट - आशिष कर्ले. ........ 20
आमच्या वेळेस असं होतं? - निमिष सोनार ........ 21
दुष्काळ: महाराष्ट्राची एक शोकांतिका - मयुर बागुल ........ 23
स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारी! - विक्रम अरने. ........ 25
मार्कंडा महादेव मंदिर, गडचिरोली - प्रतिक पुरकर........ 28
नाशिकची त्रिरश्मी लेणी - अजित मुठे ........ 30
आफ्रीका आणि यु.ए.ई ! - अविनाश लोंढे ........ 35
पुलवामा हल्ला- अक्षता दिवटे ........ 41
माहेरची चैत्रगौर - श्रेया गोलिवडेकर ........ 43
रजोनिवृती - अभिलाषा देशपांडे ........ 45
छत्री दिसलीच पाहिजे - भरत उपासनी........ 46
कथा: अद्वैत - सविता कारंजकर........ 48
कथा :प्रेमात पडताना) भाग 1)- सत्यजीत भारत........ 57
बाल कथा: ते दोन अद्वितीय - लेहिनी नायर, मलेशिया........ 60
शनि ग्रहाचे महत्व – मंजुषा सोनार........ 63
त्या रात्री मला कोण बरे भेटले? – प्रभाकर पटवर्धन ........ 64
कुठे असेल नागी? - सारिका उबाळे........ 67
असावे घरकुल आपुले छान - भरत उपासनी........ 69
आमची आजी म्हणायची! - श्रेया गोलिवडेकर ........ 71
एक वात्सल्यपूर्ण पिता - प्रिया निकुम........ 72
सात लघु लेख - अभिलाषा देशपांडे ........ 74
कविता :गरिबीतील जीवन - सुवर्णा कांबळे........ 77
कविता :पोरी पदर तुझा सावर - सुवर्णा कांबळे ........ 78

कविता : तू जीवनात आला आणि असं वाटलं - प्रिया निकुम ........ 79
कविता संग्रह: शारदेय(भाग1)- कपिल नवले ........ 82
चारोळी: दर्शन - सिद्धेश प्रभुगावकर ........ 84
फिल्मी गॉगल: चोरीचा मामला - निमिष सोनार ........ 85
एक विचार :पाकीट - उदय जडिये ........ 88
एक विचारउदय जडिये - वाढदिवस : ........ 88
ग्राफिटी :अविनाश हळबे ........ 89
व्यंगचित्रे :सिद्धेश देवधर ........ 90
त्रिरश्मी लेणी : फोटोग्राफ्स ........ 93

(आरंभ त्रैमासिक असल्याने पुढील अंक सप्टेंबर महिन्यात प्रकाशित होईल याची नोंद घ्यावी)

या अंकात साहित्य आणि कला मिळून एकूण 35 items आहेत.

## संपादकीय (जून 2019)

आरंभचा पहिला त्रैमासिक अंक (जून) आपल्यासमोर सादर करताना मला आनंद होत आहे. ठरल्याप्रमाणे 1 जून या तारखेला अंक काही अपरिहार्य कारणास्तव प्रकाशित होऊ शकला नसला तरी वाचकांना काही फार जास्त काळ वाट बघावी लागली नाही, यात आनंद!

आरंभ मासिकाचे त्रैमासिक करण्यामागे काही कारणे आहेत.

आरंभ टीम ही आपापला व्यवसाय नोकरी सांभाळून या मासिकासाठी काम करत असते (आणि वाचकांना आश्चर्य वाटेल की आजवर आम्ही आरंभ टीम सदस्य एखादा अपवाद वगळता एकमेकांशी प्रत्यक्ष कधीही भेटलेलो नाही) आणि दुसरे म्हणजे या अंकासाठी लिहिणारे नवोदित आणि प्रस्थापित लेखक हे सुध्दा आपापल्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून कोणतेही मानधन न घेता लिखाण करायला वेळ देतात.

शेवटी मोफत मासिक तेही कोणत्याच जाहिराती न छापता नियमितपणे चालवणं म्हणजे थोडी तारेवरची कसरत आहे, नाही का?

तरीही हे सगळं आम्ही सर्वजण का करतोय?

तर एक सामाजिक बांधिलकी म्हणून!

मराठी भाषा आणि वाचनसंस्कृती वाढावी म्हणून!

नवोदित लेखकांना संधी द्यावी म्हणून!

त्यांचे लिखाण हजारो वाचकांपर्यंत पोहोचावे म्हणून!

प्रस्थापित लेखकांचे नवनवीन विचार आपणा सर्वांना मार्गदर्शक ठरतात म्हणून!

लिखाणातून वैचारिक बदल घडावा म्हणून!

वैचारिक बदलासोबतच थोडा विरंगुळा आणि मनोरंजन हे हेतू सुद्धा साध्य व्हावे म्हणून!

अनेक वाचकांच्या मागणीनुसार यापुढील अंकांमध्ये विनोदात्मक लिखाण सुद्धा जास्तीत जास्त प्रमाणात अंतर्भूत करण्याचा आमचा प्रयत्न राहील! सध्या प्रत्येक अंकात व्यंगचित्रे तर असतातच!

तसेच आम्ही कलादालन सुध्दा या मासिकात खुले केलेले आहे. फक्त साहित्यिक लिखाणच नाही, तर कोणतीही कला तुमच्या अंगी असेल तर या मासिकात तुम्हाला नक्की स्थान मिळेल!

2018 च्या जानेवारी महिन्यापासून सुरू झालेल्या या मासिकाला पहिल्या अंकापासून वाचकांचे आणि लेखकांचे उदंड प्रेम मिळाले आणि ते उत्तरोत्तर वाढत गेले. त्यामुळे अंकाचा दर्जा आणखी वाढवत नेण्याच्या उद्देशाने आरंभ टीमने मासिका ऐवजी त्रैमासिक काढण्याचा निर्णय घेतला. म्हणजे आरंभ मासिक आता जून, सप्टेंबर, डिसेंबर आणि मार्च या चार महिन्यांत म्हणजे वर्षातून फक्त चार वेळा प्रकाशित होईल.

म्हणजे एका वर्षात चारच अंक काढायचे पण प्रत्येक अंक हा सर्व प्रकारच्या कला आणि साहित्याचा एक दर्जेदार आणि मनात तसेच हृदयात जतन करून ठेवण्याजोगा खजिना आणि नजराणा असेल हे मात्र नक्की! जणू काही प्रत्येक

त्रैमासिक अंक हा एक दिवाळी अंकच असेल! किंबहुना त्यापेक्षाही खूप काही जास्त असेल. या जून अंकात भारतातीलच नव्हे तर परदेशातील मराठी लेखकांनी सुद्धा लेख लिहिले आहेत.

या अंकापासून आरंभ मासिक हे विशिष्ट विषय मुक्त झाले आहे म्हणजे प्रत्येक अंकाला आता ठराविक विषय असणार नाही. म्हणजे या अंकात कोणत्याही विषयावर आधारित सर्व प्रकारचे साहित्य प्रकार आणि कला प्रकार समाविष्ट झालेले तुम्हाला दिसतील.

आरंभ मासिकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही लेखाला, कथेला आम्ही शब्दमर्यादिचे बंधन घालत नाही, कारण सृजनशीलतेला बंधनात अडकवले तर ती नीट तिच्या संपूर्ण रूपात प्रसव पावू शकत नाही असे आरंभ टीमला वाटते.

जानेवारी आणि फेब्रुवारी च्या दोन्ही प्रवासवर्णन विशेषांकाप्रमाणेच या जून अंकाला सुद्धा वाचकांचा भरघोस प्रतिसाद लाभेल अशी आशा बाळगून मी हे संपादकीय येथे थांबवत आहे!!

टीप: अंकाला आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी जर कुणा वाचकाला अंकासाठी स्वेच्छेने आर्थिक मदत करायची असल्यास तसेच यापुढील अंकात जाहिराती द्यायच्या असतील, तसेच अंकासाठी आरंभ टीम ला मदत करायची असेल तर खाली दिलेल्या ईमेल आयडी वर संपर्क साधावा.

**निमिष सोनार, संपादक (आरंभ)**

aarambhmasik@gmail.com

📖 ⌘ ✶

## आई नावाचं विद्यापीठ - अविनाश हळबे

आई! दोन अक्षरांनी बनलेला एक शब्द. भाषा, धर्म, रूढीनुसार तिला अनेक संबोधने वापरली जातात.

ती सुक्षिक्षित-अशिक्षित-अल्पशिक्षित कशीही असू शकते. इतकेच नव्हे तर ती जलचर, भूचर, खेचर (आकाशातील) या वर्गातील अगदी किडामुंगी पासून महाकाय हत्तीच्या रूपातही असू शकते. हिंस्त्र प्राणीही याला अपवाद नाहीत. असे असले तरी काही गुण तिच्यात जन्मजात असतात. ते म्हणजे आपल्या अपत्याबद्दलचे वात्सल्य, त्याचे पालनपोषण आणि संरक्षण करणे, त्याला मूलभूत अशा काही गोष्टींचे ज्ञान देवून जगासमोर उभा करणे, वगैरे. कोणत्याही सस्तन प्राण्याच्या नवजात अर्भकाला जन्मल्याबरोबर भूक लागते. त्यासाठी त्याला लागणारे दूध आईच्या स्तनात जेमतेम तासाभरात तयार होते आणि ते अर्भक पिऊही लागते. सर्व सजीव प्राणीमात्रांत अवयव, त्वचा, अस्थी, केस इत्यादी गोष्टी एकाच्या दुसऱ्याला चालत नाहीत. मानवाच्या बाबतीत तर रक्तगट जुळल्याशिवाय एकाचे रक्त दुसऱ्याला चालत नाही. परंतु यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे आईचे दूध मात्र सर्वत्र चालते! मानवी अर्भकाला काही कारणाने आईचे दूध मिळू शकत नसेल तर त्याला इतर प्राण्याचे उदा. गाय अथवा शेळीचे दूध पाजतात.

पुराणात आईच्या दुधाला वंचित झालेल्या उपमन्यूची कथा आली आहे. त्याने तपश्चर्या केल्यावर परमेश्वराने त्याला क्षीरसागर म्हणजे दूधाचा समुद्र बहाल केला असे सांगितले जाते. पृथ्वीतलावरच्या सर्व सस्तन प्राण्यांच्या मातांकडे असलेले दूध म्हणजे क्षीरसागरच नव्हे कां?

परमेश्वराने उपमन्यूला क्षीरसागर बहाल केला म्हणजे - आईच दूध मिळत नसेल तर इतर प्राणीमातांचे दूध तू पिऊ शकतोस असे वरदान दिले. म्हणजे एका अर्थाने क्षीरसागरच दिला अशी उपपत्ती सहज लावता येते.

आईच्या ठिकाणी असलेला आणखी महत्वाचे गुण म्हणजे सखोल मार्गदर्शन आणि अचूक निर्णयक्षमता. या बाबतीत महाभारतातील पांडवांचे उदाहरण अत्यंत बोलके आहे. वास्तविक कौरव संख्येने शंभर आणि साधनसामुग्रीनेही वरचढ. तर पांडव संख्येने फक्त पाच आणि साधनसामुग्रीच्या बाबतीतही नगण्य. परंतू पांडव नेहमीच कौरवांना पुरून उरत. इतकेच काय तर शेवटच्या महाभारत युद्धात सर्वच्या सर्व कौरव मारले गेले पण पाचही पांडव जिवंत तर राहिले. याचे महत्वाचे कारण म्हणजे पांडव प्रत्येक गोष्ट आपल्या आईच्या सल्ल्यानुसार करत आणि तिचा निर्णय अंतिम समजून त्यानुसार वागत. याउलट कौरव आईच काय तर भगवान श्रीकृष्णालाही जुमानित नसत.

युद्धानंतर पांडवांचा जवळजवळ निर्वंश करणाऱ्या अश्वत्थाम्याला पकडून आणल्यानंतर, त्याला काय शिक्षा द्यायची हेसुद्धा पांडवांनी कुंतीला विचारले. आपल्या कुळाचा निर्वंश करणाऱ्याला कोण सोडेल? परंतु कुंतीने मात्र अश्वत्थामा गुरूपुत्र आहे म्हणून अवध्य आहे असे सांगून त्याला जिवंत सोडून द्यायला सांगितले. आणि पांडवांनी आपल्या आईचा निर्णय मानला.

शिवछत्रपतीही नेहमी आपल्या आईच्या सल्ल्यानेच वागत ही गोष्ट सर्वश्रुत आहेच. शिकागोच्या धर्मपरिषदेची माहिती कळल्यावर, अनेक जाणकारांनी स्वामी विवेकानंदांना तुम्ही त्यासाठी तिकडे जावे असे आग्रहपूर्वक सुचविले. परंतु स्वामीजींनी मातृतुल्य शारदामाता यांची परवानगी मिळाल्याशिवाय जायचे नाही असे ठरविले. याविषयीच्या पत्रव्यवहारात बराच काळ गेला. परंतु शारदामाता यांची परवानगी आणि आशीर्वाद मिळाल्यावच त्यांनी अमेरिकेकडे प्रस्थान ठेवले आणि विश्वविजयी होऊन परत आले! ही गोष्ट आईची महती आणखी अधोरेखित करते.

या जगात पदार्पण केल्यावर आपला पहिला गुरू म्हणजे आपली आई असते. आपण साधारणपणे 6 वर्षाचे होईपर्यंत, आपल्याला जगण्यासाठी लागणा-या प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आणि मार्गदर्शन आईकडूनच मिळते. परंतु हे सर्व करता करता हीच आई आपल्याला अचानक आपल्या भावी जीवनाचे सूत्र आणि सारही सांगून जाते.

काही वर्षापूर्वी एका वर्तमानपत्रात ‘माझी आई’ नावाचे एक सदर रविवारच्या पुरवणीत येत होते. या सदरात अनेकांनी आपले अनुभव लिहीले होते. एक अनुभव न विसरण्यासारखा होता. अनुभवलेखिका जेमतेम दहाबारा वर्षांची असताना, तिची आई रोज सकाळी सडा संमार्जन करून, तुळशीवृंदावनासमोर ठिपक्यांची रांगोळी काढायची.

एक दिवस मुलीने विचारलं “हे काय गं आई, तू नेहमी टिपक्यांची रांगोळी का काढतेस? डिझाईनची का नाही काढत?' त्यावेळी आईने उत्तर दिलं ‘मुली, अगं असे टिपके टिपके जोडूनच संसाराची रांगोळी फुलवायची असते!'.

एका वाक्यात आईने आपल्या मुलीला उभा संसार सुफळ संपूर्ण कसा करावा हे सांगितलं. थोडा विचार केला तर यात किती गहन अर्थ भरला आहे हे आपल्याला समजेल. हे ठिपके घरातील माणसांचे असतील, इतर नातेवाईकांचे असतील, त्यांच्या गुणावगुणांचे असतील, समज गैरसमजांचे असतील, अर्थिक किंवा इतर समस्येचेही असतील. परंतु, जी स्त्री हे सगळे ठिपके न थकता, न थांबता, न टाळता, वेळचेवेळी व्यवस्थित जोडू शकते, तिचा संसार उत्तम रीतीने फुलतो. जी जोडू शकत नाही, तिचा संसार अधुराच राहतो.

लेखिकेची आई जेमतेम दुसरीपर्यंत शिकलेली होती.परंतु, एखाद्या तत्वज्ञानी माणसाला शोभेल असं ज्ञान देणारी आई, शिकलेली असली तर उत्तमच, परंतु नसली तरी आपल्या मुलांना किती सुंदर मार्गदर्शन करते, हे यातून दिसतं. बालपण आठवलं तर आपल्यापैकी प्रत्येकाला आईने जीवनाविषयीचे काही ना काही मार्गदर्शन केल्याचं आठवेल.

मी आठ-दहा वर्षाचा असताना, पुण्यात घराजवळच्या श्री जंगलीमहाराज मंदिरात जात असे. दिवाळीच्या दिवसात एकदा मला तिथे कचऱ्यात पडलेली जाड उदबत्ती दिसली. क्षणार्धात माझे डोळे आनंदाने चमकले! कारण मोठे फटाके पेटवायला अशा जाड उदबत्या फार उपयोगी असतात. मी चटकन ती उदबत्ती कचऱ्यातून उचलली आणि घरी येऊन तिने अंगणात फटाके उडवायला सुरूवात केली. या जाड उदबत्तीने माझे फटाके पटापट पेटत होते. मी पळत घरात गेलो आणि माझी ही नवी मजा दाखवायला आईला बाहेर घेऊन आलो. पहिला फटाका पेटवतानाच आईचे लक्ष त्या उदबत्तीकडे गेले.

‘अवि कुठून आणलीस रे ही उदबत्ती? आपल्याकडे तर इतकी जाड उदबत्ती नाही.' - आई.

मी समुद्रमंथनातून देवांनी मिळवलेल्या अमृताची गोष्ट सांगावी अशा थाटात त्या उदबत्तीच्या प्राप्तीची हकिगत सांगितली.

‘म्हणजे ही उदबत्ती तू जंगलीमहाराजांच्या देवळातून चोरून आणलीस?' आईने रागावून विचारले.

‘अग, चोरून कशाला आणिन? कचऱ्यात पडली होती म्हणून मी फटाके पेटवायला ती उचलून आणली.' मी काहीसा गडबडून म्हणालो.

‘ती घेण्यापूर्वी कुणाला विचारलेस?' - आई.

‘नाही.' - मी.

‘मग ती चोरीच झाली!' - आई

‘अगं पण आई, मी देवस्थानाच्या मालकीची कोणतीही किंमती वस्तू उचलली नाही. कचऱ्यात पडलेली उदबत्ती घेतली मी तर ती चोरी कशी होईल?' मी रडवेला होऊन म्हणालो.

‘वेडा आहेस ! जगातल्या प्रत्येक गोष्टीला किंमत असते. मग ती कचऱ्यातील वस्तू असो किंवा हिरा असो. आणि ही उदबत्ती देवळातल्या कचऱ्यात आहे. जंगलीमहाराजांच्या मालकीची आहे. ती कुणाला न विचारता घेणे म्हणजे ती चोरीच आहे.

आज तुला देवळातल्या कचऱ्यातली उदबत्ती उचलाविशी वाटली. उद्या देवासमोरचे पैसे - वस्तू उचलायची बुध्दी होईल. मुकाटयाने ती उदबत्ती विझव आणि देवळात होती तिथे ती ठेवून ये’ आई माझा कान पिळत चढ्‌या आवाजात म्हणाली.

मी ती उदबत्ती विझवली आणि देवळात होती तिथे नेऊन ठेवली. यातून माझी चिडचिड झाली होती, पण ती शांत झाल्यावर आईने सांगितलेला विचार या प्रसंगाने मनात मात्र घट्ट बसला. वस्तू देवळातल्या कचऱ्यातील असल्या तरी त्या देवाच्या मालकीच्या असतात. त्या कुणाला न विचारता घेणे म्हणजे ती चोरीच आहे.

पुढे आईने सांगितलेल्या अशा अनेक बोधप्रद गोष्टी माझ्या मनात इतक्या घट्ट बसल्या की पुढील आयुष्यात कोणाकडून कुठलीही वस्तु फुकटात मिळवणे, घेतलेल्या वस्तूचा योग्य तो मोबदला न देणे अथवा सार्वजनिक पैशातून हिशेबात चलाखी करून चार पैसे लाटणे अशी बुध्दी कधीच झाली नाही.

एक दिवस कोणीतरी मला ईशवास्योपनिषदाचे पुस्तक वाचायला दिले.

पहिलीच ऋचा होती - ॐ ईशवास्यमिदंसर्व यत्किंञ्च जगत्यां जगत | तेन त्यक्तेन भुञ्जीथा मागृधाः कस्यस्विध्दनम् ||
म्हणजे या जगातील सर्व गोष्टी ईश्वरनिर्मित आहेत. त्यांचा त्यागपूर्वक उपभोग घ्यावा, पण कोणाच्याही वस्तुचे-धनाचे अपहरण करू नये.

जेमतेम सातवीपर्यंत शिकलेली आणि कोणत्याही वेदपाठशाळेत न जाता, माझी आई तरी वेगळे काय सांगत होती? हे ज्ञान तिला कुठून आले होते?

खेडेगावातल्या आया चुल सारवल्यानंतर ती पेटवताना एक प्रार्थना म्हणतात. ती म्हणजे ‘चुली चुली तू शंभरांचं शिजव. शंभरांचं शिजव अन हजारांना पुरव. हजारांना पुरव पण तुझ्यापाठी हंडाभर उरव!'

वरकरणी अगदी साध्या शब्दात वाटणारी प्रार्थना, त्या माऊलीला केवळ एका कुटुंबाच्या पोषणापुरतीच मर्यादित न ठेवता, समाजासाठी ‘अन्नपूर्णा' होण्याची महत्वाकांक्षा जागवते असे म्हटल्यावाचून रहावणार नाही. कारण ‘हंडाभर उरव' ही मागणी घरातल्या व्यक्तींसाठी नसून अतिथी-अभ्यागत, कोणी भुकेलेला याचक यांच्यासाठी असायची. अशिक्षित असलेल्या या मातेच्या तोंडी ॐ सहनाववतु, सहनौ भुनक्तुं' यासदृष्य अर्थ असलेली प्रार्थना येते. कोणत्याही वेदपाठशाळेत न जाता. हे संस्कृतीचं देणं नाही तर काय?

सकाळच्या सप्तरंग पुरवणीत ‘फिरस्ता' या सदरात लिहितांना सकाळ माध्यम समुहाचे संपादक श्री उत्तम कांबळे यांनी आपल्या भ्रमंतीत अशाच हृद्य मातृकथा सांगितल्या आहेत. उत्तमजी परदेशी जाणार असे कळल्यावर त्यांच्या मित्राच्या आईने ‘वाटेत तुला खर्चासाठी असु देत’ असे म्हणून काही रूपये देऊ केले. उत्तमजींनी संकोचून ‘परदेशात हे चलन चालत नाही' असे सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या माऊलीने ‘अरे आईने दिलेले पैसे जगात कुठेही चालतात!’ असे सांगून त्यांना निरूत्तर केले.

दुसऱ्या एका प्रसंगी एका मित्राच्या आईने जेवताना ताटात काही गोडधोड आग्रहाने वाढले. त्यावेळी उत्तमजींनी ‘मला पथ्य आहे...जास्त खाल्ले तर त्रास होईल’ वगैरे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या मातेने ‘आईच्या हातचं खावून कुणाला कसलाही त्रास होत नाही' असे सांगून आणखी वाढले.

दोन्‌ही गोष्टींच्या बाबतीत सामाजिक व्यवहार्यता आणि आईचा जिव्हाळा यांची तुलना केली तर जिव्हाळ्याचे पारडे जडच रहाणार हे उघड आहे.

काही दिवसांपूर्वी सोशल मिडियावर एक व्हिडिओ क्लिप व्हायरल झाली होती. एका उत्साही प्राणीसंशोधकाने जंगलातील सिंहीणीशी दोस्ती जमवली होती. इतकी की तो जंगलात तिच्या आसपास सहज हिंडे फिरे. एक दिवस तिला

पिल्ले झाली. आता प्रसंग बाका होता. प्राणी आपल्या बछाड्यांचे संरक्षण डोळयात तेल घालून करतात. कोणताही तिऱ्हाईत प्राणी त्यांच्या जवळ आला तर लगेच हल्ला चढवून त्याला ठार मारतात हे तो जाणून होता. खरेतर सिंहीण अशा बाबतीत सिंहालाही आपल्या पिलांजवळ येऊ देत नाही. त्यामुळे या मातेने आपल्याला जरी स्वीकारले असले तरी पिलांजवळ ती आपल्याला जाऊ देईल का याबाबत तो साशंक होता. शेवटी त्याने जिवावर उदार होऊन तेही धाडस केले. पिले तिच्या जवळपास बागडत असताना तो त्यांच्यापासून काही अंतरावर जाऊन शांतपणे बसला. काही मिनिटांत ती पिले जवळ येऊन अजाणता त्याच्या अंगाखांद्यावर चढू लागली. वाघिणीने लांबून ते बघितले पण तिने काहीही हालचाल केली नाही. याचा अर्थ सरळ होता. आपल्याच योनीतल्या आणि त्या बछाडयांचा पिता असलेल्या सिंहावरही विश्वास न ठेवणाऱ्या या मातेने, मानवावर मात्र विश्वास दर्शवला होता! एरवी हिंस्त्र प्राणी समजल्या गेलेल्या सिंहीणीच्या या वात्सल्याला काय म्हणवे?

एकंदरीत सर्व प्राणीमात्रांमधील आईच्या ठिकाणी असणारे जन्मजात गुण, व्यवहारज्ञान, दूरदृष्टी, समयसूचकता, निर्णयक्षमता इत्यादी गोष्टींचा विचार केला तर, आई ही केवळ हाडामासांची एक व्यक्ती नसून, संस्कृती नावाच्या विद्यापिठाची अनाभिषिक्त कुलगुरू असते, असं म्हटलं तर वावगे होणार नाही.

**लेखक:** श्री.अविनाश ब. हळबे, शिवतीर्थनगर, पुणे.

**मोबाईल:** 9011068472

**ईमेल:** avinash.halbe21@gmail.com

***(लेखक टाटा मोटर्स मधील निवृत्त डिव्हिजनल मॅनेजर असून ते लेखक, प्रवचनकार, कथाकथन कार, व्याखाते, भारुड सम्राट आहेत आणि या सर्व क्षेत्रांत त्यांनी अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत)***

📖 ⌘ ✶

## केविन फायगी – अभिषेक ठमके

गेल्या काही वर्षांमध्ये बऱ्याचशा पालकांना जी गोष्ट साधता आली नाही, ती गोष्ट एका सिनेमाने साध्य केली. ती गोष्ट म्हणजे, मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवणे. आणि तो सिनेमा म्हणजे, अवेंजर्स एन्डगेम!

मार्व्हल्स सिनेमॅटिक युनिव्हर्सअंतर्गत गेल्या दहा वर्षांपासून जे सिनेमे प्रदर्शित झाले त्या सिनेमांचा हा शेवटचा सिनेमा होता. प्रेक्षकांमध्ये त्या सिनेमाबाबत उत्कंठा शिगेला पोहोचली होती. सिनेमा प्रदर्शित होण्याआधी बऱ्याचशा चाहत्यांनी आपापल्या पद्धतीने फॅन थेअरी जाहीर केली होती. म्हणजे सिनेमामध्ये पुढे कदाचित असं घडू शकेल अथवा तसं घडू शकेल, किंवा सिनेमांमध्ये सुपरहिरो अशा पद्धतीने योजना तयार करतील आणि सिनेमाचा शेवट असा होईल वगैरे वगैरे. सिनेमा प्रदर्शनाची तारीख जवळ आली आणि सिनेमाचे ट्रेलर आणि इतर व्हिडियो सर्व प्रसारमाध्यमांवर प्रदर्शित होऊ लागले, त्यांना चांगली प्रसिद्धी मिळत होती आणि चाहते सिनेमाची तिकिटे मिळवण्यासाठी धडपडत होते. आपल्या भारतामध्ये देखील मध्यरात्री, पहाटे करत 24 तास सिनेमागृहांमध्ये शो चालवून सर्वच्या सर्व शो हाऊसफुल्ल करणारा हा पहिला सिनेमा ठरला.

सिनेमामध्ये नक्की काय घडतं, अवेंजर्स कसे एकत्र येतात, त्यांचा शेवट कसा होतो अशा प्रत्येक प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना थिएटरमध्ये जाऊनच बघायची होती. यासाठी आपल्याला कोणताही स्पॉईलर (रहस्य भेद) मिळू नये म्हणून मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग सोशल मीडियापासून दूर होता. हे या सिनेमाचं खरं यश. पण तुम्हाला माहित आहे, हे सर्व एका माणसामुळे शक्य झालं. तो म्हणजे केविन फायगी!

आपला एखादा सिनेमा सुपरहिट झाला की बरेचसे निर्माते, दिग्दर्शक त्याचा सिक्वेल काढण्याचा विचार करतात. पण केविन फायगी यांनी मार्व्हल्स सिनेमॅटिक युनिव्हर्सची सूत्रे आपल्या हाती घेतल्यावर सुपरहिरो सिनेमांची मालिका करायचे ठरवले, ज्यापैकी पहिला सिनेमा होता, आयर्न मॅन. पहिल्या सिनेमापासूनच प्रेक्षकांनी हे नवे युनिव्हर्स डोक्यावर घेतले.

केविन फायगी यांनी लोकांचा सुपरहिरोकडे बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून टाकला. त्यांच्या आधी कोणत्याही निर्मात्याने अथवा स्टुडीओने आपले पैसे एवढ्या मोठ्या प्रमाणावर कोणत्याही सुपरहिरो सिनेमावर खर्च केले नव्हते.

मार्व्हलस सिनेमॅटिक युनिव्हर्सचे सर्व सिनेमे हे केविन फायगी यांच्या नियंत्रणाखाली आहेत. आपल्या पुढील सिनेमासाठी कोणता दिग्दर्शक घ्यायचा, कोणते कलाकार घ्यायचे, कोणत्या लेखकाने सिनेमासाठी लिखाण काम करावं हे सर्व केविन फायगी ठरवतात. त्यातच, जो दिग्दर्शक त्यांचे म्हणणे ऐकत नाही, त्यांना ते आपल्या प्रोजेक्टमधून काढून टाकतात. भले त्या दिग्दर्शकाने त्यांना सुपरहिट सिनेमा दिला असो. उदाहरणार्थ, एग्वर्ड रॉड, पेटी जेनकिन्स, एग्वर्ड राईट.

मार्व्हलस सिनेमॅटिक युनिव्हर्सच्या आधी हॉलीवूडमध्ये सर्वात मोठा स्टुडियो म्हणून 'पिक्सार स्टुडियो' ओळखला जात होता. त्यांचा प्रत्येक सिनेमा सुपरहिट होता. जसे, टॉय स्टोरी, कार्स, अप, मॉन्सटर्स, फाइन्डींग निमो. अशा अव्वल स्टुडियोला मागे सोडत मार्व्हलस सिनेमॅटिक युनिव्हर्स अशा उंचीवर पोहोचले, जिथे आजवर कोणतीही सिनेमा कंपनी पोहोचू शकली नाही. एकीकडे ते आपले सिनेमे बनवत होते, तर दुसरीकडे सोनी कंपनी स्पायडर मॅनचा युनिव्हर्स बनवण्याचा प्रयत्न करत होती. पण प्रत्येक वेळी त्यांच्या पदरी अपयश पडत होते. स्पायडर मॅनचा एक सिनेमा सुपरहिट झाला की पुढील सिनेमा दणकून आपटायचा किंवा त्याला म्हणावे तसे यश मिळत नव्हते. डीसी सिनेमाच्या बाबतीतही असंच काही घडत होतं. पण स्टार वॉर्स आणि लिगो आपापले युनिव्हर्स चांगल्या पद्धतीने बनवत आहेत. ट्रान्सफॉर्मर्स सुद्धा पुन्हा नव्याने सिनेमे घेऊन येत आहेत. म्हणजे हॉलीवूडमध्ये प्रत्येक सिनेमा कंपनी आपापले सिनेमॅटिक युनिव्हर्स बनवत आहेत, पण हे सर्व आताच घडत आहे, असे नाही. आधी सुद्धा बऱ्याच कंपन्यांनी सिनेमॅटिक युनिव्हर्स बनवायचे प्रयत्न केले होते, आणि नंतर ते इतिहासजमा झाले. आता केविन फायगी यांनी हा ट्रेंड त्यांच्या पद्धतीने कोणतीही तडजोड न करता पुन्हा एकदा सुरु केला, आणि त्यात ते यशस्वी देखील झाले आहेत.

मार्व्हल्स सिनेमॅटिक युनिव्हर्सच्या आधी केविन फायगी 'दि डोनर्स' कंपनीमध्ये लॉरेन्स रॉनरसोबत काम करत होते. ज्या आता फॉक्स स्टुडियोसाठी काम करतात. केविन यांनी त्यांच्यासोबत 'यु गॉट मेल' आणि 'वोल्कॅनो' सिनेमांसाठी काम केलं. नंतर लॉरेन्स यांनी 'एक्स मेन' सिनेमांची फ्रॅन्चायझी घेतली. त्यावेळी त्यांनी केविन यांना देखील सोबतीला घेतलं. याच अनुभवाच्या वेळी केविन यांना मार्व्हल्स स्टुडियोमध्ये काम करावेसे वाटले. त्यावेळी मार्व्हल्स स्टुडियोचे प्रमुख अविया रेड होते, ज्यांनी मार्व्हल्सच्या 90 च्या दशकातील टीव्ही मालिकांची निर्मिती केली होती. केविन लवकरच मार्व्हल्सचे सह-निर्माते झाले. तेव्हा त्यांनी 'डेअरडेव्हिल्स' आणि 'हल्क' या दोन सिनेमांची निर्मिती केली. पण दोन्ही सिनेमे दुसऱ्या एखाद्या स्टुडियोसोबत बनवले होते. मार्व्हल्सचे 2006 सालचे तत्कालीन अध्यक्ष डेव्हिड नेशल यांना मार्व्हल्सचे सिनेमॅटिक युनिव्हर्स असावे असे वाटत होते. पण अविया रेड यांना ते मान्य नव्हते. त्यांना वाटत होते, आपण आपल्या सुपरहिरोंचे हक्क इतर कंपन्यांना विकायचे आणि नफा कमवायचा. त्यांच्या मताशी तत्कालीन सीईओ आयझ्याक झेक सहमत होते. त्यामुळे डेव्हिड नेशल यांना काही करता आले नाही. नंतर अविया रेड यांची ओळख केविन यांच्याशी झाली. केविन यांच्याकडे नवनवीन कल्पना होत्या. त्या कल्पना अविया रेड आणि सीईओ आयझ्याक झेक या दोघांनाही आवडल्या. तेव्हा या सर्वांनी एकत्र येऊन सिनेमॅटिक युनिव्हर्ससाठी काम करायचं ठरवलं.

केविन यांनी कर्ज घेऊन 2008 साली 'आयर्न मॅन' आणि 'द इन्क्रेडिबल हल्क' या दोन सिनेमांची निर्मिती केली. पैकी 'द इन्क्रेडिबल हल्क' सिनेमाचे हक्क युनिव्हर्सल स्टुडियोकडे असल्याने त्या दोन्ही कंपन्यांना एकत्र काम करावं लागलं. दरम्यान सिनेमाचा नायक एग्वर्ड रॉड आणि केविन यांच्यात वाद झाला. एग्वर्ड यांना तो सिनेमा त्यांच्या पद्धतीने बनवायचा होता. केविन यांना ते मान्य नव्हतं. शेवटी केविन यांनी एग्वर्ड यांना पुढील सिनेमांमधून काढून टाकले. सिनेमाला देखील चांगला व्यवसाय करता आला नाही. यानंतर केविन यांनी त्यांच्या कल्पकतेने काम केले. त्यांनी जॉन फेवेन्यू आणि रॉबर्ट द्वानी ज्युनियरला सोबत घेऊन एका अशा सुपरहिरो सिनेमाची निर्मिती केली, ज्याच्याबाबत बऱ्याच जणांना जास्त काही माहित नव्हते. केविन आणि मार्व्हल्सने मोठ्या हिमतीने हे धाडसी पाऊल उचलले होते. आणि तो सिनेमा होता 'आयर्न मॅन'. आणि हा सिनेमा मार्व्हल्सचा पहिला सुपरहिट सिनेमा ठरला. हा सिनेमाला प्रेक्षक पसंत करतील की नाही, याचा विचार न करता त्यांनी पुढील सिनेमांवर आधीच काम करणे सुरु केले होते. म्हणजेच आयर्न मॅनचे शुटींग होत असताना केविन फायगी 'थॉर', 'कॅप्टन अमेरिका - द फर्स्ट अव्हेंजर' आणि 'द अव्हेंजर्स' सिनेमांच्या स्टोरीलाईनवर काम करत होते. नुसते काम करत नव्हते, तर त्यांनी या सिनेमांची घोषणा 2006 च्या कॉमिकॉन समारंभात केली होती.

पुढे जाऊन मार्व्हल्स स्टुडियोला डिझ्नेने 4 अब्ज डॉलरमध्ये खरेदी केले. त्या दरम्यान डेव्हिड नेशल यांनी सेवानिवृत्ती घेतल्यावर मार्व्हल्सची सर्व सूत्रे केविन फायगी यांच्या हाती आली. ते मार्व्हल्स स्टुडियोचे अध्यक्ष झाले. केविन यांना हेच हवे होते. त्यांनी आपल्या सिनेमॅटिक युनिव्हर्सलच्या पहिल्या टप्प्यात तब्बल सहा सिनेमांची निर्मिती केली. यामध्ये 'आयर्न मॅन', 'द इनक्रेडिबल हल्क', 'आयर्न मॅन 2', 'थॉर', 'कॅप्टन अमेरिका - द फर्स्ट अव्हेंजर' आणि 'द अव्हेंजर्स' या सिनेमांचा समावेश होतो. मोठ्या प्रमाणात सुपरहिरो एकत्र आणून त्यांना न्याय देत 'द अवेंजर्स' हा सर्वोत्कृष्ट सिनेमा ठरला. त्या सिनेमाने अनेक विक्रम नोंदवले.

आपल्याला मिळालेल्या या यशाने होळपळून न जाता केविन यांनी पुढील टप्प्याची घोषणा केली. ज्यामध्ये त्यांनी 'आयर्न मॅन 3', 'थॉर - द डार्क वर्ल्ड', 'कॅप्टन अमेरिका - द विंटर सोल्जर', 'गार्डियन ऑफ द गॅलेक्सि', 'अव्हेंजर्स - एज ऑफ अल्ट्रॉन' आणि 'अँट मॅन' अशा एकापाठोपाठ एक सहा सिनेमांची निर्मिती केली. दरम्यात 'थॉर - द डार्क वर्ल्ड' सिनेमामध्ये थोडा गोंधळ झाला. त्यामुळे त्यांनी सिनेमाच्या दिग्दर्शिका पेटी जेनकिन्स यांना सिनेमा सोडायला सांगितलं, तो सिनेमा मग ॲलन टेलर यांनी दिग्दर्शित केला. दिग्दर्शक इग्वार्ड यांच्या जागी पॅटॉन रिड यांनी 'अँट मॅन' सिनेमा दिग्दर्शित केला. 'आयर्न मॅन' दिग्दर्शित करण्यासाठी जॉन फेवेन्यू यांनी नकार दिला. तो सिनेमा शेन ब्लॅक यांनी दिग्दर्शित केला. केविन यांची इच्छा होती, 'अव्हेंजर्स - एज ऑफ अल्ट्रॉन' हा सिनेमा जॉन फेवेन्यू यांनी दिग्दर्शित करावा. पण काही कारणांमुळे ते शक्य नाही झाले. मग तो सिनेमा जॉश विडेन यांनी दिग्दर्शित केला. पण त्या सिनेमाला 'द अव्हेंजर्स' प्रमाणे

यश मिळाले नाही. यामुळे आयझ्याक यांना चिंता वाटू लागली. त्यांनी पुढील सिनेमांसाठी जास्त पैसे न गुंतवण्याचा विचार केला. पण त्यानंतरचा 'आयर्न मॅन 4' हा केविन फायगी यांचा महत्वाकांक्षी सिनेमा होता. कोणत्याही परिस्थितीत त्यांना तो बनवायचाच होता. सिनेमाच्या बजेटचा विचार करून आयझ्याक यांनी त्या सिनेमामधून रॉबर्ट द्वानी ज्युनियरला काढण्याचे सुचवले. त्यावर केविन फायगी इतके भडकले, की त्यांनी मार्व्हल स्टुडियो सोडण्याचा निर्णय घेतला. बऱ्याचशा वर्तमानपत्रांमध्ये ही बातमी बरेच दिवस ब्रेकिंग न्यूज म्हणून होती. पण डिस्ने स्टुडियोचे सी.इ.ओ. बॉब आयगर यांनी ॲलन हॉन यांच्यासोबत पुढाकार घेतला आणि केविन यांना हवा तसा सिनेमा बनवण्यासाठी सहाय्य केलं. नंतर रुसो भावंडांच्या दिग्दर्शनाखाली त्या सिनेमाचे नाव 'कॅप्टन अमेरिका - सिव्हिल वॉर' असे निश्चित झाले. आणि त्या सिनेमाने काय कमाल करून दाखवले हे आपल्या सर्वांना माहितच आहे. याच सिनेमाने सोनी स्टुडियोच्या स्पायडरमॅनला मार्व्हल कुटुंबात आणले.

केविन यांच्या डोक्यात मग वेगळी कल्पना आली, त्यांनी नवनवीन दिग्दर्शकांना संधी द्यायचे ठरवले. मग 'थॉर – रॅग्नारॉक' टायको भटीडी यांनी, आणि 'ब्लॅक पँथर' इयान वोग्लर यांनी दिग्दर्शित केले. या दिग्दर्शकांनी आपल्या दिग्दर्शनातून ते करून दाखवले जे गेल्या कित्येक वर्षांचा अनुभव गाठीशी असलेल्या दिग्दर्शकांना करता आले नाही. पण या सर्व घडामोडींचे सर्व श्रेय अर्थातच केविन फायगी यांनाच जाते. त्यांनी नंतर 'अव्हेंजर्स - इन्फिनिटी वॉर' आणि 'अव्हेंजर्स – एन्डगेम' असे दोन्हीही मोठे सिनेमे रूसो भावंडांना दिग्दर्शित करण्यासाठी दिले. कारण 'कॅप्टन अमेरिका - सिव्हिल वॉर' सिनेमामध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणात सुपरहिरो सोबत घेऊन प्रत्येक सुपरहिरोला न्याय दिला होता.

'अवेंजर्स एन्डगेम'ने जगाला वेड लावले आहे. नुकतेच या सिनेमाने आणि 'अवतार' या सिनेमांच्या कमाईचे विक्रम मोडत जगभरात सर्वाधिक कमाई करण्याचा विक्रम केला आहे. पण तुम्हाला माहित आहे का? केविन यांनी त्यांच्या पुढील सिनेमांची लिस्ट आधीच करून ठेवली आहे. त्याविषयी लवकरच बोलू.

**लेखक:** अभिषेक ठमके

**मोबाईल:** 9768650098

**ईमेल:** abhishek.thamke@gmail.com

**(लेखक साय-फाय विषयाचे अभ्यासक आणि ई-पुस्तक प्रकाशक आहेत.)**

📖 ⌘ ✶

## मोहुनिया तुजसंगे - हेमंत बेटावदकर

सकाळी नेहमीप्रमाणे फिरायला निघालो होतो. नेहमीच्या रस्त्यावरून फिरत असतांना विचार आला की आज थोडी वेगळी वाट धरावी. बाजूच्या रस्त्यावर फारशी वर्दळ नसते. फिरायला जाणारे नेहमीचे यशस्वी कलाकारही तिकडे फिरकत नाहीत कारण त्या रस्त्यावर बसायला बाके नाहीत. टुमदार बंगले झेलत असलेला हा रस्ता जणू बाजूला असल्यामुळे एकाकी वाटतो. आपण जरा हटके करावे म्हणून मी त्या रस्त्याला वळलो.

सुरुवातीच्या दोन-तीन बनल्यानंतर दोन रिकामे फ्लॅट होते आणि त्यानंतर मात्र सलग दुतर्फा छान बनले होते. आत मध्ये सुखवस्तू माणसे रहात असावीत कारण कोणत्याही बंगल्यात वर्दळ हालचाल काही म्हणता काही जिवंतपणाची लक्षणे दिसत नव्हती. सारे बंगले एक जात सकाळच्या साखरझोपेत असल्यासारखे वाटत होते. मी आपला या रस्त्यासाठी नवखा होतो कारण याआधी कधीही इकडे येण्याचा प्रसंग आला नव्हता. थोडा पुढे चालत गेलो आणि एकदम दचकलो, माझे डोळे विस्फारले आणि आपण कोठे आहोत याचा विसर पडला.

समोर रस्ताभर बुचाच्या फुलांचा सडा पडला होता आणि हवा सुटलेली असल्यामुळे झाडांवरून बुचाची फुले गिरक्या घेत घेत जमिनीवर पडत होती आणि मादक सुगंध पसरवत होती. साधारणतः दसऱ्यापासून सुरू होणारा हा फुलोत्सव आता अगदी बहरात आला होता आणि आपल्या स्वर्गीय सुवासाने वातावरणाला सुगंधित करत होता.

मी न राहवून पुढे झालो आणि वाकून ती लांब दांडी असलेली नाजूक फुले हळुवारपणे वेचू लागलो. मी ओणवा होऊन फुले वेचत असताना वरून झाडावरून फुलांचा वर्षाव होत होता आणि त्यातली काही फुले माझ्या पाठीवर पडून खाली पडत होती. माझ्या त्या फुलांच्या सड्यातून चालण्यामुळे काही पायदळी येऊन कुस्करली जात होती तर काही जुनी फुले मलूल होऊन वाळक्या रूपात पडलेली दिसत होती. त्या ताज्या फुलांचा मोठा गुच्छ हातात घेऊन मी निघालो आणि जाता जाता ती मुले नाकाजवळ नेऊन तो स्वर्गीय सुगंध रोमारोमात भरून घेत होतो. हे सारे घडत असताना मी थोडा अंतर्मुख झालो आणि नकळत माझ्या बालपणीचा काळ मला आठवू लागला.

तो साधारण सत्तरच्या दशकातला काळ असावा. मी त्यावेळी पाचवी किंवा सहावीत असेन. आमच्या घराच्या मागच्या गल्लीत एक डेरेदार आणि उंच उंच असे बुचाचे झाड होते. वर्षातले नऊ महिने अंगावर फक्त पाने आणि फांद्या यांना मिरवणारे हे झाड दसरा आला रे आला की अगणित अशा कळ्यांच्या गुच्छांनी भरून जायचे. त्या कळ्यांच्या असण्याची कोणाला काही घेणेदेणे नसायचे कारण त्या ना सुवास सांडायच्या ना खाली पडायच्या. एखाद-दुसरी कळी चुकून खाली पडली तरी तिच्या कपाळावर टोचून फटाका करण्याकडेच उपयोग व्हायचा कारण ती पोकळ फुगीर असायची. तिच्यात अजून बुचाचा म्हणून असतो तसा सुगंध भरलेला नसायचा. त्यामुळे पोरीबाळी ही त्याकडे दुर्लक्षच करत.

हळूहळू दिवाळीचे दिवस जवळ येत. खास दिवाळीची म्हणावी अशी हवा आणि वातावरण तयार होई. सुखद गुलाबी थंडी पांघरुणातून बाहेर पडायला मज्जाव करी. तरीपण दुरून येणारा मोहक सुगंध पांघरून टाकून त्या सुगंधाच्या दिशेने धावायला मजबूर करी. आता बुचच्या झाडावरील कळ्यांनी छान टपोऱ्या फुलांचे रूप धारण केलेले असायचे आणि त्यांचा सडा जमिनीवर अविरत पडत असलेला दिसायचा. सोबतीला त्यांचा मादक सुगंध साऱ्या आसमंतात भरलेला असायचा आणि झाडाखाली गर्दी केलेल्या मुलींचे परकर आणि स्कर्टचे ओचे त्या फुलांनी गच्च भरून जायचे. बिचाऱ्या वाकून वाकून फुले वेचून जात पण झाडावरून होणारा फुलांचा वर्षाव अविरत चालू असे. एखाद्या भिंगरी प्रमाणे गिरक्या घेत घेत ती जमिनीवर येऊन विसावत आणि अलगदपणे एखाद्या मुलीच्या ओच्यात जात. त्या बिचाऱ्या हातात जेवढे मावतील तेवढेच वेचत आणि पळत जाऊन घरी आईला नाहीतर ताईला घेऊन पुन्हा वेचण्यासाठी झाडाखाली दाखल होत.

बूचाच्या झाडाला खालून दगड मारून किंवा झाड हलवून फुले पाडताना कुणी पाहिलाय का? त्याची काही गरज पडत नाही कारण फुलं उमलली की ती स्त्री वर्गाच्या कल्याणासाठी जमिनीवर यायचेच.

दोन-तीन वेळा झाडाखाली जाऊन वेचलेली फुले आईच्या ताब्यात दिली की ती त्यांची फार छान वेणी बनवायची. वेणी बनवतांना फुलाच्या लांब लांब दांड्या गुंफण पक्की होण्यासाठी फार उपयोगी पडतात त्यामुळे धाग्याचा वापर न करताही घट्ट आणि दाट अशी वेणी तयार होत असे. ती वेणी केसात माळून आई आणि ताई इतक्या सुंदर दिवसाच्या की हे झाड वर्षभर का फुलत नाही असा मला प्रश्न पडायचा. आपण कष्टाने वेचलेल्या फुलांचा असा सदुपयोग झालेला पाहून मला आपण आपल्या ताई आणि आई साठी काहीतरी चांगले केले याचा अभिमान वाटायचा. देवा! या बुचाच्यां झाडाला वर्षभर असाच फुलांचा बहर येऊ दे म्हणजे मी दररोज माझ्या आई आणि ताई साठी अशीच भरभरून फुले वेचीन आणि माझ्या आई आणि तिच्या चेहऱ्यावरचा आनंद डोळे भरून पाहिन.

आई काही फुले हुशारीने बाबांच्या लिखाणाचे टेबलवर ठेवून द्यायची जी आपल्या स्वर्गीय सुवास घरभर पसरवत आणि त्यांना उचलून नाकाजवळ यायची गरज नसे.

हेम्न: पुष्पाणि निर्मातु बहव: संन्ति शिल्पिन: |
त त्र सौरभ निर्माणे चतुर: चतुरानन: ||

**अर्थ:** सोन्याची फुले करणारे कारागीर पुष्कळ असतात मात्र त्यांच्यात सुगंध निर्माण करण्यात चतुर्मुख ब्रह्मदेवच चतुर असतो.

**लेखक:** श्री. हेमंत बेटावदकर, जळगांव
**मोबाईल:** 9403570268

***(लेखक रिटायर्ड SBI कर्मचारी असून वाचन, लेखन आणि चित्रकला हे त्यांचे आवडते छंद आहेत. ते सकाळ आणि लोकमत वर्तमानपत्र तसेच अनेक दिवाळी अंकांमधून सातत्याने लिखाण करत असतात. तसेच त्यांनी "काळ सुखाचा" आणि "माझं काय चुकलं?" ही दोन प्रसिद्ध पुस्तके लिहिली आहेत)***

📖 ⌘ ✶

## दादामामा: एक प्रसन्न व्यक्तिमत्व - किरण दहीवदकर

***(भावस्पर्शी व्यक्तिचित्रण या लेखमालिकेतील हा दुसरा लेख)***

दादामामा हे व्यक्तिमत्त्व सर्वांकडेच आढळणारे व्यक्तिमत्त्व आहे. आईकडील बहिण भावांडामध्ये सर्वांत मोठ्या भावाला दादा म्हणतात आणि त्याच भावाच्या बहिणीची मुल त्यांना प्रेमाने दादामामा म्हणतात. असेच आमचे दादामामा. मी आजपर्यंत ब-राच जणांना मामांना एकेरी नावांने बोलवतांना बघितले आहे आणि ते चांगलेपण आहे, कारण त्यातुन मामा भाच्यांमधिल मैत्रीपूर्ण आणि जिव्हाळ्यांचे संबंध जाणवतात. पंरतु आमचे मात्र तसे नव्हते, आम्ही मामांनासुध्दा आदराने अहो मामा असेच म्हणायचो. पण असे असतांनासुध्दा आमचेपण मैत्रीपूर्ण आणि जिव्हाळ्यांचेच संबंध होते आणि त्या नात्यालापण एक आदरयुक्त भितीचा कोपरा होता.

त्यांच्या लहानपणाबद्दल तर मला काही जास्त माहिती नाही. पंरतु माझ्या लहानपणापासुंन मात्र मला त्यांच्याबद्दल संपूर्ण माहिती आहे. त्यांचे नाव सुरेंद्र होते. सुरेंद्र हे नाव त्यापुर्वीच्या काळातील एका उत्तम अभिनेत्याचे होते आणि आमचे आजोबा त्या अभिनेत्याचे निस्सिम चाहते होते आणि त्यांच्याच नावावरून मामांचे नाव सुरेंद्र असे ठेवण्यात आले आहे, असे मी अनेकदा माझ्या आजोबांकडून ऐकले होते. आमचे मामा म्हणजे एक दिलखुलास व्यक्तिमत्व, त्यांचे स्मितहास्य ही त्यांची ओळख. कमालीचा नम्रपणा, समोरील व्यक्तिचा वयोगट कुठलाही असो, पण त्याना वाटणाऱ्या आदरांचे प्रमाण हे नेहमी समानच. भरपूर उंची, प्रभावशाली व्यक्तिमत्व आणि मधुर वाणी ही त्याच्यातील असलेली ठळक वैशिष्ट्य. या सर्व गोष्टींचा संयोग फारच मोजक्या लोकांमध्ये पाहण्यात येतो आणि अशाच काही लोकांमध्ये आमचे मामा पण येतात.

मला नक्की नाही आठवतं, त्यांची आणि माझी प्रथम भेट. पण मी आठवणीच्या त्या रम्य भुतकाळात जेव्हा डोकावतो, तेव्हा मला माझे मामा स्पष्टपणे आठवतात. मला तो प्रंसग आठवतो जेव्हा मी खुप लहान होतो आणि शिक्षणासाठी मामांच्या गावाला गेलो होतो. साधारण दोन, तीन वर्षाचा असेल. तेव्हा आतासारखे प्रि-प्रायमरी, नर्सरी असे कुठलेही वर्गीकरण नव्हते त्याकाळी, तर तेव्हा होते, लहान मुलांसाठी बालक मंदिर, बालवाडी आणि नंतर प्रायमरी शाळा. तर मी बालक मंदिरात जात असे आणि माझे मामा मला बालक मंदिरात त्यांच्या कामाच्या व्यापातुनही सोडायला आणि घ्यायला नियमीत येत, जात असत. पाय दुखायला लागलेत की मामा मला खांद्यावर बसवुन घरापर्यंत घेऊन जात असत. हीच ती काय त्यांची आणि माझी प्रथम ओळख जी माझ्या स्मरणात अजुनही घर करून आहे.

मामा उच्चशिक्षीत होते. त्यांनी त्या काळी एम.ए. इंग्लिश लिटरेचर मध्ये यश संपादन केले होते. फोटोग्राफीचा व्यवसाय आणि त्यात आपल्या वडिलांना होईल ती मदत करून आपले शिक्षण त्यांनी पूर्ण केले होते. त्यांच्यामध्ये एकाचवेळी अनेक काम करण्याचे कौशल्य होते. मराठी माणसाला यशस्वीपणे व्यापार करता येत नाही हा समज त्यांनी त्याकाळीच खोडून काढला होता.आपल्या काही खानदानी व्यावसाईक मित्रांकडून त्यांनीव्यवसायासंदर्भात बऱ्याच नवीन गोष्टी शिकल्या होत्या. त्याच्या मित्र परिवारांमध्ये विविध प्रकारच्या नोकरी, व्यवसायाचे प्रतिनिधीत्व करणारे लोक होते. कोणी केमीस्ट होते, तर कोणी शिक्षक, कोणी बँक अधिकारी, कर्मचारी होते, काही शेतकरी होते, तर काही कलाक्षेत्रातील लोकसुध्दा होते. स्वभावांनी ही सर्व मंडळी एकाच माळेची मणी. गंमती जंमती करण्यात, एखाद्याला लक्ष करून, त्यानी केलेल्या एखाद्या चुकीचे किंवा गौधळाचे आपापल्या परिने कल्पनाविस्तार करून, आतिशयोक्तीने त्या प्रंसगाचे हास्यास्पद पध्दतीने वर्णन करण्यामध्ये या मंडळीचा हातखंडा होता आणि त्यातून निर्माण होण्यारा विनोदातून ही मंडळी प्रंचड आनंद मिळवत असे.

या सर्वांचा दिनक्रम ठरलेला होता. रोज सकाळी आपआपली दुकाने उघडायची, स्वतः दुकानाची स्वच्छता करायची, दुकानातील देवघराची पुजा करायची आणि मगच आपल्या दुकानदारीला सुरूवात करायची, दुपारी घरी जेवायला जायचे. ..थोडासा आराम करून परत उत्साहाने दुकानात हजर व्हायचे आणि रात्री नऊच्या सुमारास दुकान बंद

करून, आज ज्याला आपण कट्टा असे म्हणतो अश्या चौकाच्या ठिकाणी म्हणा, एखाद्या मित्राच्या दुकानात म्हणा गप्पा मारायच्या. नोकरदार, चाकरमाने मित्रसुध्दा आपल्या गावातील, परगावांतील नोकरी साभांळुन या सर्व मंडळीच्या गप्पांमध्ये, आप आपल्या वेळेच्या सोयीने स्वतःला सामिल करून घेत असत. त्याकाळी इडीयट बॉक्सचे ऐवढे प्रस्थ निर्माण झाले नव्हते..त्यामुळेच हे सर्व मित्र एकत्र जमून आपल्या गप्पांमधून एकमेकांसाठी मनोरंजन शोधत असायचे. वा काय छान दिवस होते ते !!.

मला अजुनही तो प्रंसग जसाच्या तसा आठवतो. ज्यावेळेस मामांना भारतीय रेल्वेमध्ये त्याकाळी सरकारी नोकरीची संधी आली होती आणि त्यांच्यासमोर नोकरी की व्यवसाय हे धर्मसंकट निर्माण झाले होते. एकीकडे वडिलांनी अथक कष्टानी नावारूपास आणलेला व्यवसाय आणि त्याच व्यवसायाचा स्वत:च्या कौशल्य आणि मेहनतीने केलेला विस्तार आणि दुसरीकडे रेल्वेतील नोकरीची सुवर्णसंधी, यातून काय निवडावे ? असा यक्षप्रश्न मामांसमोर उभा ठाकला होता. मामांनी कोणता निर्णय घ्यावा यांचे संपूर्ण स्वातंत्र्य, मामांना त्यांच्या वडिलांनी दिले होते. दोन्ही बाजूनी असणारे फायदे आणि तोटे, त्यांनी त्याच्या परीने त्यांना समजवुन सागुंन, निर्णय मात्र मामांवर सोपवला होता. त्यांनी जर नोकरी निवडली असती तर जमेल तेवढे दिवस त्यांच्या वडिलांनी हा व्यवसाय पुढे रेटून, न जमल्यास बंद करण्याची तयारीपण दाखविली होती. पण अखेरीस एका व्यावसायिक मनाने एका नोकरदार मनावर मात केली आणि व्यवसायाच निवडण्याचा धाडसी निर्णय मामांनी घेतला आणि पुन्हा एकदा नव्या उत्साहाने आपल्या व्यवसाय विस्तारास मामांनी आरंभ केला.

मामांकडे प्रंचड विनोदबुध्दी होती. कुठल्याही छोट्या घटनेवर पटकन विनोद निर्माण करण्याची एक दैवी कला त्यांना अवघत होती. त्यांची कोणतीही घटना सांगण्याची एक अजबच पध्दत होती, ती अशी की वारवांर ऐकल्यावरही ती घटना किंवा गोष्ट ही पुन्हा एकदा त्यांच्याचकडून ऐकण्यात खूप गंमत वाटायची. अश्या अनेक गंमती जमती आम्ही त्यांच्याकडुन शेकडो वेळा ऐकल्या आहेत. तरीही अजूनही आम्हाला परत परत ऐकण्याचा मोह आवरत नाही. त्यातील काही उदाहरणादाखल: त्याच्यांच लग्नात त्यांच्या एका नवख्या मित्रांने काढलेले फोटो जे प्रत्यक्षात निघालेच नाहीत. हजारो लोकांच्या लग्नातील फोटो काढणारा या माणसांच्या लग्नातला एकही फोटो आठवण म्हणून नाही आणि या त्यांच्या मित्रांनी केलेली चुकीची शिक्षा त्यांना पदोपदी, आयुष्यभर कशी मिळत गेली हा किस्सा ते खूप रंगवून सांगतात. जाणकार वाचकांना कळलेच असेल, शिक्षेचे स्वरूप आणि शिक्षा देणारी व्यक्ती, म्हणजेच हा एक गमतीदार किस्सा ते फार रंगवून रंगवून सांगत असत.

असाच एक किस्सा:

ते एकदा रात्री उशिरा मोटर सायकलवरून एका गावाहून परत येत असंताना रात्री बारा, एकच्या सुमारास एका पुलावरून जातांना, पांढरा रंगाच्या साडीवाल्या बाईने त्यांना कशी लिफ्ट मागितली आणि नंतर काही अंतरावर उतराच ती कशी अदृश्य झाली. हा किस्सा ते एखाद्या भयपटाच्या कथेप्रमाणे सागंत असत. सुरूवातीला आम्हाला भिती वाटायची. पंरतु नंतर नंतर गंमत वाटायला लागली. जशी जशी आम्हाला समज यायला लागली तसा तसा आमचा या घटनेवरील विश्वास उडत गेला. नंतर तर आम्ही मामांनाच आव्हान द्यायला लागलो की असे काही नसते, तो तुमचा भास असेल आणि त्याला कारणही तसेच होते. कारण मामांना सिनेमाची आवड होती, विशेषतः हॉलीवूडचे भयपट, रामसे बंधूंचे चित्रपट, अनेकदा ते असे चित्रपट पाहून उशिरा परगावाहून घरी येत असत आणि त्यातूनच त्यांना असा भास झाला असावा, असे त्यांना पटवून देण्याचे आमचे निष्फळ प्रयत्न सतत चालले असत.

मामांना आणखी एक कला अवगत होती आणि ती म्हणजे शीघ्र कविता. ते एक शीघ्रकवी होते. उत्तम यमक जुळवून, पटकन कविता सादर करणे हे त्याना लीलया जमायचं. एक प्रसंग मला अजूनही जसाच्या तसा आठवतो. मामांच्या गावाहुन रेल्वे जायची. गाव अगदी छोटसं असल्याने रेल्वे स्थांनाकांपासूनही मामांचे घर दूर असले तरी रात्रीच्या शातंतेत जाणारा येणारा रेल्वेचा आवाज स्पष्टपणे घरात ऐकू यायचा, म्हणजे मामांना तर रेल्वे गाडीच्या धावण्याच्या वेगाच्या

आवाजावरून आणि संबंधित वेळेनुसार कोणती गाडी गेली आणि तिचे नाव, हे सांगण्याचे कसब प्राप्त झाले होते. असेच एका रात्री आम्ही सर्व गप्पा मारत आपल्या आपल्या अंथरूणात पहुडलो होतो. आमच्या गप्पा काही संपता संपेनात. मामा आम्हाला झोपा आता..असे सांगून कंटाळले होते. कारण मामांना लवकर झोपून दुसऱ्या दिवशी लवकर दुकांनात जायचे होते. अश्यातच रात्री अकराला एक रेल्वेगाडी जाण्याचा आवाज आला, ती गाडी होती दादर एक्सप्रेस आणि मामांनी त्या प्रसंगाला अनुसरून, ताबडतोब एक लघु कविता करून टाकली. ती अजूनही माझ्या स्मरणात तशीच आहे.

आला आला दादर
घ्या अंगावर चादर
नाहीतर रागवतील फादर
उद्या दुकानात व्हा हजर
ग्राहकांची करा जरा कदर
काम वेळेत करा सादर
लावा पाच वाजेचा गजर.

मामांवर सरस्वतीप्रमाणे लक्ष्मीचीसुध्दा तेवढीच कृपा होती. जीवनात बरेच जण लक्ष्मी प्राप्त करतात, पण फारच थोडे लोक असे असतात की ज्यांच्या हातात लक्ष्मी कायम स्वरूपी टिकते किवां तिला टिकवण्याची कला त्या लोकांमध्ये असते. अश्याच काही मोजक्या लोकांपैकी मामा एक व्यक्ती आहेत. त्यांचे कष्टही खूप होते. त्यामुळेच लक्ष्मी त्यांच्यावर कायम प्रसन्न असायची. मामा मनाने खूपच हळवे होते. कुठल्याही भावनात्मक प्रंसगात त्यांच्या डोळयात पटकन पाणी तरळुन जात असे. कोणाच्याही, कुठल्याही वाईट प्रंसगात ते पटकन धाऊन जात. त्यांना शक्य असेल त्या स्वरूपात, अगदी आर्थिक स्वरूपातसुध्दा ते मदत करायला मागे पुढे पहात नसत आणि म्हणुनच सर्वांना त्याचा दादा म्हणुन खुप भक्कम असा आधार आणि आदर होता. घरात सर्वांत मोठे असल्यांने वडिलांच्या बरोबरीनी, पाठच्या बहिण भावंडाना स्थिरस्थावर करण्यात मामांचा सिंहाचा वाटा होता. ते त्यांच्या उत्तम आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांच्या मित्रपरिवारात, नातेवाईकांमध्ये अजूनही लोकप्रिय आहेत.

हळु हळु काळ पुढे सरकत गेला...मामांचा स्वताःचा संसार फुलत गेला..पत्नीची संसारात खंबिर असलेली साथ...आणि दोन मुले आणि एक मुलगी यांनी बहरलेला संसार. सर्व दूरआनंदी आंनद, पण म्हणतात ना सर्वच दिवस सारखे नसतात, सुखांच्या नंतर दुःख असते. नियतीला मामांचे हे सुख पाहविले नाही आणि अचानक त्यांच्या आईंचे अकस्मित निधन झाले. फक्त अडीच दिवसाचा खेळ होता तो आणि होत्याचे नव्हते झाले. पैसा, सुविधा, कष्ट आणि प्रार्थना निष्फळ ठरल्या आणि अखेरीस नियतीने आपला डाव साधला. वडील बंधू म्हणून वडिलासंह इतर परिवाराला या दुखाःच्या प्रंसगात सावरण्यांची आलेली जबाबदारी, त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. आईच्या पश्चात इतर बहिण भावांच्या लग्नाची जबाबदारी यथायोग्य पार पाडली. लहान बहिणीच्या लग्नात कन्यादानासारखे महान दान करण्याचे पुण्य त्यांना लाभले. पुन्हा एकदा आयुष्याची घडी सुरळीत बसू लागली.

मुले मोठी होत गेली मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी वाढत गेली. मुले आपापल्या पध्दतीने शिकत गेली. मुलगी सर्वात लहांन आणि मामांची खुपच लाडकी...तिला ते तिच्या खुपच लहानपणापासून "माझी माय" असे म्हणायचे. कदाचीत ते तिच्यामध्ये आपल्या आईला शोधायचा प्रयत्न करत असावे. वऱ्हाडी भाषेत आईला माय असे म्हणतात. तिला उच्चशिक्षित करण्याचे त्यांचे स्वप्न होते आणि त्यांचे ते स्वंप्न अथक परिश्रम करून त्यांच्या मुलीनी पूर्ण केले होते. ती इंजिनियर झाल्यानंतरचा आंनद, समाधान त्यांच्या चेहरावर सतत झळकत होते, त्यांची तुलना त्यांच्या आयुष्यातील इतर कुठल्याही आंनदाशी करता येणे शक्यच नाही. तसेच व्यवसायातील वाढती स्पर्धा, व प्रगतीशिल तंत्रज्ञानाने पांरपारिक व्यवयासायावर केलेला आघात. मामांच्या वाढत्या वयासोबतच, त्यांची समकालीन पिढीसुध्दा हळूहळू बाद होत चालली

होती. व्यवासायातील नविन पिढीचे आव्हाने. त्यातच सुखद गोष्ट म्हणता येईल ती अशी की व्यवसायाला शिक्षणासोबतच मुलांची साथ मिळू लागली. ग्राहकांच्या नवीन पिढीशी जुळवून घेण्यास आपल्याच घरातील नवीन पिढी पुढे सरसावली होती. मामांचा भार हलका होत चालला होता. आता ते हळूहळू सक्रिय कार्यकर्त्याच्या भुमिकेतून सल्लागाराच्या भूमिकेत पदार्पण करत होते. वयोमानाअनुरूप काही व्याधीसुध्दा मामांनाच्या सोबतीला आल्या होत्या. शुगर, बिपी एकसाथ त्यांच्या सोबतीला आल्या होत्या. या व्याधींचा सन्मान म्हणून मामा नियमीत व्यायाम, योगा, सकाळी लवकर उठुन फिरायला जाणे आणि खाण्यापिण्यांवर नियंत्रण. या सर्व गोष्टी नियमीत पाळत होते. मामांना कुठल्याही प्रकारचे व्यसन नव्हते. पण त्यांना मसाला पान फार आवडयाचे. त्यांना वेगवेगळे खाद्य पदार्थ खाण्याची प्रंचड आवड होती. पण त्याहीपेक्षा इतर सर्वांना घेऊन खाण्यात आणि खाऊ घालण्यात त्यांना जगावेगळा आंनद मिळायचा. आनंदात जगणं, आपल्या आनंदात इतरांना सामिल करण आणि इतरांनाही आंनदात ठेवणे हेच त्यांच्या जगण्याचे काहीसे सुत्र होते. बराच वेळा ते त्यांचेच मनातल्या मनात काहीतरी आठवल्याने हसत असत आणि त्यामुळेच त्यांचा चेहरा हा सदैव प्रसन्न आणि प्रफुल्लीत दिसायचा. इतर कोणाच्याही लग्नांच्या वरातीत मामा कधीही नाचलेले नाहीत. पण आपल्या लाडक्या भाच्याच्या (त्यांचा लाडका भाचा म्हणजे मीच असे मी मानतो) लग्नात मामांनी पत्नीसह थोडावेळ का होईना पण ताल धरला होता आणि परिवारातील सर्वांनाच आश्चर्यांचा सुखद धक्का दिला होता.

आजही आम्हाला आमचे मामा, त्यांच्या घरातील उबंरावर आमची वाट पहात असल्याचे जाणवतात.
आम्ही आल्यानंतर त्यांच्या चेहरावरील ओसंडुन वाहणारा आनंद जाणवतो.
आम्ही आल्यानंतरची त्यांची चाललेली लगबग जाणवते. आमच्या मुलांचे लाड करणारे मामा जाणवतात.
आम्ही आल्या आल्या मामींना चहा आणि नाश्ताची सूचना करतांना मामा जाणवतात.
त्यांच्या नातवांना म्हणजेच आमच्या मुलांना आवडणारे खाद्यपदार्थ जे त्यांना आधीच माहित असतात ते त्यांच्या मुलाकडून मागवण्यासाठी आग्रह धरतांना जाणवतात.
आमच्या मुलांना खव्यांची जिलंबी खुप आवडते. ती आणल्यानंतर मुंलाच्या बोबड्या बोलात आणि गप्पा टप्पात मामाही, मुलांसह जिलेबीचा आंनद घेत त्यांच्यासह लहान होऊन झालेले मामा जाणवतात.
असेच प्रसन्नचित मामा आम्हाला जन्मोजन्मी मिळो हीच आमची ईश्वरचरणी प्रार्थना!!

**लेखक:** किरण श्रीकांत दहीवदकर. पुणे
**मोबाईल:** 7757025122
**ई-मेल:** kirand.personal@gmail.com

***(लेखक आय टी क्षेत्रात कार्यरत असून लिखाण आणि समाजकार्य हा त्यांचा आवडता छंद आहे)***

📖 ⌘ ✶

## फॅमिली फार्मसिस्ट - आशिष कर्ले.

***("फार्मासिस्ट तुमच्या आरोग्यासाठी" या लेखमालिकेत लेखक वैद्यक आणि औषधनिर्माण क्षेत्रांतील घडामोडीबद्दल माहितीपर लेख लिहितात)***

फॅमिली फिजिशियन किंवा फॅमिली डॉक्टर ही संकल्पना सर्वांनाच परिचित आहे पण फॅमिली फार्मसिस्ट ही संकल्पना तुम्ही पहिल्यांदाच ऐकली असेल. 'औषधवितरण आणि त्यासंबंधित वैद्यकीय सेवा पुरवणे' हे फार्मसिस्ट चे काम आहे. याच्या एक पाऊल पुढे जाऊन फार्मसिस्ट त्याची ओळख 'फॅमिली फार्मसिस्ट' अशी बनवू शकतो. याचा फायदा रुग्ण आणि फार्मसिस्ट दोघांना ही होतो.

मुख्यत्वे याचा फायदा रुग्णांना होतो. त्यांना उत्तम दर्जाची वैद्यकीय सेवा मिळते. रुग्ण एकाच फार्मसिस्ट कडून सेवा घेत असल्याने रुग्णाची वैद्यकीय नोंद (Patient Medical Record PMR) हे फार्मसिस्ट कडे असते. त्यामुळे औषध वितरण करताना कोणतीही चूक होण्याची शक्यता तसेच औषध त्रुटी व औषधांचे हानिकारक परिणाम अशा गोष्टी होण्याच्या शक्यता टाळल्या जातात. याशिवाय आपत्कालीन स्थितीत तुम्हाला सहजतेने औषधे उपलब्ध होऊ शकतात.

रुग्ण इतिहासाची नोंद असल्यामुळे वैद्यकीय तपासणी व उपचारादरम्यान योग्य सल्ला व मार्गदर्शन हे केवळ तुमच्या फॅमिली फार्मसिस्ट कडून मिळू शकतो. तुमच्या दैनंदिन आरोग्यसंदर्भात योग्य मार्गदर्शन हे तुम्ही फॅमिली फार्मसिस्ट कडून घेऊ शकता.

तुमच्या आरोग्यसंदर्भात सर्व प्रकारच्या शंका, प्रश्न याबाबत तुम्ही फॅमिली फार्मसिस्टशी मनमोकळ्यापणाने बोलू शकता. औषधयोजनेशिवाय घेता येणारी औषधे (ओ.टी.सी ड्रग्ज) खरेदी करताना योग्य सल्ला व औषधाची निवड करताना तुमचा फॅमिली फार्मसिस्ट चांगल्या प्रकारे मार्गदर्शन व सेवा पुरवू शकतो. औषध योजनेबाबत सर्व सुविधा या योग्य रीतीने मिळू शकतात.

बाहेरच्या देशांमध्ये फार्मसिस्ट हा वैद्यकीय सेवेतील एक मुख्य घटक आहे. मात्र दुर्दैवाने भारतात 'फॅमिली फार्मसिस्ट' ही संकल्पना तितकीशी परिचित नाही. शिवाय व्यवसायात्मक त्रुटींमुळे वैद्यकीय सेवा देण्यात फार्मसिस्टदेखील कुठेतरी कमी पडत आहेत. परंतु आता हळूहळू भारतात देखील फार्मसिस्टची भूमिका व्यापक होत आहे. यासाठी सर्व फार्मसिस्टनी योग्य प्रकारे वैद्यकीय सेवा पुरवणं व डॉक्टर व रुग्ण यांनीही सहकार्य करणं गरजेचं आहे.

WE ARE PHARMACIST. ALWAYS READY FOR YOUR HEALTH. BETTER DRUGS FOR BETTER WORLD!

**लेखक:** आशिष अरुण कर्ले.

**मोबाईल:** 9765262926

**ईमेल:** ashishkarle101@gmail.com

(गेहलोत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोपरखैरणे, नवी मुंबई)

📖 ⌘ ✶

## आमच्या वेळेस असं होतं? - निमिष सोनार

पूर्वीच्या पालकांचं बरं होतं. मुलं जास्त प्रश्न विचारायचे नाहीत आणि विचारले तरीही पालक दरडावून चूप बसवत. (कारण बरेचदा पालकांनाही उत्तरं माहिती नसायची, इंटरनेट नव्हते त्यावेळेस, लायब्ररीत जाऊन पुस्तकांत बरेचदा उत्तरं शोधावी लागायची. अर्थात जीवनातील ज्या प्रश्नांची उत्तर गुगल देऊ शकत नाही मी त्याबद्दल बोलत नाही आहे!) त्यावेळची बहुतेक लहान मुलं सुद्धा एखाद दुसऱ्या दरडावण्याने चूप बसत, त्यांचे मनातले कुतूहल या पालकांच्या धाकापायी मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी घाबरून पायात मान खाली घालून जाऊन बसायचं आणि आणखी कधी मान वर करून प्रश्न विचारायची संधी मिळते का ते शोधत बसायचं. एखाद्या पालकाने उत्तर माहिती नसलं तरीही कसलं तरी थातूर मातूर उत्तर दिलं तरी वेळ निभावून नेली जायची. मूल तेच उत्तर खरं मनायचं जोपर्यंत खऱ्या उत्तराशी त्यांची भेट होत नव्हती तोपर्यंत.

पण अंदाजे 1990 किंवा 2000 सालानंतर म्हणजे इंटरनेट युग आल्यानंतर जन्मलेल्या बालकांच्या पालकांना संगोपन हे खूप आव्हानात्मक झाले आहे. कारण आज कोणतीही माहिती मोबाईलमधील एका अंगठ्याच्या टॅपवर किंवा माऊसच्या क्लिकवर समोर हजर होते. स्मार्ट फोन्स आले म्हणून ही मुलं सुद्धा ओव्हरस्मार्ट झाली आहेत. काही तर पालकांना उत्तरं माहिती आहेत की नाही हे सुद्धा चेक करत असतात.

पूर्वी चे पालक "तू लहान होता तेव्हा हे नव्हतं, ते ही नव्हतं!" असं सांगून पालक मोकळे व्हायचे. पण आता?

उदाहरण घ्यायचे झाले तर समजा मुलांनी विचारले, "माझे लहानपणीचे फोटो व्हिडीओ का नाहीत आपल्याकडे?" आणि समजा आपण थाप मारली की, "तू लहान असताना मोबाईल मध्ये कॅमेरे नसायचे किंवा कॅमेरेच नव्हते!" असं सांगितलं तर मूल लगेच विकिपीडिया आणि गुगल वर जातं आणि हुडकून काढतं की कोणत्या सालात कोणती गोष्ट कोणत्या देशात अस्तित्वात होती नव्हती वगैरे. अँड्रॉइड मोबाईलचा किंवा कोणत्या गोष्टीचा शोध लागला होता नव्हता वगैरे.

त्यापेक्षा प्रामाणिक राहून "तेव्हा मोबाईल मध्ये कॅमेरे होते किंवा नुसते कॅमेरे होते पण आपल्याला 'परवडत' नव्हतं म्हणून आपल्याकडे नव्हता!' असं सांगितलेलं 'परवडतं'. इंटरनेटच्या महाजालात माहितीच्या महाविस्फोटात कदाचित थोडा प्रामाणिकपणा मात्र वाढत जातो हे खरे. एखादे उत्तर माहिती नसले तर सरळ पालकांनी "मला माहिती नाही आपण सोबत मिळून गुगल वर शोधू" असे सांगितलेले सगळ्यात चांगले म्हणजे त्यांच्या सोबत आपल्यालाही नॉलेजचा लाभ होईल. आणि आपण आयुष्यभर शिकतच असतो नाही का? शिकलेले ज्ञान कधीही वाया जात नाही.

मी येथे मुलांनी विचारलेल्या तात्विक प्रश्नांबद्दल बोलत नाहीये. म्हणजे "काय पाप काय पुण्य, काय योग्य काय अयोग्य, जीवनात कसे वागावे?"

मी फॅक्च्युअल प्रश्न आणि उत्तरे याबद्दल बोलतोय म्हणजे, "रेडिओचा शोध कधी लागला? भारतात पाहिला टिव्ही कधी आला अशा प्रकारच्या प्रश्नांबद्दल सांगतोय. तसे पाहिले तर आजकाल तात्विक प्रश्नांची उत्तरं सुद्धा आजकाल इंटरनेटवर मिळतात. इतकंच नाही तर गुन्हा कसा करावा हेही इंटरनेट शिकवतं. हे मोठे जगापुढे आव्हान आहे.

एखादे मूल विचारू शकते, "मुल आईच्या पोटात कसे जाते किंवा कसे काय बाहेर येते?" आणि तत्सम लैंगिक प्रश्न. (अर्थात हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे). पण आजकाल या संदर्भातील काही उत्तरं नववी दहावीच्या शालेय पाठ्यपुस्तकात मिळतात. किंवा उरलेल्या प्रश्नांच्या उत्तरासाठी विकिपीडिया आहेच. गुगल आहेच.

मग तुम्ही म्हणाल की मुलांच्या मनातील बहुतेक प्रश्नांनी उत्तरे जर इंटरनेट देत असेल तर मुले पालकांना प्रश्न विचारतीलच कशाला? पण नाही. तसं नाहीये. माहितीचे हे निर्जीव महाजाल जसं आपल्याला गाईड करतं तसं मिसगाईड ही करू शकतं कारण इंटरनेट वरील सगळीच माहिती फॅक्च्युअली खरी असेलच असे नाही. हे ज्या स्मार्ट मुलांना समजतं ते

नक्की पालकांना प्रश्न विचारातच. पालकांनी त्यांच्या वागणूकीतून मुलांच्या मनात विश्वास निर्माण केला असेल तर मुलांना नक्की मित्रांपेक्षा पालक जवळचे वाटतील!

आणि मुलांना समजून घेणारी आणि त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधणारे पालक असले तर मूल इंटरनेटपेक्षा प्रथम पालकांवर नक्की अवलंबून राहील आणि म्हणून पालकांनी स्वतः इंटरनेट आणि टेक्नॉलॉजी सेव्ही बनणे अरी आवश्यक झाले आहे. म्हणजे इंटरनेटवरचे काय खरे काय खोटे हे आपल्याला प्रथम माहिती असेल आणि मग आपण मुलांना समजावून सांगू शकू. इंटरनेटवरील एखादी माहिती जेन्युईंन (अस्सल) असेल तर आपणच स्वतः पाल्यांना वाचायला देऊ शकू. "टेक केअर गुड नाईट" हा सचिन खेडेकर, पर्ण पेठे, इरावती हर्षे यांचा मराठी चित्रपट आपल्याला हेच सांगतो. या चित्रपटाबद्दल नंतर पुन्हा कधीतरी वेगळा लेख लिहिन पण चित्रपट नक्की बघा.

आणि "आमच्या वेळेस असं होतं आणि तुही तसंच कर" असली वाक्ये आपण आपल्या पालकांकडून सतत ऐकून घेतली पण आपल्या पाल्यांना आपण ऐकवू शकत नाही कारण आज सतत आणि झपाट्याने बदलत जाणाऱ्या इंटरनेट आणि टेक्नॉलॉजीच्या जमान्यात पाच वर्षांपूर्वीच्या गोष्टी आज कालबाह्य होतात त्यामुळे पूर्वीची कोणतीच गोष्ट आजही तेवढीच लागू होईलच असे नाही त्यापेक्षा पाल्यांच्या पिढीत आपण रंगून जावे हेच बरे! आज नैतिकतेच्या संकल्पना बदलत आहेत आणि त्या अनुषंगाने कोर्ट कायदे सुद्धा बदलवत आहे आणि आपण सामान्य माणसे जुने घेऊन बसू शकत नाही. आणि "खरंच आपल्या वेळेस असं होतं की आपण थाप मारतोय" हे आपली बालके गुगलवर शोधून काढतीलच आणि तुमच्यावेळेस असं नव्हतं तुम्ही खोटं बोलताय असं आपल्याला ऐकावं लागून तोंडघशी पडण्यापेक्षा आपणही पाल्यांइतके स्मार्ट झालेले बरे, नाही का? आणि जसे कुणीही परफेक्ट नसतं, चुका सगळ्यांकडून होतात तसे काही बाबतीत आपल्या पाल्यांना सरळ आपण सांगू शकतो की, "बाबा रे आम्ही परफेक्ट नाहीत आणि देव तर मुळीच नाही आहोत. इतर माणसासारखी चुका करणारी आम्हीही माणसंच! आम्ही सुद्धा जीवनाच्या प्रवासात अजूनही शिकतोय, तेव्हा आजवर आम्हाला आलेल्या अनुभवातून आम्ही हे सांगतोय खरं पण हे तुम्हाला जसेच्या तसे लागू होईलच असे नाही!" कोणत्याच आदर्शवादी तात्विक संकल्पना मुलांवर लादू नये. कारण आपल्याला माहिती असतं की जगात कुणीही आदर्श व्यक्ती नसतोच. चांगल्या सवयी आणि शिस्त लावणे यासाठी प्रयत्न करणं योग्य पण तात्विक आदर्शवादी सुविचार लादणे चूक. काळाची कधी नव्हे एवढी झपाट्याने चालणाऱ्या पावलांच्या मागोमाग जाण्यावाचून आपल्याला गत्यंतर नाही, आपल्याला जेवढे जमेल तेवढे काळा सोबत चालावे, एके ठिकाणी थांबले तर ती पावले आपल्या डोक्यावर पाय देऊन आपल्याला जमिनीत एके ठिकाणी खड्ड्यात अर्धवट घुसवतील आणि पुढे निघून जातील.

दरडावून गप्प बसवणे, मारणे, शिक्षा करणे, धाक दाखवणे हे जुन्या काळातले पाल्यांना हँडल करण्याचे फॉर्म्युले आता लागू होत नाहीत आणि आजच्या काळातही एका घरातला मुलांना हँडल करण्याचा फॉर्म्युला दुसऱ्या घरात लागू होईल असेही नाही. आपल्यालाच आपला फॉर्म्युला शोधून काढून आपल्यासाठी वापरावा लागतो. मी हे लिहितोय म्हणजे मी परफेक्ट पालक आहे असे मुळीच नाही, मी फक्त एक विचार मांडतो आहे. बस्स! पण हे नक्की आहे की, आजचे पालकत्व आजपर्यंत कधीही नव्हते एवढे आव्हानात्मक झाले आहे!! आणि आजच्या पालकांसमोरच्या समस्या सुद्धा अतिशय नाविन्यपूर्ण आणि वेगळ्या आहेत (उदा. मोबाईल गेम्स आणि एकूणच सोशल मीडियाचे मुलांचे व्यसन, यावर तर जगभरातील डॉक्टर अजून वेगवेगळी संशोधन करताहेत) आणि हो, आजकालची मुले सुद्धा कधी नव्हे एवढ्या जीवघेण्या स्पर्धेला आणि ताण तणावाला तोंड देत आहेत, हे विसरून चालणार नाही!!

**लेखक:** निमिष सोनार, पुणे

**मोबाईल:** 8805042502

**ईमेल:** Sonar.nimish@gmail.com

📖 ⌘ ✶

## दुष्काळ: महाराष्ट्राची एक शोकांतिका - मयुर बागुल

महाराष्ट्रातील दुष्काळ हा 1972 च्या दुष्काळापेक्षा मोठा असेल. हा दुष्काळ निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य पाण्यासाठी भटकंती विहिरी कोरड्या, पाण्याची आगगाडी हे शब्द महाराष्ट्र वासियांसाठी आता नेहमीचेच झाले आहेत. कारण गेल्या काही मासांपासून दुर्दैवाने महाराष्ट्रातील सर्वच जनता अल्प-अधिक प्रमाणात कोरड्या दुष्काळाचा सामना करत आहे.

“मेरे देश की धरती, सोना उगले उगले हिरे मोती” या काव्यपंक्ती आता केवळ स्वप्नवतच वाटतील, अशी स्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. मध्यंतरी शासनाने 15 सहस्र 747 गावांमध्ये दुष्काळ असल्याचे घोषित केले. गेली 2 वर्षे अत्यल्प पडलेला पाऊस, वेळीअवेळी होणारी गारपीट आणि वाढती उष्णता यांची परिणती शेवटी दुष्काळात झाली.

या दुष्काळाची प्रामुख्याने दोन कारणे आहेत. एक निसर्गनिर्मित आणि दुसरे मानवनिर्मित.

निसर्ग आणि मनुष्य हे एकमेकांना खरेतर पूरक असायला हवेत पण दुर्दैवाने आज मनुष्यच निसर्गाच्या जिवावर या ना त्याप्रकारे उठला आहे. मग ती वृक्षांची अमाप केली जाणारी तोड असो, समुद्राच्या पाण्यावर केले जाणारे बांधकाम असो किंवा या सर्वांच्या मुळाशी असलेला स्वार्थीपणा असो. हा दुष्काळ माणसाला गिळंकृत करणारा आहे, हे चिंताजनक आहे. याचा मनुष्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. पर्जन्यमान कमी आणि लोकसंख्या वाढ याचा कुठेच ताळमेळ बसत नाही, पाण्याची मागणी वाढतच जाणार, मोठी धरणे पूर्ण लाभक्षेत्रास पाणी पुरविण्यास असमर्थ होत राहतील. हरितक्रांतीमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली हे जितके सत्य आहे तेवढेच काही चुका झाल्यामुळे घातक झाले आहे, रासायनिक खते, जंतुनाशके, तणनाशके, अनैसर्गिक बियाणे वापरामुळे पर्यावरणाचे संतुलन नष्ट झाले. पाणी, हवा, अन्न दूषित झाल्यामुळे माणसाचे व जमिनीचे आरोग्य कायमचे बिघडले. पाण्याचा स्त्रोत फक्त पाऊस आहे. निसर्ग. पाऊस, पाणी, हवा यांचा उपभोग घेण्याचे ज्ञान जलशास्त्राच्या दृष्टीकोनातून अवगत झाल्यावरच दुष्काळाची व टंचाईची जाणीव कमी होवू शकते. आपल्याकडे टंचाई अनेक प्रकारे जाणवू शकते. पाणीटंचाई, चाराटंचाई, अन्नटंचाई, शेतीत मजुरांची टंचाई या सर्व टंचाई विचाराच्या टंचाईतून बोकाळतात.

यावर मात करण्यासाठी जलसाक्षरता, जलसंवर्धन, पाणी वापर साठवणूकीचे प्रबोधन, ललित वाङमयाच्या माध्यमातून हसत खेळत रंजकपणे, कथा, कविता, लेख, पत्रकारिता व त्यांची परिणामकारकता निश्चितच वाढवता येईल या विचारातून सर्व जलतज्ज्ञांनी महाराष्ट्र सिंचन सहयोग या व्यासपीठावरून महाराष्ट्रभर जन हितोपयोगी विचारांची व प्रबोधनाची ज्योत तेवत ठेवणे आवश्यक आहे.

जलस्त्रोत आणि उपभोक्ता यांचे भावनिक, भौतिक, अध्यात्मिक, व्यवहारिक, सांस्कृतिक आदि नाते अतूट असते. संवर्धन, विनियोग, काळापासून इंग्रजांच्या आगमनापर्यंत हजारो वर्षे अबाधित राहिली. परंतु इंग्रज सत्तेने जलसंवर्धन, जलसंरक्षण व जलउपभोक्ता यांची विभागणी केली. संवर्धन व संरक्षण यांची जबाबदारी एकीकडे आणि उपभोक्ता एकीकडे (परावलंबी) त्यामुळे माझे पाणी हे आपुलकीचे नाते नष्ट झाले. दुष्काळाने असंख्य संकटे समोर मांडून ठेवली आहेत, मात्र याचा सर्वाधिक फटका बसला आहे, तो अर्थातच शेतकऱ्यांना पिकांची झालेली हानी, बेताची आर्थिक परिस्थिती, चाराटंचाई, पाणीटंचाई यांमुळे या दुष्काळाशी दोन हात करतांना हा शेतकरी राजा कोलमडून गेला आहे. पावसानेच दगा दिला, तर आशा तरी कुणाची करायची या चिंतेत शेतकरी असल्याने त्यांच्यासाठी प्रत्येक क्षण प्रत्येक वर्षच जणू काही दुष्काळमय झाले आहे. दुष्काळाने त्याचे जीवन उद्ध्वस्त झाल्यामुळे त्याच्याजवळ एकच उपाय उरला आणि तो म्हणजे गळफास लावून आत्महत्या करणे.

वर्ष 2015 मध्ये राज्यात सहस्रावधी शेतकऱ्यांनी आपले आयुष्य संपवले. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो, पण आज हाच कणा मोडून पडू लागला, तर अर्थव्यवस्था तरी कशी काय टिकेल, याचा राज्यकर्त्यांनी कधी गांभीर्याने विचार केला आहे का?

शेतकऱ्यांचे दुख हे धोरणाची अंमलबजावणी मध्ये नसून खरे तर ते शेतकरी विरोधी कायदयामध्ये आहे. शेती करण्यासाठी कधी मुक्त स्वातंत्र्य शेतकरी बांधवाना दिलेच नाही. सरकारने प्रथम शेतकरी विरोधी कायदे रद्द करावे आणि महाराष्ट्रातील जनतेला जलसाक्षर, हवामान साक्षर व संविधान साक्षर यासाठी प्रकल्प तयार करावे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतरही आपण इंग्रजांनी घालून दिलेले कायदेच अमलात आणत असल्याने संस्कृतीचा वेगाने ऱ्हास होत आहे. माणूस आणि जलस्रोत यांचा एकमेकांशी असलेला संबंधच तुटत आहे. त्यामुळे पावसामुळे धरणे जरी भरली, तरी आवश्यक तेवढे पाणी मिळतच नाही. त्यामुळे कायमच पाणी टंचाई सारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. पूर्वीच्या काळी खेडेगावे अधिक आणि शहरे अल्प असायची मात्र आता उलट झाले आहे. लोकसंख्येच्या विस्फोटामुळे शहरात ना शुद्ध अन्न, ना शुद्ध हवा, ना शुद्ध पाणी. शहरांना सिंचनाद्वारे केला जाणारा पाणीपुरवठा ही अल्प होत आहे. या सर्वांचाच परिणाम म्हणून भविष्यात भीषण अन्नटंचाईलाही सर्वांनाच सामोरे जावे लागणार आहे. येणारा काळ भयावह असेल, याची काही अंशीतरी कल्पना सध्याच्या दुष्काळावरून करता येईल.

100 मिमी पाऊस म्हणजे हेक्टरी 10 लाख लिटर. याचा अर्थ अवर्षणप्रवण भागात हेक्टरी ३० ते ५० लाख लिटर पाणी भूमीवर पडते. या भागातील दर चौ. कि.मी.ची लोकसंख्या घनता विचारात घेतल्यास माणसी 15 ते 25 लाख लिटर पाणी वर्ष 2014 च्या पावसाळ्यामध्ये मिळाले. एवढे पाणी किमान भरण पोषणांच्या आवश्यकता भागवण्यास नक्कीच पुरेसे आहे. या प्राथमिक साधन-साक्षरतेची आज नितांत आवश्यकता आहे. दुष्काळी जनतेची होणारी ससेहोलपट टाळावी, पशू-पक्ष्यांचे हाल होऊ नयेत, तसेच अन्नधान्य तुटवडा भासू नये, यासाठी दुष्काळाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा लागेल. पाणी हा विषय विज्ञान,तंत्रज्ञान, नियोजन आणि कृती यांच्याशी संबंधित आहे. या सर्वच स्तरांवर प्रयत्न केल्यास दुष्काळासारख्या भीषण समस्येवर काही प्रमाणात मात करता येईल. यासाठी शासनाने विविध पर्यायांचा अभ्यासपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. आज जलयुक्त शिवार, जलसंधारण, जलपुनर्भरण, रेनवॉटर हार्वेस्टिंग यांसारखे नवे प्रकल्प राबवले जात आहेत. मात्र याच जोडीला भूगर्भ पातळी वाढवण्यासाठीही सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. आज सर्वत्र केली जाणारी वृक्षतोड भूगर्भातील पाण्याची पातळी अल्प करत आहे.

वृक्ष संवर्धनानेच खऱ्या अर्थाने भूमातेला आणि पर्यायाने मानवाला पाणी लाभू शकते. यासाठी सर्वांनी वृक्षतोड थांबवून अधिकाधिक झाडे लावण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत. विकसित आणि अविकसित खेड्यांमध्ये जल नियंत्रणाच्या दृष्टीने उपाययोजना राबवायला हव्यात. लहान लहान बंधारे बांधणे, नदी-नाले यांतील गाळ काढणे यांकडे लक्ष द्यायला हवे. राज्याच्या या भागात शेतीला कोणताही पुरक व्यवसाय नाही. नद्या आहेत पण त्यावर धरणं बाधलेली नाहीत. एखादा व्यवसाय करायला कर्ज दिल्या गेलं तर त्याची परतफेड होईलच याची कोणतीही शाश्वती नाही, कारण कर्जाची परतफेड होण्याला तो व्यवसाय फायद्यात चालायला हवा. अशा पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात आजही लाखो लोक अशा परिस्थितीत जगत आहेत की त्यांना दोन वेळचं जेवण मिळण्याची भ्रांत आहे. कारण स्वार्थी राजकारणी वृत्तीने महाराष्टाच्या सगळ्या भागात सारखी विकासाची गंगा वाहिली नाही त्याचेच हे फळ आहे.

**लेखक:** मयुर बागुल, पुणे

**मोबाईल:** 9096210669

**ईमेल:** bagul.mayur@gmail.com

📖 ⌘ ✶

## स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारी! - विक्रम अरने.

स्पर्धा परीक्षा व त्यांच्या अभ्यासाची तयारी पदवीच्या सुरुवातीच्या वर्षा पासूनच क्रमाक्रमाने करणे आज खूपच गरजेचे आहे. कारण आजच्या घडीला स्पर्धा परीक्षांचा अभ्यास व त्यांच्या अभ्यासासाठी दिवस-रात्र एक करणारे, यांची स्पर्धा ही परस्परांशी सुरू आहे.

आज स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्यापूर्वी प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारणे गरजेचे आहे तो म्हणजे हा अभ्यास मी खरेच माझ्या मनाला वाटत आहे म्हणून मी करत आहे का? यातील यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेण्याची माझी शारीरिक आणि मानसिक तयारी झालेली आहे का? आणि जर या प्रश्नांची उत्तरे सकारात्मक असतील तरच या आव्हानांचा सामना करावयास सज्ज व्हावे आणि अशातही या परीक्षांचा काटेकोरपणे नियोजन करून अभ्यास जरी केला तरी यश मिळेलच याची खात्री नसते. त्यामुळे आपण निराश न होता प्रयत्न करतच राहावे.

स्वतःवर विश्वास ठेवून आपण यशस्वी होण्यासाठी आणखी कशा प्रकारे आपल्या अभ्यासाच्या नियोजनात बदल करणे आवश्यक आहे. गरज पडल्यास तज्ञांची मदत घ्यावी. विशेष संदर्भ पुस्तकांचा, नियमित पाठ्यपुस्तकांचा अभ्यास करावा.

स्पर्धा परीक्षांमधून काय मिळणार हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न असतो. तर एक सामान्य व खरे उत्तर म्हणजे सरकारी अशी कायम स्वरूपाची नोकरी तसेच त्या शासकीय नोकरी बरोबर मिळणारा मानमरातब व रुबाब. केंद्र शासनाच्या यू.पी.एस.सी. व राज्य शासनाच्या एम.पी.एस.सी च्या वर्ग-1 च्या पदावर निवड झाल्यास मिळणारा अधिकारी पदाचा दर्जा, लाल दिव्याच्या गाडीचे असणारे आकर्षण, दिमतीला असणारा कनिष्ठ अधिकारी व सेवक वर्ग, प्रशासनातील प्रत्येक निर्णय घेण्यात असणारा आपला सहभाग, आपल्या निर्णयाला असणारे महत्त्व या सर्व गोष्टी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास आपण यशस्वीपणे पूर्ण केल्यास मिळू शकतात.

आता पुढची तयारी म्हणजे वरील परिच्छेदात जे काय सांगितले आहे ते सर्व मिळण्यासाठी एक विद्यार्थी म्हणून काय व कशी तयारी करावी लागेल.

तर अशा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी सर्वप्रथम आपल्या दैनिक कार्यक्रमाचे नियोजन करावयास हवे. ज्यात आपण सकाळी झोपेतून उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत काय व कसा अभ्यास करावा याचे तंत्रशुद्ध वेळापत्रक करावयास हवे. त्या वेळापत्रकाचा काटेकोरपणे पाठपुरावाही करावयास हवा. कदाचित सुरुवातीचे काही दिवस या सवयींचे नियमन व पालन करणे आणि स्वतःला समजावणे हे खूप अवघड वाटेल परंतु या सर्व गोष्टींवर मात करून जर आपण हे सर्व पालन करायचेच असा दृढनिश्चय करून स्पर्धा परीक्षेत मी काही झाले तरी यशस्वी होणारच ही खूणगाठ मनाशी पक्की बांधण्यात यशस्वी झालात तर तुमच्या स्पर्धा परीक्षेतील अर्ध्या विजयाची खात्री येथेच मिळालेली असते. उर्वरित यश हे तुम्हाला तुमच्या या अभ्यासाच्या सहाय्याने मिळणार असते!

उदाहरण सांगायचे झाल्यास:

समजा, एकदा एक महाविद्यालयाची मुलगी तिची स्कुटी गाडी घेऊन महाविद्यालयाला निघालेली असते.

महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेचा अभ्यास कसा करावा? या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन केलेले असते. ती मुलगी महाविद्यालयात येते त्या व्याख्यानास उपस्थित राहते व ती खूप भारावून जाते. आपणही स्पर्धा परीक्षा देऊन यशस्वी व्हावे असे ती मनाशी ठरवते. तसेच खूप मन लावून दिवस रात्र एक करून अभ्यास करायचा असा ठाम निर्णय ती घेते. व्याख्यान सुटल्यानंतर भारावलेल्या अवस्थेतच ती तिच्या उर्वरित तासांना उपस्थित राहते व महाविद्यालय संपल्यानंतर ती घरी येण्यास निघते.

ती मोठ्या ऐटीत पार्किंग मधली आपली स्कुटी गाडी काढते. तिला आता तिची स्कुटी गाडी म्हणजे जणू लाल दिव्याची गाडीच वाटू लागलेली असते तसेच तिची गाडी पार्किंग गेट मधून सोडणारा चौकीदार हा एखाद्या अधिकाऱ्यास सॅल्युट ठोकणाऱ्या सेवेकऱ्यासारखा वाटू लागलेला असतो.

ती गाडी घेऊन घराच्या दिशेने निघते. परंतु दोन अडीच किलोमीटर गेल्यावर तिची गाडी रस्त्यातच बंद पडते ती गाडी पुन्हा सुरू करण्याचा खूप प्रयत्न करते. परंतु काही केल्या गाडी सुरू होत नाही. ती निराश होते ती डिक्की खोलून टूलकिट बाहेर काढते. काही करता येईल याची चाचपणी करते की जेणेकरून आपली गाडी सुरू होईल व आपण लवकर घरी जाऊ. पण तिच्या पदरी निराशाच येते.

तिची हतबलता पाहून आसपासचे नागरिक तिला सांगतात पुढे शंभर मीटरच्या अंतरावर एक गॅरेज आहे गाडी घेऊन तिथे जा. तिला बरे वाटते ती त्वरित या ठिकाणी गाडी ढकलत घेऊन पोहचते. मेकॅनिक हातातले काम सोडून तिच्या गाडी जवळ येतो तिच्याकडे गाडीला काय झाले याची विचारपूस करतो, थोडावेळ गाडीकडे पाहतो मग आपली अवजारे आणतो व इंजिन जवळ त्याच्याजवळ असणाऱ्या हातोड्याने अंदाज घेऊन एक हलकासा प्रहार करतो व त्या मुलीला म्हणतो "ताई , चावी ऑन करून स्टार्टर द्या व गाडी स्टार्ट करा."

ती मुलगी स्वतःशीच म्हणते काय वेडा आहे का हा? मी तासभर प्रयत्न करत होते तरी गाडी सुरू नाही झाली आणि हा शहाणा एकच हथोडी मारून म्हणतोय करा सुरू.

तिने नाईलाजानेच गाडीला चावी लावून स्टार्टर ऑन केला आणि काय आश्चर्य!

गाडी क्षणात सुरू झालेली होती. तिने मेकॅनिकला धन्यवाद दिले व सकाळच्या असणाऱ्या तोऱ्यात तिने विचारले ,

"दादा, किती पैसे झाले?"

यावर मेकॅनिक तितकाच नम्रपणे म्हणाला "ताई ,एक हजार रुपये झाले."

त्यावर ती मुलगी क्षणभर उडालीच. म्हणाली ,

"अहो तेवढा एकच हाथोडा मारायचे एक हजार रुपये? वेड लागल आहे की काय ? मला सांगायचे मी मारला असता"

तिच्या या आवेशावरही जराही संयम ढळू न देता तो मेकॅनिक उत्तरला.

"ताई, हातोडा मारायचा तर मी केवळ एकच रुपये घेतला आहे पण बाकीचे नऊशे नव्याण्णव रुपये हे मात्र मी हातोडा कुठे मारायचा याचे घेतलेत!"

यावर ती मुलगी ओशाळवाणे होऊन निमूटपणे एक हजार रुपये त्या मेकॅनिकच्या हातावर ठेवून आपल्या घराच्या दिशेने गाडी घेऊन निघून गेली.

वरील उदाहरणात स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने सांगायचे तात्पर्य एवढेच की आपण जो अभ्यासक्रम निवडला आहे त्याचा अभ्यास नेमका असायला हवा. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास आपण जीवनात सर्वजण करत असतो परंतु नेमका अभ्यास कसा करावा? कोणती पुस्तके व प्रकाशने यांचा संदर्भ घ्यावा? कोणाचे मार्गदर्शन घ्यावे? या सर्व प्रश्नांची नेमकी आणि अचूक उत्तरे मिळाली तरच आपल्या स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचा राजमार्ग खुला होईल यात मात्र शंका नाही.

भारतीय परंपरेत म्हटले आहे की 'न ही ज्ञानेन सदृश्य, पवित्र इहमिद्यते'. ज्ञानसंचित गोळा करण्यापेक्षा पवित्र अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाही. तेव्हा स्पर्धा परीक्षा देताना जर पैसा, कीर्ती, मान अशा गोष्टी दुय्यम स्थानी ठेवून ज्ञानसाधना

केली, तर निराश होण्याची वेळ येणार नाही. मर्यादित जागा असल्याने प्रयत्न, चिकाटी, मेहनत, धाडस असे सर्व गुण आत्मसात करूनही व संपूर्ण झोकून देऊन प्रयत्न करूनही यश मिळेल, असे नाही.

अशावेळी जेव्हा प्रयत्न संपल्यावर निराशा येते, तेव्हा बाकी उरेल, ते उमेदवाराने मिळवलेले ज्ञानसंचित. जर त्याने खरोखरच मनापासून अभ्यास केला असेल, तर यानंतर तो ज्या क्षेत्रात प्रवेश करेल (नव्याने सुरुवात करताना सुरुवातीची वर्षे खडतर असतील हे जमेस धरूनही) त्यात आपला ठसा उमटवल्याशिवाय राहणार नाही. शेवटी अधिकारी होणे हे साधन आहे व समाजासाठी योगदान देणे साध्य.

साध्य-साधन विवेक सुटला, तर आत्महत्येची वेळ येते. तेव्हा आपल्या प्रेरणा जर चुकीच्या पायावर उभ्या असतील, तर त्यांना आत्ताच सुधारून घ्या. यश मिळेलच, पद मिळवल्यावर किंवा पद न मिळवूनसुद्धा. शुभेच्छा!

**लेखक:** श्री विक्रम अरने.

**ईमेल:** vikramarne@gmail.com

**मोबाईल**: 09975252587

***(लेखक हुजूरपागा महिला वाणिज्य महाविद्यालय, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक आहेत)***

📖 ⌘ ✶

## मार्कंडा महादेव मंदिर, गडचिरोली - प्रतिक पुरकर

विदर्भातील 'प्रति खजुराहो' म्हणवले जाणारे मार्कंडा महादेव मंदिर महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात तालुका चामोर्शी पासून जवळच वैनगंगा नदीच्या तीरावर आठव्या शतकात बांधल्या गेले आहे. हे मंदिर शैव संप्रदायाचे असून भगवान शंकराच्या पूजा-अर्चना करिता बांधलेले आहे. या मंदिराचे नामकरण हे हरियाणातील मार्कंडेय ऋषींच्या नावावर आहे.

येथे स्थानिकांत अशी आख्यायिका सांगण्यात येते की, भगवान शंकराच्या कृपेने जन्म घेतलेले मार्कण्ड ऋषी हे वयाच्या सोळाव्या वर्षी मृत्यूला सामोरे जाणार होते. आपल्या वडिलांच्या इच्छेखातर वयाच्या चौदाव्या वर्षी मार्कंडेय ऋषींनी येथे शंकराची तपश्चर्या केली. यावर प्रसन्न होऊन भगवान शंकरांनी मार्कण्ड ऋषींचा वयाच्या सोळाव्या वर्षी होणारा मृत्यू परतवून लावून त्यांना चौदा कल्पजीवनाचा आशीर्वाद दिला.

पूर्व विदर्भातील सर्वात मोठ्या अशा वैनगंगा नदीच्या तीरावर चामोर्शी पासून सात किलोमीटर दूर या ठिकाणी हे मंदिर चौदा एकर परिसरात विस्तारलेले आहे. येथे दक्षिणेकडे वाहणारी नदी उत्तरवाहिनी आहे. या मंदिराला वळसा घालून परत ही नदी दक्षिणवाहिनी होते. यामधील उंचवट्यावर हे मंदिर वसलेले आहे.

मंदिराचे आयुष्य साधारण बाराशे वर्ष आहे. हे मंदिर आठव्या शतकात 'एलिचपूर' सध्याचे 'अचलपूर' येथे राजधानी असलेल्या राष्ट्रकूट राजे यांच्या काळात बांधल्या गेल्याचे आढळते. मंदिराचे बांधकाम हे स्थानिक बेसाल्ट दगडाचे आहे. नदीच्या पात्राजवळच आढळणारे हे काळे, लाल काळे दगड सांधुन एकमेकांवर रचलेले आढळतात. त्याकरिता चुना व इतर नैसर्गिक चिकट रसायन घटक म्हणून वापरले आहेत व त्याआधारे दगड एकमेकांवर रचून नंतर कोरीव काम करण्यात आले आहे. मंदिराचा बाह्यभागावर कलाकुसर व कोरीव काम क्वचितच आढळते किंबहुना ते टाळलेले दिसते. एकंदरीत रचनेवरून हे मंदिर हेमाडपंथी बांधकाम शैलीचे जरी वाटत असले तरीही ते तसे नाही कारण दगडांना जोडण्याकरिता वापरण्यात येणारे चुना व इतर रसायनांचे मिश्रण हे हेमाडपंथी शैलीत आढळत नाहीत व ही शैली यादवकालीन आहे राष्ट्रकूटांची नाही, परंतु मंदिर हे टणक दगडात असूनही अत्यंत आखीव-रेखीव व सुबक बांधण्यात आलेले आहे.

सदर परिसरात मुख्य मंदिरासोबतच इतरही मंदिर आहेत. यामध्ये दशावतार मंदिर, मारुती, गणपती व इतरही आहेत परंतु मुख्य मंदिर हे भगवान शंकराचे म्हणजेच 'मार्कंडेय' या नावाने प्रसिद्ध आहे. जे साधारण दोनशे वर्षांपूर्वी विद्युल्लता पातामुळे भंग पावले होते. त्याच्या जीर्णोद्धाराचे काम आता पुरातत्व विभाग भारत सरकारच्या अंतर्गत सुरू आहे. हे मंदिर व परिसर या पूर्वीच 'वर्ल्ड हेरिटेज साईट' म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

कळसाचा आकार व शैलीही उत्तर भारतीय मंदिराप्रमाणे आढळते. ज्या खाली शिखरावर क्लिष्ट पद्धतीचे जाळीदार किंबहुना गुढ वाटावे असे कोरीवकाम केलेले आहे. मंदिर व सभामंडपाच्या पृष्ठभागावर चितारण्यात आलेल्या कोरीव शृंगारिक भावातील मूर्त्यांमुळे यास 'प्रति खजुराहो' अशी बिरुदावली मिळाली आहे. परंतु ह्या मुर्त्यांचा भाव उत्सवी स्वरूपाचा आहे. रतिक्रिडा वा मिथुनरत नाही ज्यामध्ये वस्त्रालंकारीत ब्रम्हा, विष्णू व महेश तिघेही सपत्नीक चितारण्यात आलेले आहे. सोबतच विविध प्राणी, पक्षी व देवगंधर्व, यक्ष यांच्या प्रतिमा पाहण्यास मिळतात. या सर्व प्रतिमा एक पुरुष उंचीवर कोरण्यात आलेल्या आहेत. साधारणता पूर्ण वाढ झालेल्या संसारी पुरुष व स्त्रियांच्या नजरेच्या टप्प्यात भराव्या अशा ठिकाणी त्या आहेत व सपत्नीक त्रिमूर्ती देखील हेच दर्शविते की हे मंदिर संसारिक स्त्री-पुरुषांकरिता इतर मनुष्य, पशूपक्ष्यांसह आनंदित राहण्याचा व दीर्घ आयुष्य जगण्याचा जसा साक्षात्कार मार्कंडेय ऋषींना झाला तसा मार्ग सांगतात. यातील बहुतेक शिल्प आपल्याला इतर हिंदू मंदिरातही आढळतात ते येथेही आहेत. जसे हत्तीवर विजय मिळवित असलेल्या मुद्रेतील सिंह जो प्रत्येक मंदिरात दर्शनी स्थानी असतो. जो भाविकांना मार्ग

दाखवितो अशीच त्याची रचना असते. तसेच कोपऱ्यांवर आढळणारे यक्ष किन्नर यांच्या मुर्त्या मध्यभागी असलेल्या मुख्य देवतांच्या मुर्त्या या दरम्यान नृत्य,गायन,वादन ह्या मुद्रेतील मग्न नर्तिका चितारलेल्या आहेत.

एकंदरीत उत्कृष्ट वास्तुकलेचा नमुना असलेल्या या मंदिरामुळे आपले तत्कालीन कला, स्थापत्य ज्ञानामुळे राजकीय, सामाजिक आर्थिक स्थितीची कल्पना येते. मूर्तीवरील अलंकार वस्त्र हे तत्कालीन लोकजीवनाचा आढावा देतात. त्यामुळेच असे हे पुरावे जतन करणे आवश्यक आहे व भारत सरकार पुरातत्व विभागाने याचा जो पुनर्विकास चालवलेला आहे तो योग्य आहे त्याकरिता आपल्या सरकारला धन्यवाद.

**लेखक**: आर्कीटिक्ट प्रतिक पुरकर. नागपूर. B.Arch., MBA

**मोबाईल:** 8600430005

**ईमेल:** pratikppurkar@gmail.com

***(लेखक नागपूर येथील प्रसिद्ध आर्किटेक्ट असून त्याना समाज कार्याची फार आवड आहे)***

📖 ⌘ ✶

## नाशिकची त्रिरश्मी लेणी - अजित मुठे

नाशिक - मुंबई रस्त्यावर अंजनेरी डोंगर रांगेत साधारणत: 70 मीटर उंचीवर एकुण 24 लेण्यांचा समुह कोरलेला आहे. या लेण्या बुध्दधर्मियांच्या असुन प्रामुख्याने हिनयान पंथीयांच्या आहेत. 24 पैकी 22 लेणी हिनयान पंथी, 2 महायान पंथीयांनी कोरलेल्या आहेत. 22 पैकी 5 शैलगृहे नंतर महायान पंथियांनी ताब्यात घेवून त्यात बुध्दाच्या मुर्ती कोरविल्या तर एक लेणे 11 व्या शतकात जैन धर्माच्या वापरात आले. महायान पंथातील भद्रयानीय संघाचा येथे मोठाप्रभाव होता.

वास्तुशास्त्राच्या दृष्टीने येथील लेण्यांचे चार प्रकार पडतात.

1) चैत्यगृह - लेणी क्रं. 18

2) लेणी - लेणी क्रं.1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,19,20,22,23,24

3) मटप - लेणी क्रं. 21

4) पोढी (पाण्याची कुंडे) - एकुण - 10

लेणी क्रं - 1 :-

हे लेणे पाण्याचा प्रवाह दगडातून वाहु लागल्यामुळे अपुर्णावस्थेत सोडुन दिलेले आहे. या लेण्यात पाण्याचा साठा करुन नंतर पाण्याच्या वापराकरीता या लेण्याचा उपयोग केल्याचे आढळते.

या अपूर्ण लेण्याचे विधान व दर्शनी भागावरील नक्षी याच्या आधारे हे लेणे इ. स. च्या दुस-या शतकाच्या पुर्वार्धात कोरले असावे असे दिसते. लेणे क्रं.3 शी हे लेणे जुळते आहे. लेणे अपूर्ण असले तरी लेणी कशी कोरली जात याची कल्पना या लेण्यावरुन येते.

लेणी क्रं. 2 :-

हे एक साधे व छोटे लेणे असुन यात एक सभागृह, व्हरांडा व त्याच्यामागच्या बाजुला दोन छोटया खोल्या अशी रचना आहे. या लेण्यात एक खराब झालेला शिलालेख आढळतो. (शिलालेख क्रं. 1) त्यात आज फक्त वासिष्ठीपुश फुळुमावीच्या (पुलुमावी) राज्यरोहणापासुन नंतरच्या 6 व्या वर्षाचा उल्लेख वाचता येतो.

लेणी क्रं. 3 :-

राणीचे लेणे तथा गौतमीपुत्राचे लेणे म्हणुनही हे लेणे ओळखले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील शैलगृहांचा कालक्रम मांडण्यासाठी या लेण्याचा फार महत्वाचा उपयोग होतो. या लेण्यात चार शिलालेख असुन हे लेणे तीन वेगेवगेळया कालखंडात कोरले गेले. वेगवेगळया कालखंडात लेण्याची अवस्था, तत्कालीन वास्तुशास्त्र व त्यास जोड देणारा शिलालेखाचा पुरावा या तिन्ही गोष्टींची सांगड घातल्यावर शैलगृहांचा काळ, वास्तुशास्त्रात झालेले बदल व प्रयोग त्यातील प्रगती यांची कल्पना येते.

या लेण्यात 18 छोटया खोल्या असलेले सभागृह, व्हरांडा, व्हरांडाच्या टोकाला एकेक लहान खोली अशी रचना असलेल्या विहार असुन त्यात बौध्दभिक्षुंची राहण्याची सोय असे.

याचे प्रवेशव्दार सांचीच्या स्तुपाच्या प्रवेशव्दारासारखे असुन त्याला तोरणा सारखा आकार दिलेला आहे. दोन्ही बाजुला हातात कमळ घेतलेल्या पुरुष मुर्ती कोरलेल्या असुन व्हरांडयातील खांबही वैशिष्टयपूर्ण आहेत. या खांबावर हत्ती, बैल,

सिंह, वाघ, बकरी यासारख्या प्राण्यांवर स्वार झालेल्या मनुष्याकृती कोरलेल्या असुन काही प्राण्यांची तोंडे पक्ष्यांसारखी आहेत.

या लेण्यात चार शिलालेख आहेत. हे सर्व लेख व्हरांडयात कोरलेले आहेत. सर्वात जुना लेख व्हरांडयाच्या डावीकडे असुन गौतमीपुत्र सातकर्णीच्या राज्यरोहणच्या 18 व्या वर्षी कोरला आहे. या लेखात गौतमीपुत्र सातकर्णी याने बेष्णाकर या ठिकाणाहुन काढलेल्या हुकूमान्वये पश्चिम करवडी ( अपरक) गावातील उसभदात याच्याकडे असलेली 200 निवर्तने जमिन ते किरसी येथील भिक्षुंना देण्यात आली. दुसरा शिलालेख गौतमीपुत्र सातकर्णीच्या राज्यरोहणानंतरच्या 24 व्या वर्षी लिहीला गेला असुन त्यानुसार गौतमीपुत्र सातकर्णी व राजमाता यांच्या आदेशान्वये पुर्वी करवडी गावातील दिलेल्या जमिनी ऐवजी गोवर्धनच्या हददीतील असलेली जमिन तिरष्हुक लेण्यातील भिक्षुंस दान दिली आहे. तिस-या लेखात वासिष्ठपुत्र पुळुगावी याच्या राज्यारोहणा नंतरच्या 19 व्या वर्षात हे लेणे गौतमी बलश्री, वासिष्ठ पुत्राची आजी, हिने कोरविले व भदायनीय संघास दान दिले. तसेच सुदिसन, वसामलीपद ही दोन गावे दान दिली. चौथा लेख वासिष्ठपुत्र पुळगावी च्या 22 व्या शासन वर्षात कोरलेला असुन त्यात राणी लेण्यात राहणा-या श्रमणांना पिसाजी पद हे खेडे दान दिले असुन त्यात पुळुगावीने जिंकलेल्या प्रदेशांचा उल्लेख आहे.

शिलालेख व वास्तुशास्त्राच्या आधारावर हे लेणे तीन वेगवेगळया कालखंडात कोरले गेले असुन याचा कालखंड इ.स. 124 ते इ. स. 149 हा आहे.

लेणे क्रं. 4 :-

हे लेणे आज पूर्णपणे बदलेल्या अवस्थेत आहे. मुळची जमीन आणखी खोलवर कोरुन याचे पाण्याच्या टाक्यात रुपांतर करण्यात आले. दगडात मोठया प्रमाणावर दोष आढळल्यामुळे हे लेणे खोदणे सोडुन देण्यात आले. हे लेणे इ.स. 150 च्या आसपास कोरले असावे. हे लेणे क्रं. 2 शी साधर्म्य दाखविते व लेणे क्रं. 3 च्या शेवटच्या टप्प्यातील परंपरेशी साद्दश्य दाखवतो.

लेणे क्रं. 5 :-

हे सुध्दा नंतरच्या काळात पाण्याच्या टाक्यात रुपांतरीत करण्यात आले.

लेणे क्रं 6 :-

हे लेणे साधे असले तरी शिलालेख व वास्तुशास्त्राच्या आधारे साधारणत: इ.स. 200 इतका मानला आहे.

शिलालेखातील उल्लेखाप्रमाणे हे लेणे गृहपती, व्यापारी वीर याने त्याची पत्नी नंदसिरा व कन्या पुरिस दत्ता यांना दान दिले.

लेणे क्रं. 7 :-

हे साधे लेणे असुन यात दगडी बाक कोरलेला आहे.

चारही दिशातील भिक्षु संघाच्या उपयोगासाठी सवस याची शिष्या भिक्षुणी तापसिनी हिने हे लेणे दिले असुन याचे खोदकाम इ.स. च्या तिस-या शतकात झाले.

लेणे क्रं. 8 :-

या लेण्यात दोन लेख कोरलेले आहेत. एका लेखात चेतिक संघाच्या मुगुदासाने हे दान दिल्याचे नमुद आहे. तर दुस-या लेखात मुगुदासाचा उल्लेख चेतिक उपासक असा केला आहे. हे लेणे इ. स. तिस-या शतकाच्या उत्तरार्धात खोदले गेले आहे.

लेणे क्रं. 9:-

हे लेणे दोन टप्यात खोदले गेले आहे. हे लेणे इ. स. च्या दुस-या शतकात कोरले गेले आहे.

लेणे क्रं- 10 :-

यास नहपानाचे लेणे म्हणुन ओळखतात. यात 6 शिलालेख असुन वास्तुशास्त्राच्या दृष्टीकोनातुन लेणे क्रं.3 प्रमाणेच याचे महत्व आहे.

या लेण्यात चार खांब व दोन अर्धखांब असलेल्या व्हरांडा, एक सभामंडप व त्यात 16 खोल्या आहेत. सभा मंडपाच्या मागच्या भिंतीत स्तुप उठावात कोरला आहे. ओवरीचे खांब वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या खांबाना तळाशी पाय-या असून वर घट आहे. वरच्या टोकीला उलटया घंटेसारखे अलंकरण असुन त्यावर एकमेकांकडे पाठ करुन बसलेले वाघ, स्फिंक्स, शिंग किंवा शिंगा शिवाय बोकड, बैल, हत्ती व सिंह आहेत. त्याशिवाय वाघाचे शरीर व पक्ष्याप्रमाणे चोच असलेले प्राणीही आहेत.

यात सहा शिलालेख असुन त्यापैकी 3 उसवदाताचे 3 त्याच्या पत्नीचे व एक आभीरनृपत ईश्वरसेन याचा आहे. या शिलालेखात उसवदाताने त्रिरश्मी डोंगरातील लेण्याचे दान दिल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे उसवदाताच्या पत्नीने दान दिल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे आभिरराजा ईश्वरसेन याने श्रमणांच्या औषधासाठी एका श्रेणीत पैसे गुंतविल्याचा उल्लेख आहे.

वास्तुशास्त्राच्या दृष्टीने हे लेणे महत्वाचे आहे. उसवदात (ऋषभदत्त) हा शक होता व तो नहपान या क्षत्रपाचा जावई होता. शैलगृहाच्या वास्तुशास्त्रात नविन गोष्टींची भर व पक्ष्याप्रमाणे चोच असलेले प्राणी हे अभारतीय प्रकार या कालावधीत कोरले गेले. इ.स. 120 मध्ये हे लेणे खोदले गेले.

लेणे क्रं. 11 :-

हे लेणे तिस-या शतकाच्या सुरुवातीला कोरले असावे. हे लेणे क्रं. 4 शी साधर्म्य दर्शविते. या लेण्यातील शिलालेखात रामनक याने हे लेणे दान केल्याचा उल्लेख आहे. इ. स. 11 व्या शतकात जैन धर्मीयांनी हे लेणे ताब्यात घेवून त्यात ऋषभदेव, अंबिका, वीर मणीभद्र यांच्या मुर्ती कोरल्या.

लेणे क्रं. 12 :-

लेण्यातील शिलालेखावरुन रामनक या वेलीदत्ताच्या मुलाने भिक्षुसंघाला वस्त्र पुरविण्यासाठी श्रेणीत पैसे गुंतविल्याचा उल्लेख आहे. लिपीवरुन हे लेणे इ.स. च्या 3 शतकाच्या उत्तरार्धात कोरले.

लेणे क्रं. 13 व 14 :-

ही लेणी साधारणत: लेणी क्रं. 3 च्या कालखंडात कोरली आहेत.

लेणे क्रं. 15 :-

हे लेणे महायान पंथियांनी इ.स.5 व्या शतकात कोरले. यात सिंहासनावर बसलेले बुध्द असुन दोन्ही बाजुस नागराजही कोरलेले आहेत. शिवाय बोधिसत्व दाखविले आहेत.

लेणे क्रं. 16 :-

मुळचे हिनयान पंथियांचे लेणे महायान पंथियांनी आपल्या ताब्यात घेवून त्यात बुध्दमुर्ती, बोधीसत्व, इंद्र, पदमपाणी, वश्रपाणी यांची शिल्पे कोरली. इ.स.6 व्या शतकात या मुर्ती कोरल्या.

लेणे क्रं. 17 :-

सर्वाधिक नासधुस झालेले मात्र वास्तुशास्त्राच्या दृष्टीने महत्वाचे लेणे होय. या लेण्यातील शिलालेखात दत्तमितीचा रहिवासी व उत्तरेकडील यवनधमदेवाचा पुत्र इंद्राग्निमित्र याने तिरष्णु पर्वतावर चैत्य लेणे व कुंड खोदल्याचा पुरावा मिळतो.

लेणे क्रं. 18 :-

हे लेणे म्हणजे चैत्यगृह असुन यात 17 खांब आहेत. या सभागृहाचे छत गजपृष्ठकार असुन यावर तुळया सारख्या दगडाच्या पटया कोरलेल्या व त्या शेजारी लहान छिद्रे आहेत. त्यात लाकडाच्या पटटया अडकविल्या जात असाव्यात. प्रवेशव्दार चौकोनी असून त्यात लाकडी दरवाजे अडकविण्या करिता छिद्रे पाडलेली आहेत.

या लेण्यात 3 शिलालेख आहेत. प्रवेशव्दाराच्या वरच्या शिलालेखात धम्मिक-ग्राम-निवासींची देणगी असा उल्लेख आहे. यक्षमुर्तीच्या वरच्या दुस-या शिलालेखात नदसिरीया व आणखी एका व्यक्तीचे नाव नमुद आहे मात्र ते झिजले आहे. तिस-या शिलालेखात महाहकुसिरी भटपालीका हिने हे चैत्यगृह कोरविल्याचा उल्लेख आहे. या लेण्यांचा काळ इ.स.पुर्व 120 ते इ.स.120 मानला जातो.

लेणे क्रं. 19 :-

या लेणी समुहातील सर्वप्रथम कोरले गेलेले लेणे आहे. यात एक शिलालेख असुन नासिकचा महामात्र समन याने दान दिल्याचा उल्लेख आहे. हा लेखपहीला सातवाहन राजा कव्ह(कृष्ण) याच्या कारकीर्दीतला असून याचा कालवधी इ.स.पुर्व 205 ते 187 मानला जातो.

लेणे क्रं. 20 :-

हे लेणे दोन वेगवेगळया कालखंडात कोरले गेले. मुळचे लेणे शिलालेखातील माहितीनुसार, बोपकी नावाच श्रमणाने कोरविले व अपूर्ण असलेले हे लेणे वासु,भवगोप या सेनापतीच्या पत्नीने पूर्ण केले. या लेण्यातील शिलालेखात गौतमीपुत्र सतकर्णीचे 7 वे शासनवर्ष नमुद केलेले आहे. म्हणजे हे काम इ.स.179 या वर्षी करण्यात आले. त्यानंतर 400 वर्षांनी महायान पंथियांनी सभागृहाची मागची भिंत पाडली व एक गर्भगृह व 2 खोल्या खोदल्यात. गर्भगृहात बुध्दशिल्प असुन शिंग असलेले 2 सिंह कोरण्यात आले आहेत. या लेण्यात दोन शिलालेख असून उपासिका मम्माहिने दिलेल्या लेण्याच्या देणगीचा उल्लेख आहे.

लेणे क्रं. 21 :-

यात फक्त सभागृह आहे. कदाचित हे सत्र असावे.

लेणे क्रं. 22 :-

यात सभागृह, एक खोली व एक अपूर्णावस्थतेतील खोली आहे.

लेणे क्रं. 23 :-

मुलत: 5 ते 6 वेगवेगळया लेण्या असलेल्या हा समुह मधल्या भिंती नष्ट झाल्याने एकच लेणे झाले आहे. यातील काही भाग हिनयान पंथीयांनी तर काही महायान पंथियांनी कोरला आहे. महायान पंथीयांनी बुध्द मुर्तीची भर घातली. यातील शिलालेखानुसार वासिष्ठपुत्र श्री. पुळमावीच्या काळात म्हणजे इ.स. 132 मध्ये काही भाग कोरला तर महायान पंथीयांनी इ.स.च्या 5 व्या शतकात बुध्दमुर्ती कोरल्यात.

लेणे क्रं. 24 :-

यात सुध्दा एकापेक्षा जास्त लेणी मधल्या भिंती नष्ट झाल्याने एकच लेणे तयार झालेले आहे. याच्या दर्शनी भागावर बौध्द धर्माचे चिन्ह कोरलेले असून वरच्या पटटयावर प्राण्यांवर स्वार झालेली मुले दर्शविलेली आहेत. यात वाघ व घुबड या प्राण्यांचाही समावेश आहे. यात एक शिलालेख असुन त्यानुसार दशपुरचा रहिवासी एक शक व्यक्ती याने दिल्याचे कळते. लिपीच्या व वास्तुशास्त्राच्या आधारावर हे लेणे इ.स. 120 च्या आसपास कोरले असावे.

-: पांडव लेण्यातील शिलालेख :-

त्रिरश्मी लेण्यातील शिलालेखातुन ऐतिहासिक दृष्टयाच नव्हे तर राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक दृष्टया महत्वपूर्ण अशी माहिती उपलब्ध होते.

दक्षिणापथावर म्हणजे महाराष्ट्रावर राज्य करणा-या सातवाहन राजघराण्याचे या लेण्यातुन 9 लेख बघावयास मिळतात. सातवाहनांचे समकालीन व त्यांना शह देणारे पश्चिमी क्षत्रप या राजघराण्याशी संबंधीत 5 लेख बघावयास मिळतात. सातवाहन राजवंशाचा सर्वात प्राचीन लेख लेणे क्रं.14 मध्ये आहे. या लेखांची लिपी प्राचिन ब्राहमी व भाषा प्राकृत आहे.

या लेण्यातील लेखांचे स्टिव्हन्सन, ब्रेट, सेनार्ट, पिशेल, एडवर्ड वेस्ट, ऑर्थरवेस्ट, फ्रिके, रा. गो. भांडारकर, भगवानलाल इंद्रजी, रॅप्सन, मिराशी इत्यादी तज्ञांनी त्याचे वाचन करुन त्यावर अभ्यासपूर्ण मते मांडली आहेत.

**लेखक:** अजित मुठे, नाशिक

**ईमेल:** ajitmuthe@yahoo.com

**(लेखक हौशी प्रवासी आहेत. संबंधित फोटो अंकाच्या शेवटी बघा)**

📖 ⌘ ✶

## आफ्रीका आणि यु.ए.ई ! - अविनाश लोंढे

*(मी खरगपूर आय आय टी येथून एम टेक केले असून माझ्या बेधुंद या चारोळी संग्रहाचे सिंधुताई सकपाळ यांच्या हस्ते प्रकाशन झाले. तसेच आय आय टी खरगपूर येथे मी महाराष्ट्र मंडळाचा सांस्कृतिक सचिव होतो. माझे मित्र 'निमिष सोमार' यांनी विनंती केली की माझ्या परदेशातील अनुभववार एखादा लेख लिही, कोणत्याही एखाद्या देशातील प्रवासवर्णन किंवा अनुभव ! माझ्या 'मेहता पब्लिशिंग हाऊसने' पब्लिश केलेल्या 'बेधुंद' ह्या कॉलेज विश्वावर आधारित कादंबरीनंतर मी अजूनतरी दूसरे काही लिहायला घेतले नाही! तेव्हा हा लेख कसा वाटला जरूर कळवा!)*

मग मला प्रश्न पडला की नेमक्या कोणत्या देशबद्दल लिहावे? मग वाटले दोन देशांबद्दल लिहावे - जिथे मी भेट दिली आहे ते! आफ्रिकेतील इथिओपिया आणि इतर आणि यूएई मधले दुबई त्यामुळे लेख थोडासा मोठा होईल, पण इंजीनियर असल्याने प्रश्नांची उत्तरे ही मुद्देसूद, पॉइंट टू पॉइंट लिहायची सवय आहे.

**आफ्रिका :**

तर मी सुरुवात करेंन आफ्रिकेपासून! कामनिमित मी अफ्रिकेतील इथियोपिया, युगांडा आणि केनियामधे जाणार हे ठरल्यापासून, जगाच्या नकाशावर 'इथिओपिया' कुठे आहे, हे बघायला सुरुवात केली !

'जाऊन जाऊन जंगलात काय चाल्लायस? तिकडे आदिवासी लोकांनी पकडल्यावर आम्हाला फोन कर' असे बरेच विनोदी कॉमेंट जिवाभावाच्या मित्राकडून मिळाले! जाताना मनात थोडीशी भीतीही होती कारण आपल्याकडच्या सिनेमामध्ये किंवा इतर मीडियामध्ये जो आफ्रिका दाखवला आहे ते बघून भीती वाटत होती! खरंच असे असेल का?

इथिओपियातील अडिस अबाबा ह्या एअरपोर्टमध्ये पोहचल्यावर , आपण नक्कीच कुठेतरी वेगळीकडे आलो आहे , हे समजले, इथिओपियातील लोकांची चेहरेपट्टीही इतर आफ्रिकन देशातील लोकांपेक्षा वेगळी आहे , आणि त्यांचा रंग काळा, सावळा आणि गोरा ह्या कॅटेगरी मध्ये मोडतो. आपल्याकडे काळा, सावळा, गोरा असे रंगभेद आहेत पण भारताबाहेर गेल्यावर फक्त काळा आणि गोरा असे दोनच आहेत. आपण भारतीय काळा ह्यामध्ये मोडते! त्यावरून आपल्याला कशा ना कशात भेद करायची सवयच आहे असे जाणवले!

इतर कोणत्याही परकीय देशांचे इथिओपियावर आक्रमण झाले नसल्याने इथिओपियातील लोकांचे कल्चर प्युअर आहे! नक्कीच तुम्हाला इथे गरीब भिकारी रस्त्यावर दिसतील पण त्याचबरोबर मोठ्या मोठ्या बिल्डींग्ससुद्धा दिसतील, ऐकल्याप्रमाणे आपण जंगलात आलो नाही ह्याचेही समाधान मिळाले आणि ऐकीव माहिती किती खोटी असू शकते ह्याचे दर्शन उघड्या डोळ्यांनी भेटले.

इकडे येण्याआधी फक्त भारतातच देवाला लोक मानतात आणि बाकी सगळ्या जगात लोक कधीही कुणाबरोब जातात किंवा त्यांना संस्कृती नाही असा माझा भोळा - भाबडा समज होता. 'इथिओपिअन्स' देवाला इतके मानतात की कदाचित आपल्या भारतीयांपेक्षा जास्त किंवा तितकेच! इकडेही उपास - तापास आहेत, तसेच काळी जादूचंही समज आहे. फरक एवढाच की ह्यांचा देव येशू ख्रिस्त आहे.

ख्रिश्चन आणि मुस्लिम असे दोन प्रमुख धर्म आहेत - पण इथे धर्मावरून दंगल झाली नाही! देशाचा एरिया 10 लाख स्केवर किलोमीटर असून जवळपास 10 करोड एवढी लोकसंख्या आहे.

12 विभागामध्ये हा देश विभागाला आहे, त्यांना आपण राज्यही म्हणू शकतो. इथे पहिलीच गोष्ट माझ्या नजरेत भरली ती - रस्ता क्रॉस करताना जवळपास सगळेच लोक फक्त झेब्रा क्रॉस वरूनच क्रॉस करतील, आणि एकदा माणूस रस्ता

क्रॉस करत असेल तर गाड्याही थांबतात , आपण ज्या देशाला मागासलेले म्हणतो त्यांच्या मनात एवढी शिस्त कशी ? हा प्रश्न मनाला सतावत असे !

गाडी थांबवताना, गाडीचे चाक झेब्रा क्रॉसवर जात कामा नये हा नियम आहे , आणि ही लोकं तो नियम पाळतातही! इकडे अपघात (ऍक्सीडेन्ट) मध्ये जर एखाद्या माणसाचा जीव गेला तर त्याला खून समजतात आणि त्याप्रमाणे शिक्षा होते. जर एखाद्याच्या शरीराचा कोणताही भाग अपघातामध्ये वाया गेला तर त्याप्रमाणे त्याला शिक्षा होते! इकडे माणसाच्या जीवाला किंमत आहे!

टॅक्सीची वाट बघतानाही 100 लोकं असो वा 10 लोकं असो सगळेजण शाळेतील मुलांच्या रांगेप्रमाणे रस्त्यावर उभे राहतात , आपल्यासारखे धक्का बुक्की करून एकमेकांवर चढत नाहीत! विश्वास ठेवा - बघायला ते खूप सुंदर दिसते!

लोक सरकारला घाबरतात , आता नवीन सरकारला लोकशाही आणायची असल्याने सगळीकडे उद्रेक होत आहे आणि सिस्टम थोडीशी गडबडत आहे ! 5/6 वर्षांपासून तरी इथे कुणी गुंड किंवा ग्रुप दिसत नाहीत, चोरी, बलात्कार ह्याचे प्रमाण एकदम कमी, मागील 5/6 वर्षात फक्त 1/2 बलात्काराच्या केसेस मी ऐकल्या आहेत.

इथे एकच गुंड तो म्हणजे सरकार! इथे दोनच जाती - एक गुन्हेगार आणि एक सामान्य नागरिक!

ह्यांनी गुन्हगारांना लगेच फिल्टर लावून जेल मध्ये डांबले आहे. इकडच्या जेलमध्ये जाण्यापेक्षा लोक आत्महत्या स्वीकारतात - कोंबड्याचे खुराडे जशे असते तसे येथील 'जेल्स' आहेत. त्यामुळे कोणताही गुन्हा करायला इथली लोक घाबरतात. सरकारच्या विरोधात सहसा कुणी ओपनली बोलत नाही. दुबईमध्ये ही असाच अनुभव आला.

'आपल्याकडे मुली कमी कमी कपडे घालतात, वेस्टर्न कल्चरचे अनुकरण करतात, त्याने रेपिस्टना रेपसाठी उत्तेजना मिळते ' - असे विधान करणाऱ्या संस्कृती रक्षकांवर हसू येते कारण इथिओपिया या देशामधेही मुली कमी कपडे घालतात! “क्लीवेज” दाखवणे ही इकडची फॅशनच असावी इतके टी शर्ट्स खाली आणि गळे खोल असतात, मग इकडे रेप का होत नाहीत? असाही प्रश्न पडला.

आपल्याकडे जसे साडी घातल्यानंतर स्त्रीचा सहजपणे कमरेचा खूप मोठा भाग दिसते आणि त्याची आपल्याला सवयही असते, आपल्याकडे स्त्रियांनी “क्लीवेज” (Cleavage) दाखवणे ह्यावर जेवढ्या भुवया उंचावतात तेवढ्याच भुवया त्या देशातील स्त्रीने कमर दाखवल्यावर उंचावतात.

आपल्या सारखे सेक्स आणि संस्कृतीची एकमेकांशी घातलेली सांगड (किंवा इंटरलॉक) ना मला युरोपमध्ये दिसला, ना अमेरिकेमध्ये दिसला. जेव्हा मी अमेरिकेत होतो तेव्हा न्यूयॉर्क मधील टाइम स्केअर वर भरदिवसा चालताना 100- 200 बायकांची फक्त पँटी आणि ब्रा मध्ये परेड होती - कसल्यातरी निर्णयाच्या विरोधात! तसे तर भारतात होत नाही, मग भारतामध्ये स्त्रियांवर जितके अत्याचार होतात तेव्हढे अमेरिकेत किंवा युरोप मध्ये का होत नाहीत? युरोप मधील ब्रुसेल्समध्येही अशीच एक रॅली बघितली होती. त्यावेळी त्यांच्या संस्कृतीचा ह्रास होतो का?

इथिओपियातील लोकं बॉलिवूडला मानतात, भारत देश हा शाहरुख खानच्या चित्रपटांत दाखवल्याप्रमाणे स्वच्छ आहे- असा समज आहे. इकडच्या लोकांनी अजूनही सत्या, गँग्स ऑफ वासेपूर सारखे सिनेमे पाहिलेले नाहीत. सगळे हम आपके हैं कौन किंवा कभी ख़ुशी कभी गम सारखे सिनेमे लागतात आणि आपण जे tv किंवा मीडिया वर बघतो तेच खरे असाही आपला समज होतो. भारतातील लोक प्रेमाचे पुजारी असून भारतात कसलाच द्वेष नाही असाही समज आहे.

इथिओपियामध्येही प्रॉब्लेम्स आहेत, इकडे लोक सहसा सरकारच्या विरोधात जात नाहीत. मोर्चे, सरकार विरोधी घोषणा देणे म्हणजे डायरेक्ट पोलीस गोळाबारी करतात. त्यामुळे मानवी अधिकाराच्या बऱ्याच केसेस ह्या देशावर आहेत. पण फॉरेनर्सना संरक्षण आहे.

इकडे मिडल क्लास नाही आहे. एक तर तुमच्याकडे 1 बीर (1 बीर – 2.50 रुपये) ही नाही किंवा तुमच्यासाठी 100 बीर म्हणजे 'कचरा 'आहे! इकडे 'ओपन प्रॉस्टिट्यूशन' आहे आणि भरपूर नाईट क्लब आहेत. अल्कोहोल (बिअर आणि वाईन) पिणे हे फॅमिली मध्ये आपण चहा पिण्यासारखे आहे. एकदा पाहुणा घरी आला की कोल्ड ड्रींक्स ऐवजी बिअर (5% अल्कोहोल) विचारणे प्रथा आहे! अजून एकदा आपण अल्कोहोल आणि संस्कृतीचा संबंध जोडला आहे असे वाटले!

इथिओपियामध्ये जुने चर्चेस, बहिरदार येथे ताना नावाचा तलाव आहे आणि आडिस अबाबा सोडले तर बाकीची शेहरे इतकी डेव्हलप नाहीत!

इथिओपियामध्ये 90 वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात, कुणीही राज्य केले नसल्याने इकडे कुणालाही सर किंवा साहेब बोलायची प्रथा नाही, सगळे प्रत्येकाला नावाने बोलतात.

युगांडा येथील कंपाला येथे मी 1 आठवडाभर राहिलो होतो, तिकडेही ट्राफिक रूल्सची भारतासारखीच बोंबाबोंब आहे. मी काही मटेरियल विकत आणायला गेलो तेव्हा - साधारण सकाळी 11 च्या सुमारास तेथील बेंगॉली दुकानदाराने शटर ओढून घेतले - काय झाले हे विचारले तर त्याने सांगितले की दोन ग्रुप मध्ये भांडण झाले आहे आणि भरदुपारी आम्हाला गन शॉट्स ऐकू येऊ लागले, संध्याकाळी 5 वाजता मी हॉटेलवर आलो - आपल्यापेक्षाही वाईट व्यवस्था युगांडा मध्ये आहे, लाचखोरी जिथे येते - तिथे तेथील प्रजा सरकार अन पोलिसांना घाबरत नाहीत! युगांडामध्ये बरेच भारतीय आहेत - बरीच इलेकट्रोनिकसची दुकाने भारतीयांची आहेत. युगांडा मध्ये विकट्टोरिया नावाचे तलाव बघण्यासारखे आहे आणि त्याच्याच आजूबाजूला वॉटर स्पोर्ट्स पण आहेत.

युगांडामध्ये त्यांची करन्सी सीलिंग आहे, उगांडात 50000 (हो पन्नास हजार ) शिलिंग्सची नोट आहे - त्यामुळे तिथल्या करप्शनची तुम्ही कल्पना करू शकता. 1000 सिलिंग्सचे नाणे आहे.

भारतामध्ये काही लोक जास्त रकमेची नोट बाजारात आली किंवा जास्त रकमेचे नाणे बाजारात आले तर काहीतरी देशाने पराक्रम केला असे पोस्ट करतात. आपण अजून गरीब होत आहोत आणि ही नोट भ्रष्टाचारामध्ये किती भर घालेल ह्याची कल्पना करा. समजा एखादा 1 लाख रुपये ब्लॅक मनी म्हणून लपवत असेल किंवा कुणाला तरी लाच देण्यासाठी जात असेल तर तो पैसा नेण्यासाठी लागणारी जागा 2000 च्या नोटांनी 1 लाख साठी वेगळी आणि 100 च्या नोटांनी 1 लाख ही वेगळी असेल. जर सगळे व्यवहार इंटरनेटने झाले तर सगळा पैसा व्हाईट होईल. आता काहीजण म्हणतील की भारतातील जनता अडाणी आहे, त्यांना कळणार नाही इंटरनेट कसे वापरावे - मग जे अडाणी आहेत त्याच्याकडे एवढा पैसे नाही कीत्यांना व्यवहार करताना 100 पेक्षा मोठ्या नोटांची त्यांना गरज भासेल. 2000 तर खूप डोक्यावरून गेले!

केनिया मधील नैरोबी मध्येमी आठवडाभर होतो, नैरोबीमध्ये रस्त्यावर चालतानाही आपल्या मोबाईलची काळजी घ्यावी चोरीला जाण्याची शक्यता आहे. नैरोबी मधल्या नॅशनल पार्क बघण्यासारखे आहे, जंगल सफारी मध्ये बरेच प्राणी बघितले तिथेच सिहांची फॅमिली जवळजवळ 20 मीटरवरून बघितली, 1 सिंह , 1 सिंहीण आणि त्यांचे 2 बछडे एका बैलाचा फडशा पाडून मस्त खेळत बसले होते. जवळपास 5 मिनिटे आम्ही थांबलो होतो, सर्कशीत अन झूमध्ये वाघ, सिंह बघणे आणि जंगल सफरीत बघणे ह्यात जमीन अस्मानाचा फरक आहे, आमच्या ड्रायव्हरचे लक्ष त्यांच्याकडे होते, जेव्हा एक सिंह उठला तेव्हा त्याने लगेच गाडी पळवली.

तिथे बॅकग्राऊंडला सिंहांची फॅमिली सोबत घेतलेला सेल्फी सर्वात घाबरावणारा होता!

**यूनाइटेड अरब एमिरेट्सः**

युनाइटेड अरब एमिरेट्सह्या देशामध्ये दुबई हे एक एमिरेस्ट्स आहे ,एमिरेट्स म्हणजे आपण त्याला राज्य ही म्हणू शकतो - आजमान, फुजारा,रास - अल कोहिमा, शारजा, उम अल क्वेन अशी बाकीची एमिरेट्स आहेत.

त्यापैकी दुबईमध्ये 2 आठवडे आणि रास - अल कोहिमा मध्ये आठवडाभर राहिलो आहे, पहिल्यांदाच दुबईचा एअरपोर्ट बघून मन भरून जाते, मग बाहेर पडताना तेथील महागड्या कार्स आणि टॅक्सिस बघून आपण दुबईत आलो आहे हे समजते.

रस्ते एकदम स्वच् , ट्राफिक नियमामध्ये इथिओपियाच्या कितीतरी पुढे, भारतशी तुलनाच नको! रस्त्यावर सगळीकडे कॅमेरे, एकही ट्राफिक पोलीस तुम्हाला रस्त्यावर दिसणार नाही,गरजच नाही! प्रत्येक कारचे स्पीड मॉनिटर केले जाते आणि जर कुणी सिग्नल तोडला किंवा स्पीड लिमिट क्रॉस केले तर डायरेक्ट तुमच्या कार्ड मधून पैसे वजा होतील किंवा तुमच्या मोबाईल वर मेसेज येईल! ट्राफिक रूल्स एकदम कडक आहेत, इकडे ड्रायविंग लायसन्स मिळवण्यासाठी तुम्हाला क्लास लावला लागतो मग थिअरी आणि प्रॅक्टिकल, आपल्यासारखे फक्त रिव्हर्स घे म्हटलं अन जमलं की लायसन्स मिळत नाही! इथिओपियामधेही जवजवळ महिना - दोन महिने क्लासमध्ये जाऊन थेअरी शिकावी लागते मगच ड्राईव्हिंग टेस्ट देता येते.

जर ड्रायव्हिंग करताना अपघातात मृत्यू झाला तर जेवढा फाईन ड्रायव्हरला आहे, त्याच्यापेक्षा 34 पट जास्त.

सौदी अरेबियामध्ये चोरी केली तरी हाथ कापण्याची सजा आहे असे ऐकले आहे, कोण चोरी करेल? दुबईमध्ये साधा ट्राफिकचा नियम मोडला तर त्याची शिक्षा १९ हजार रुपये पासून पुढे सुरु होते, स्पीड लिमिट वाढवले तर 58 हजार रुपये इतका दंड! जर अपघातात मृत्यू झाला तर कोर्ट ने ठरवलेली रक्कम आणि 6 महिने जेल, आता कोर्ट 19 लाख रुपये पेक्षा तर सजा नाही ठोठवणार!

दुबईमध्ये पहिल्याच दिवशी दुबई मॉल मध्ये गेलो - जगातील सर्वात मोठा मॉल आहे. तिथेच शेजारी जगातील सर्वात उंच बिल्डिंग बुर्ज खलिफा आहे, रस्त्याच्या बाजूला वॉकवे, रस्त्यावर किंवा आजूबाजूला अजिबात घाण नाही, लोकांसाठी मस्त बागा, विजेची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, सामान्य नागरिकाला संरक्षण, गुन्हेगारी खूप कमी अजून काय हवे असते सरकारकडून?

९० % ड्रायव्हर्स हे भारतीय किंवा पाकिस्तानी आहेत.

बुर्ज खलिफाच्या “ॲट द टॉप जाणे" हा मस्त अनुभव आहे, इथे तुम्ही दिवसभर घालवू शकता. बुर्ज खलिफावर जाण्यासाठी तिकिटे आधीच बुक करा, डायरेक्ट गेलात तर ऐनवेळी खूप महाग भेटते, जितक्या टॅक्सिस महागड्या तितकेच मेट्रो स्वस्त आहे, इथे काही दिवसांचा पास मिळतो - टॅक्सी ऐवजी हा पास घ्यावा!

दुबई म्हणजे संस्कृती आणि आधुनिकतेचा ताळमेळ आहे, दुबई एअरपोर्टवर गेल्यावर सगळ्यात पहिले जे नजरेत भरले ते एक मोठे चित्र ज्यावर 1960 पासूनचे प्रत्येक दहा वर्षानंतरचे फोटोस! 50 / 60 वर्षात जर वाळूपासून दुबई घडवता येत असेल तर आपले भारतीय नेते किंवा जनता काय करत आहे हा - मोठा शॉक ब्रेनला लागू शकतो, मला तरी लागला!

चांगले लीडर्स जर एखाद्या देशाला मिळाले तर त्या देशाचा किती कायापालट होऊ शकतो ह्याचे उदाहरण म्हणजे दुबई! काहीजण म्हणतील की त्यांच्याकडे तेल आहे पण दुबईच्या इनकम मधला 5 पेरसेन्ट फक्त तेलाचा आणि पेट्रोलियमचा आहे, दुबईने त्यांच्याकडे काय आहे हे ओळखले आणि जगातली बेस्ट फॅसिलिटी असलेला प्रदेश बनवला. त्यांचा महत्वाचा इन्कम सोर्स हा मॅनुफॅक्चरिंग आणि टुरिझम आहे.

हे करत असताना तिथल्या सरकारने लोकल्सचाहि विचार केला, जर एखाद्या इन्व्हेस्टरला किंवा कंपनीला UAE मध्ये पैसे गुंतवायचे असतील किंवा फॅब्रिकेशन युनिट काढायचे असेल तर तिथल्या एकाद्या लोकल माणसाला पार्टनर घ्यावे लागते आणि त्या पार्टनरला त्या कंपनीच्या नफ्यातील हिस्सा मिळतो. त्यामुळे लोकल्स आपोआपच श्रीमंत होतात - किती डोके नेत्यांचे! त्यांनी फक्त स्वतःचीच घरे न बसवता, न भरता, सामान्य नागरिकांच्या भल्याचाही विचार केला.

अजून एक म्हणजे दुबईचा सर्वात जास्त कामगार वर्ग (टॅक्सी ड्रायव्हर्स, टॉयलेट क्लीनर, हॉटेल वेटर्स, वेल्डर्स / फिटर्स) भारतातून आणले जातात, हे ऐकून कदाचित आवडणार नाही. एका केरळच्या माणसाची चहा विकण्याची चेन प्रसिद्ध आहे. बाकी बरेच भारतीय लोकांचे व्यवसाय आहेत. दुबईत तुम्ही एकही रेपची केस ऐकणार नाही किंवा मर्डर ऐकणार नाही , किंवा भीक मागणे हा गुन्हा आहे. इथले लोक सरकारचा सन्मान करतात कारण सरकार लोकल्सची काळजी घेते. पूर्ण दुबईच्या लोकसंख्येच्या 20 टक्के लोक लोकल्स आहेत आणि बाकीची 80 % इतर देशातून आलेली आहेत. तरीही सगळी सूत्र लोकल्सकडे आहेत. सरकारी कामगार आणि पोलीसमध्ये लोकल्स आहेत, बाकीचे इन्वेस्टर्स आणि कामगार वर्ग हे बाहेरचे लोक आहेत. कामगारांमध्ये भारतीय, पाकिस्तानी, आफ्रिकन, फिलिपिन्स इथले बरेच आहेत.

पहिला दिवस दुबई मॉलमध्ये आणि बुर्ज खलिफाच्या आसपास घालवल्यानंतर दुसऱ्या दिवशी इतर मॉल्स बघायला सुरुवात केली, मग दुबई मारिन ह्या मस्त एरियामध्ये गेलो. समुद्रकिनाऱ्याचा वापर कसा करावा हे UAE ला नक्कीच समजले आहे. तिथून तुम्ही समुद्रात चक्कर मारू शकता. आपल्याकडच्या कोकण किनारपट्टी किती वाया जात आहे - नैसर्गिक संरक्षण आणि संस्कृतीच्या नावाखाली ! लास वेगसला गेल्यानंतर तिथले कसिनो आणि नाईट लाईफ बघून डोके फीरलं! तिथे ही लोक राहतात, समाज तिथेही आहे! मग हे सगळं आल्याने आपलंच समाज कसा बरबाद होईल, निदान वेगास सारखं नाही पण दुबई सारखा ब्लेंड तरी भारतात तयार करता येईल?

तिसऱ्या दिवशी सगळे महत्वाचे सोट्स बघण्यात गेले, पुन्हा एकदा बुर्ज खलिफा जो 830 मीटर उंच आहे, 124 मजल्या वरून तुम्ही पूर्ण दुबई शहर बघू शकता. दुबई मॉलमध्ये दुबई मत्स्यालय बघण्यासारखे आहे - त्यामध्ये तुम्ही शार्कही बघू शकता. स्कुबा डायविंग बरोबरच त्यांचे वेगवेगळे कार्यक्रम असतात. दुबईच्या इनकम मध्ये टुरिस्टचा वाटा का आहे हे समजते!

त्याचबरोबर अटलन्टिस हॉटेल (जेथे हैप्पी न्यू इअर चे शूटिंग झाले होते ) मधल्या वॉटर पार्कचा अनुभव भयाण आहे. बॉलिवूडवाले आपल्याला किती मूर्ख बनवतात हे प्रत्यक्ष दुबई बघितल्यावर कळते. डेसर्ट सफारीचा अनुभव ही मस्त आहे.

दुबईमध्ये जाऊन पैसे कमावणे हे जरी शक्य असले तरी पैसे त्याच देशात खर्च करण्यासाठी सरकाने मस्त 'ट्रॅप' मांडला आहे, कामगारांना कर्ज काढायची सोप्पी व्यवस्था आहे त्यामुळे दुबईमध्ये कामासाठी गेलेल्या लोकांना खरंच किती

'सेविंग' पडत असेल हा प्रश्न आहे. भारतीय कामगारांचे पासपोर्ट्स त्यांच्या कंपनीकडे असतात, त्यामुळे अप्रत्यक्षित गळ्यात चैन असलेले गुलाम ह्या पेक्षा दुसरी तुलना इथल्या कामगाराची करणे काही वावगे नाही ठरणार!

**लेखक:** अविनाश लोंढे - इथियोपिया

**मोबाईल:** +251966215982

**ईमेल:** avi4u.iitkgp@gmail.com

***(अविनाश लोंढे हे बेधुंद या मेहता पब्लिशिंग हाऊस ने प्रकाशित केलेल्या पुस्तकाचे लेखक आहेत. ते सध्या इथियोपिया या देशात कोका कोला कंपनीत मॅनेजर आहेत.)***

📖 ⌘ ✶

## पुलवामा हल्ला- अक्षता दिवटे

सगळी कामे उरकून टीव्ही चालू केला. पुलवामा हल्ल्याची ची बातमी चालु होती. जशी बातमी कळली की पुलवामा हल्ला झाला आहे शरीरातील रक्त उसळायला लागल. अणि फक्त माझच नाही तर प्रत्येक भारतीयांच रक्त उसळत होत. डोक्यात फक्त एकच विचार येत होता शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबाचे काय होणार?

देशाचे जवान बॉर्डर वर पहारे देतात त्यामुळेच तर आपण सुरक्षित आहोत. ते नेहमी कर्तव्यनिष्ठ असतात मग कडकडती थंड असो की रखरखते ऊन... आर्मी, नेव्ही आणि एअर फोर्स मध्ये असलेला प्रत्येक सैनिक आपले कर्तव्य न विसरता देशासाठी प्राण देण्यासाठी 24 तास सज्ज असतो म्हणुनच तर देशाला त्या प्रत्येक सैनिकांवर गर्व आहे..

पुलवामा हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या माझ्या बंधू जवानांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली..!

पुलवामा हल्ला - देशाचे सैनिक बस मधुन श्रीनगरला जात होते. बस नंबर - HR49F0637 मध्ये जवळजवळ 42 सैनिक श्रीनगर ला जात असताना जैश-ए-मुहम्मद. या संघटनेच्या एक नालायक आतंकवादी आदील मुहम्मद याने एका फोर व्हीलर मध्ये जवळ पास 300 Kg RDX ठेऊन बस ला जोरात टक्कर मारली. टक्कर झाल्यामुळे RDX फुटला. त्याचा आवाज जवळजवळ 10 KM पर्यंत ऐकु आला त्यावरून हा बॉम्ब स्फोट किती भयावह होता त्याची कल्पना आपण करू शकता...

या बॉम्बस्फोट च्या आधी नालायक आतंकवादी आदील मुहम्मद याने एक चित्रफित शेअर केली आहे. ही चित्रफित पाहिल्यावर पाकिस्तान कुठल्या स्तराचा आहे आणि त्यांचे विचार किती खालच्या पातळीचे आहेत हे लक्षात येते. पाकचे नापाक इरादे. माणुसकी अजिबात नाही यांच्याकडे. जगण्यासाठी आतंकवादी संघटनांचा आधार घेतात त्यांचे पालनपोषण करतात. पूर्ण जग आतंकवादी संघटनांच्या विरोधात असताना पाकिस्तान असा एकच देश आहे की जो आतंकवादाला पाठिंबा देतो. पाकिस्तान पुलवामा हल्ल्याबद्दल पुरावे मागतो. 26 चा ताज हॉटेलमध्ये झालेला आतंकवादी हल्ला सगळ्यांच्या लक्षात आहे ना?

किती पुरावे दिले तरी पण पाकिस्तानची “अळी मिळी गुप चिळी “ तोंडावर बोट आणि हाताची घडी... आता बस झाल...

ये नया भारत है... ये घुसकर भी मारेगा और घुसने पर भी मारेगा.......!

आतंकवादी संघटनेचे पालन पोषण करणाऱ्या आणि आतंकवादी संघटनेमार्फत काश्मिरी लोकांना भडकावून त्यांच्याकडून आतंकवादी हल्ले करणाऱ्या पाकिस्तानला म्हणावे तरी काय मतिमंद की बुद्धीभ्रष्ट? निर्णय तुमचा आहे.

पुलवामा हल्ल्यानंतर एअर स्ट्राईक झाली आठवते ना सगळ्यांना? यामध्ये भारतीय एअर फोर्सने पाकिस्तानात घुसून आतंकवादी ठिकाणांवर हमला करून आतंकवादी अड्डे उद्ध्वस्त केले. ही एअर स्ट्राईक मध्यरात्री 3 वाजता झाली..त्यात जवळजवळ 200 ते 300 आतंकवादी मारले गेले आहेत अशी बातमी न्यूज चॅनेल द्वारे कळली. यानंतर पाकिस्तानने जनतेच्या दबावाखाली येऊन एअर स्ट्राईक केली एअर स्ट्राईक मध्ये पाकिस्तानचे 3 युद्ध विमानांनी भारतात घुसून मिलिट्री ठिकाणांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला पण तो अपयशी ठरला कारण विंग कमांडर अभिनंदन सारखे जवान आपल्या देशात आहेत आणि ते करोडो भारतीयांच्या सुरक्षेसाठी बॉर्डर वर सज्ज आहेत. विंग कमांडर अभिनंदन यांनी F16 या पाकिस्तानी युद्धविमानावर हल्ला करून त्याला उध्वस्त केले पण दुर्दैवाने यामध्ये अभिनंदन यांच्या युद्धविमानाला देखील हानी झाली.

‘अभिनंदन’ यांनी पॅराशूट सहित युद्धविमानातून उडी मारली आणि वाऱ्याच्या प्रवाहामूळे ते पाकिस्तानात गेले. अभिनंदन यांना माहिती नव्हते की ते पाकिस्तानात आले आहेत त्यांनी लोकांना विचारताच त्यांना आपण पाकिस्तानात

आलो आहोत याची जाणीव झाली. पाकिस्तानात आहोत हे कळताच वीरपुत्र भारताचा सिंह 'अभिनंदन' यांनी 'भारत माता की जय' असे म्हणत पिस्तूल काढून हवेत फायर केले. त्यानंतर त्यांना पाकिस्तानी मिलिट्री द्वारा अटक केली. पाकिस्तानने अभिनंदन यांना मानसिक त्रास देऊन एक चित्रफित तयार केली. या चित्रफित मध्ये पाकिस्तान सैन्य खूप चांगले आहे अणि मी प्रभावित झालो आहे. असे खोटे व्हिडीओ इंटरनेट वर टाकून पाकिस्तान दर्शवू तरी काय करु इच्छितो देव जाणे, पण जेव्हा भारताचा वीर 'अभिनंदन' भारतात आला तेव्हा लोक इतके आनंदी होते की त्यांची सकाळी पाच वाजल्या पासून वाट बघत होते. भारताची लढाई पाकिस्तानशी नसून तिथल्या आतंकवादी संघटनेशी आहे..

*(ही माहिती इंटरनेट व काही न्यूज चॅनेल वरुन एकत्रित केली आहे.)*

**लेखिका:** अक्षता दिवटे, बंगलोर

**मोबाईल:** 7483619155

**ईमेल:** adivate484@gmail.com

***(लेखिका एका खासगी कंपनीत काम करतात)***

📖 ⌘ ✶

## माहेरची चैत्रगौर - श्रेया गोलिवडेकर

चैत्र महिना सुरु झाला की पाडव्यानंतर वेध लागायचे ते चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाचे!

आमच्या लहानपणी तो एक छान आनंददायी सोहळाच असायचा. पहिल्या तिजेला देवघरातली अन्नपूर्णा छान घासून पुसून स्वच्छ केलेल्या पितळी झोपाळ्यावर विराजमान व्हायची तिला मोगऱ्याचा गजरा, डाळ, पन्ह, खिरीचा नैवेद्य असा सगळा थाट असायचा.

आजी सांगायची ही चैत्रगौर आता महिनाभर म्हणजे अक्षयतृतीयेपर्यंत माहेरी आलेली असते. तिला सगळं थंडगार द्यायचं तिचं गोडकौतुक करायचं मग एखादा मंगळवार किंवा शुक्रवार ठरवून हळदीकुंकवाचा दिवस ठरायचा. या दिवसाची आम्ही अगदी आतुरतेने वाट पाहायचो , आदल्या दिवसापर्यंत गौरीपुढे ठेवायला लाडू,शेव,चकली असे फराळाचे पदार्थ करण्याची आजीची आणि आईची गडबड असे. आमची नुसतीच लुडबुड...

मग दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून उन्हाच्या आत बायकांना आमंत्रण द्यायचं काम आमच्याकडे असायचं. आमची आजी कोणाकोणाला आमंत्रण द्यायचं हे इतक्या छान पद्धतीने सांगायची की आमची ग्राम प्रदक्षिणा व्हायची.

गौरीपुढे आरास करण्यासाठी आजोबा, बाबा, भाऊ, मामा ही पुरुषमंडळी देखील खूप उत्साहाने सहभागी व्हायची.घरातली बाकं, पत्राचे डबे, पाट हे ठेवून दोन तीन पायऱ्या तयार करायच्या. त्यावर शाली, रंगीबेरंगी बेडशीट अंथरूण त्या पायऱ्या तयार करायच्या. दोन्ही बाजूला रंगीत साड्यांच्या कमानी सजायच्या. आंब्याचे डहाळे आंब्यासकट आणले जायचे, द्राक्षांचे घड, कलिंगड कापून छान कमळं तयार करून ती गौरीपुढे ठेवली जायची.

गौरीचा मुखवटा स्टँडवर ठेवून आजी छान साडी तिला नेसवायची. दागिने, फुलांचे गजरे घालून तिला सजवायची ही उत्सवमूर्ती. . आणि झोपाळा मधील गौर तिच्यापुढे ठेवायची.

फराळाचे केलेले पदार्थ आकर्षक रित्या मांडायचे हे सगळं झालं की आजीनं 40-50 वर्षांपासून जपून आणि जमवून ठेवलेली खेळणी, चित्र काढायची हा आमचा सर्वात आनंदाचा भाग असायचा कारण ही खेळणी फक्त आत्ताच काढली जायची एरवी ती माळ्यावरच असायची.

त्यात कितीतरी जुन्या काचेच्या बाहुल्या, पक्षांच्या जोड्या, हत्ती, मोर, कृष्ण आणि त्याच गोकुळ, गायी, घोडे काही मोत्यांनी विणलेल्या वस्तू, प्रत्येक वस्तूशी आजीची एक आठवण असायची. ती प्रत्येक वेळी सांगायची अशी मजा करत नाजूकपणे आणि कलात्मक पद्धतीनं गौरीची आरास करायची. तिच्या पुढं छान रांगोळी काढायची कधी कधी ही रांगोळी पाण्यातली असायची. म्हणजे पाण्यावर बुक्का किंवा कोळशाची पूड टाकून त्यावर मग मी बदकाची रांगोळी काढायचे.

आजी आजोबांना त्याच किती कौतुक!!

ही आरास होईतोपर्यंत आईनं डाळ पन्ह तयार केलेलं असायचं, नंतर छान नटून थटून हे डाळ पन्ह ओले हरभरे गावातल्या अंबाबाईच्या रामाच्या देवळात जाऊन ठेवून यायचं.

मग सगळ्या बायका हळदी कुंकूवाला यायला लागायच्या. त्यांना अत्तर लावणं, गुलाबपाणी, पन्ह डाळ देणं आम्ही बहिणी अगदी हौसेनं करायचो. मग सगळ्या बायका आरास चे तोंडभरून कौतुक करायच्या. ओघानं आमचंही कौतुक व्हायचं. सगळ्या बायकांनी नाव घ्यायचं असा आग्रह आमच्या आजीचा असे आणि बायकाही छान छान उखाणे घ्यायच्या. यामध्ये रात्रीचे 9 -10 कधी वाजायचे कळायचं नाही. मग पुरुष मंडळींना बोलावून हरभऱ्याची उसळ (त्यावेळची या उसळी ची

चव पुन्हा यायची नाही) फराळाचे पदार्थ, डाळ, पन्ह यावरच गप्पागोष्टी करत जेवण व्हायचं. असा हा हळदीकुंकवाचा दिवस छान साजरा व्हायचा.

रात्री आरास उतरवताना मात्र एक हुरहूर वाटायची. पुढल्या वर्षीच्या हळदी कुंकवाच्या दिवसाची प्रतीक्षा असायची. आजही हे सगळं लिहिताना तो सगळा सोहळा डोळ्यासमोर उभा राहतोय. आजही आईकडे गेलो की अशीच आरास करण्याचा प्रयत्न करतो आणि या आठवणी पुन्हा पुन्हा जागवतो. हा आनंद सोहळा अनुभवतो.

**लेखिका:** श्रेया गोलिवडेकर, सातारा

**ईमेल:** shreyagoliwadekar10319@gmail.com

📖 ⌘ ✶

## रजोनिवृती - अभिलाषा देशपांडे

स्त्रीमध्ये जेव्हा मासिक पाळी येणे पूर्णपणे बंद होते. त्या अवस्थेला 'रजोनिवृती' म्हणतात. रजोनिवृती ही एक प्रत्येक स्त्रीमध्ये ठराविक काळानंतर साधारणपणे ४० ते ५५ वयादरम्यान येणारी एक सामान्य अवस्था आहे. या अवस्थेमध्ये स्त्रीच्या प्रजनन अवयवामध्ये क्षीणता येण्यास सुरूवात होते. शरीरात हार्मोनल परिवर्तन होते व त्यामूळे मासिक स्राव पूर्णपणे बंद होण्यास सुरूवात होते. रजोनिवृती चाळिशीनंतर प्रामुख्याने आलेली आढळते. रजोनिवृती काळाचे सरासरी वय हे ४७ वर्ष इतके आहे. जर वयाच्या ४०शी पूर्वीच आल्यास त्या विकृतीस 'अकाली रजोनिवृती ' (precocious Menopause) असे म्हणतात. वयाच्या ५५ व्या वर्षानंतर जर रजोनिवृती झाल्यास त्या विकृतीस 'विलंबित रजोनिवृती'- (Delayed Menopause)असे म्हणतात.

लक्षणेः शारिरीक,मानसिक व भावनिक स्तरावर रजोनिवृतीत खालील लक्षणे उत्पन्न होतात.

- शारिरीक थकवा जाणवणे.
- अंगदुखी, डोके दुखणे, कंबर व सांध्याच्या ठिकाणी वेदना होणे.
- चिडचिड होणे.
- अनुत्साह आळस येणे.
- त्वचा कोरडी होणे.
- हाडे ठिसूळ होणे.
- छातीत धडधडणे.
- झोप न लागणे.
- भूक मंदावणे.

कोणती काळजी घ्यावी ?

- रजोनिवृतीमध्ये आहाराकडे विशेष लक्ष देणे.
- या अवस्थेत हाडे ठिसूळ होण्याचे प्रमाण वाढते. त्यामूळे आहारात कॅल्शियमयुक्त पदार्थाचा समावेश करावा.
- सकाळ- संध्याकाळ फिरावयास जावे.
- मानसिक ताण, तणावापासून दूर रहावे. यासाठी प्राणायाम, ध्यानधारणा करावी.
- आपल्या आवडीचा छंद जोपासावा.
- विविध पुस्तके,कादंबऱ्या वाचाव्यात.
- अध्यात्माची ओढ लावून घ्यावी.
- सर्वात महत्त्वाचे रजोनिवृतीची भिती मनातून काढून टाकावी.

**लेखिका:** अभिलाषा देशपांडे , डोंबिवली, मुंबई

**मोबाईल**: 7045948961

**ईमेल:** abhilashardeshpande@gmail.com

📖 ⌘ ✶

## छत्री दिसलीच पाहिजे - भरत उपासनी

**(हा लेख एक नाट्यछटा आहे)**

मंडळी, यावर्षीचा उन्हाळा एकंदर भयानकच होता म्हणायचा! थोडं तीन-चार महिने मागे जाऊन पाहा म्हणजे लक्षात येईल लगेच! आंतरराष्ट्रीय किर्तीचा उन्हाळा होता महाराजा! वैताग होता नुसता वैताग! काय ती पाण्याची टंचाई...काय ते विजेचे नेमकं प्रचंड उकाड्यात गायब होऊन जाणं...काय तो घामाचा चिकचिकाट.झाड,चिमण्या,पशुपक्षी,माणसं सगळी कशी स्तब्ध आणि नि:शब्द! सिनेमागृहात जाऊन बसावं तर तिथेही तोच उकाड्याचा वैताग! इतके लोक प्राणवायू घेतात आणि कर्ब वायू सोडतात! मग होतं काय सिनेमा गृहात प्राणवायू कमी कर्ब वायू जास्त,मग जास्त जीव घाबरतो!

पाण्यात डुंबून बसावं तर पाणी सुद्धा नाही. पंखा काय गरम हवा सोडत होते अशा वैतागात एक मित्र आला आणि म्हणाला मित्रा,मी तैवानहून एक नवीन छत्री आणली आहे घेणार का?

आधीचा हा उन्हाळ्याचा उल्हास आणि त्यात छत्री विकत घेण्याचा फाल्गुन मास ! इम्पोर्टेड वस्तू तिचे आकर्षण जास्त! त्यात हा मित्र कनपटीला बसलेला! म्हटलं, आण बाबा आण छत्री ! आता तुम्ही म्हणाल या छत्रीत विशेष ते काय?

सांगतो सगळं काही सांगतो सांगतो ऐका. अरे काय सुपीरियर चकाकता चंदेरी कपडा आहे महाराजा! तबीयत खुश होऊन जाईल खुश! कपड्यात स्वतःचा चेहरा पाहून घ्याल इतकी पारदर्शकता इतकी तलमता आणि इतका मऊ मुलायम कपडा आहे महाराजा! इतका तलम रेशमी स्पर्श आहे ह्या छत्रीच्या कापडाचा ! हात फिरवाल तर हातच फिरवत रहाल! माझ्या सौंदर्याचं रहस्य 'लि..री ल..'असं म्हणत साबणाच्या फेसात डुंबणाऱ्या मधाळ डोळ्याच्या सिने नटी पेक्षाही जास्त मुलायम असा स्पर्श आहे माझ्या ह्या छत्रीच्या कापडाचा!

अजून सांगतो ऐका, फक्त एवढंच नाही पांढऱ्याशुभ्र फायबरच्या पारदर्शक दांडीची ही छत्री आणि त्या फायबरच्या आत तळाशी आणि वर टोकाशी अंतर्गत सुंदर विजेचे दिवे छत्रीच्या दांडी जवळचं हे बटन दाबलं की लाईट लागलाच पाहिजे! वा..वा...वा महाराजा, अशा या प्रचंड उन्हाच्या धुमश्चक्रीत सुद्धा तैवानची ही छत्री सुखावून गेली हो! आणि बस मनाशी एक पक्कं ठरवलं की येनकेन प्रकारे माझी छत्री लोकांना दिसलीच पाहिजे! दिसलीच पाहीजे!

मग काय त्यासाठी पावसाची वाट पाहत बसलो सगळी उन्हाळ्याची कटकट संपली एकदाची आणि असा धो-धो बरसला पाऊस की विचारता सोय नाही! "डोळे भरून पाहिला, असा पहिला पाऊस, मनातल्या कवितांचा, गाव झाला ग बेहोश!" असं एका कवितेत म्हटलेलं आहे! असा छान कवितेसारखा पाऊस पडला! बरसला धो-धो बरसला! मग काय विचारता? जंगली चित्रपटातल्या या शम्मी कपूर सारखी या $$$ हू $$$. ......या $$$ हू $$$ अशी एक जोरदार आरोळी घरातच स्वतःशीच ठोकली आणि निघालो की छत्री घेऊन बाहेर! कारण आपला निर्धारच होता ना की छत्री दिसलीच पाहिजे!

निघालो छत्री घेऊन बाहेर! बरसात मे... ताक धिना धिन....ताक धिना धीन! अशा थाटात निघालो की जणू काही, आगे पीछे हमारे सरदार, यहाँ के हम है राजकुमार$$$! असा रुबाब असा आवेश अशी शान, की बघणाऱ्याने बघतच रहावं!

वेळ संध्याकाळची....मस्त पाऊस पडलेला आहे.....चित्रपटासारखं.... सुंदर कवितेसारखं वातावरण निर्माण झालेलं आहे.... आणि राजकुमाराच्या थाटात ही तैवानची छत्री घेऊन मी निघालो आहे! एकटाच नाही निघालो! मला माझ्या छत्रीचं प्रदर्शन करायचं होतं! म्हणून मग एका मित्राला बरोबर घेतलं! कोपऱ्यावरच्या एका इराण्याच्या टपरीवर सुंदर गरमागरम वाफाळते दोन चहा लागोपाठ मी ही घेतले आणि मित्रालाही पाजले आणि निघालो फिरायला! आगे पीछे हमारे सरदार यहाँ के हम है राजकुमार! छत्री दिसलीच पाहिजे ना सगळ्यांना म्हणून निघालो फिरायला!

थोडा अंधार पडला.....छत्रीच बटन दाबलं....छत्रीतला लाईट लागला....! चंदेरी प्रकाश चमकला...! आश्चर्याने मित्रच काय, पण भोवतालची सगळी येणारी जाणारी रस्त्यावरची मंडळीसुद्धा जागच्या जागी स्तब्ध झाली महाराजा! प्रत्येक जण विचारू लागला कुठून आणली? केव्हा आणली? केवढ्याला आणली? छान आहे, सुंदर आहे, अप्रतिम आहे मग मी सगळ्यांच्या प्रश्नांना एका वेगळ्याच थाटात उत्तर देऊ लागलो..... जणू काही पत्रकार माझ्या सभोवताली उभे आहेत ते मला प्रश्न विचारत आहे आणि मी एखाद्या सेलिब्रिटीसारखा त्यांच्या प्रश्नांना उत्तर देत आहे.... दूरदर्शन बातम्यांसाठी मी स्वतः खूदपसंत तळवाडकर..... आजच्या वार्तापत्रात इतकच....पुन्हा भेटू या......आमच्या पुढील वार्तापत्रात मध्यरात्री एक वाजता....तोपर्यंत नमस्कार...! अशा थाटात...अशा थाटात माझं छत्री प्रदर्शन चालू होतं....! गर्वाने छाती फुलून गेली होती...! हरभऱ्याच्या झाडावर चढून मी अगदी खुशीत गाजरे खात होतो....! खूप आनंदी झालो होतो कारण छत्री दिसली पाहिजे ना महाराजा!

मग काय मी जास्तच छाती फुगवून अगदी आत्मविश्वासाने मित्राबरोबर रस्त्याने चालू लागलो...!

लोक कुतूहलाने प्रश्न विचारत होते आणि मी उत्तर देत होतो! माझा आतला आवाज मला सांगत होता बच्चमजी, लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देत जा.....थाटात चालत रहा... कारण येनकेनप्रकारे लोकांना आपली छत्री दिसलीच पाहिजे ना महाराजा...! आगे पीछे हमारे सरदार और इस छत्री के हम है राजकुमार....अहो पहात काय राहिलात माझ्याकडे नुसते? छत्रीकडे बघा, माझ्या छत्रीकडे कारण तुम्हाला माझ्यापेक्षा सुद्धा जास्त प्रमाणात माझी छत्री दिसलीच पाहिजे....!

**लेखक:** भरत उपासनी

**ईमेल:** br1957u@gmail.com

📖 ⌘ ✶

## कथा: अद्वैत - सविता कारंजकर

***( मे 2019 मध्ये नवी मुंबई साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या कथा स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळालेली ही कथा आहे.)***

जुई ,आवरलं का?आज लवकर जायचंय ना कॉलेजला...आईचा आवाज ऐकून जुई पळतच किचनमधे आली...

"आई,दे लवकर मला ब्रेकफास्ट...मला पहिलं लेक्चर अटेंड करायचंय गं"..

आईने पटकन थालिपीठ लोणचं दही आणि ठेचा..असा झक्कास बेत जुईपुढे ठेवला...

विश्वसम्राज्ञीच्या थाटात जुईने आपल्या दोन्ही तळहातांवर चेहरा ठेवून डोळे मोठे आणि ओठांचा चंबू केला...

"आई..आई..माझी फेवरीट आई...म्हणूनच तू मला आवडतेस गं!"

मग असंच आईचं कौतुक करत लाडीगोडी लावत जुईनं बेत फस्त केला. .गडबडीनं सॅक पाठीवर टाकली..आईच्या गळ्यात पडली आणि हलकेच आईच्या गालावर आपले ओठ टेकवले आणि पळाली..

घाई करू नको गं..गाडी सावकाश चालव. .आणि वेळेवर घरी ये गं. ..

आईच्या या सूचनांचा एका हाताने स्विकार करत जुई भुर्र्कन निघून गेली...

आई बराच वेळ ती गेली त्या दिशेला बघत राहिली.....

जुई..सुरेश आणि सुमन या दांपत्याची अनेक नवसाने झालेली एकुलती एक मुलगी..खूप देखणी नसली तरी नाकीडोळी नीटस..प्रमाणबद्ध बांधा..लांबसडक केस..सावळी जुई बोलू लागली की मोत्याची माळ निसटून मोती घरंगळू लागलेत असा भास व्हावा इतकी लाघवी...

नाट्यशास्त्रात बी.ए.च्या शेवटच्या वर्षात शिकणारी. .

आपली ही गोड पोरगी सतत आपल्या नजरेसमोर असावी असंच सुमनताईंना वाटायचं..वांझपणाच्या सगळ्या वेदना त्यांनी साहिल्या होत्या ना..

सुरेशराव सरकारी खात्यात वर्ग१ चे अधिकारी..आपल्या मुलीला हवं तसं जगता यावं एवढीच त्यांची इच्छा..त्यामुळेच जुईच्या आवडीनुसार तिनं हा अभ्यासक्रम निवडलेला.. नाट्यशास्त्रात जुई चमकदार कामगिरीही करू लागली होती..एकाहून एक सरस अशा संधी तिला अभिनयक्षेत्रात खुणावत होत्या..

तिचं कॉलेज..नाटकांच्या तालमी..वक्तृत्व स्पर्धा..वादविवाद स्पर्धा अशा अनेक उपक्रमांमुळे तिची घरी येण्याची वेळ काही ठरलेली नसायची.

सुमनताई याबाबत काळजी व्यक्त करायच्या..पण सुरेशराव मात्र ठाम...आपण चांगले संस्कार दिलेत तिला. .तिचं पाऊल कधीच वाकडं पडणार नाही..असं म्हणून ते सुमनताईना शांत करायचे..तशी सुमनताईनाही खात्री होतीच..पण आईचं काळीज ना...

जुई कॉलेज मध्ये पोचली.. त्या परिसरातच इंजिनिअरींग..मेडिकल..कॉमर्स आर्टस्. अशी सगळी कॉलेजेस होती.. गेटवरच तिला तिच्या ग्रुपमधले मित्रमैत्रिणी भेटले..पार्किंगमधे गाडी पार्क करून जुई त्यांच्यात

मिसळली..गप्पा..चेष्टामस्करी करत सगळे लेक्चर हॉलकडे पोहोचले..ती तिच्या नेहमीच्या जागी बसली..बेंच वर एक पाकीट तिला दिसलं.त्यावर तिचं नाव होतं..ती चमकली..पाकीटावर प्रेषकाचं नाव नव्हतं

मला कोण इथं पत्र पाठवणार?असं म्हणत जुईनं ते पाकीट फोडलं..आत एक पत्र होतं...त्यावरचा मजकूर असा...

*प्रिय जुई,*

*आज पिवळ्या सलवार सूटमध्ये छान दिसतेयस!! आणि एवढे लांबसडक केस मोकळे का सोडतेस?*

*तुझा चाहता...*

खाली नाव नव्हतं..सही नव्हती..पाकिटावरही काहीच लिहिलेलं नव्हतं..ती विचारात गढून गेली..त्यादिवशी तिचं लक्ष कशातच लागलं नाही...

जुई घरी आली..आईला सांगावं का नको या पत्राबद्दल?या द्विधा मनःस्थितीत ती होती..पण ठोस काही कळल्याशिवाय आईकडे बोलायला नको..असं ठरवून ती झोपली...

दुस-या दिवशी ती पुन्हा कॉलेज मध्ये गेली..पुन्हा पत्र..

*प्रिय जुई..*

*घाबरू नको.. तुला त्रास होईल, तुझी बदनामी होईल असं मी काहीच वागणार नाही..*

*मला तू खूप आवडतेस.. तुझा अभिनय.. तुझी भाषणं मला खूप आवडतात. .*

*पण समोर यायचं धाडस नाहीए गं. .*

*तुझा चाहता..*

जुईला आता काय करावे कळेना..कुणाला सांगावं की नको...ती गोंधळून गेलेली..

पत्रांचा हा सिलसिला असाच चालू राहिला..

त्या पत्रांमध्ये कधीही वाईट , अश्लील..मुलगी म्हणून तिचा अपमान होईल असा कोणताही शब्द वापरला गेला नव्हता..उलट तिच्याबद्दल आणि समस्त स्त्री जातीबद्दल सन्मान च व्यक्त होत होता. .

कधी एखादी छानशी कविता यायची पत्रामध्ये..कधी छानसं चित्र...

पत्रलेखकाबद्दल काहीही माहिती नसताना आता जुईला त्याच्याबद्दल आदर वाटू लागला.. तो एक उत्तम चित्रकार आणि संवेदनशील कवी आहे हे तिनं चांगलंच ओळखलं होतं...हळूहळू त्याच्या प्रेमात आपण पडलो आहोत अशी जाणीव तिला होऊ लागली..खूप खुश व्हायची ती त्याच्या कवितांवर...चित्रांवर..आणि स्वतःवरही..

फक्त तो स्वतःबद्दल काहीच बोलत नव्हता आणि त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा कोणता मार्गही तिच्याकडे नव्हता..त्यामुळेच ती खट्टू व्हायची..चिडायची स्वतःवरच...तरीही मनानं ती त्याचीच झाली होती..

जात्याच गुणवान असलेल्या जुईला त्याने तिच्या केलेल्या स्तुतीमुळे आत्मविश्वास आला होता..स्वतःवर ती मनापासून प्रेम करू लागली होती आणि हे तिच्या सगळ्या उपक्रमात दिसू लागलेलं.. कॉलेजमध्ये.. घरात.. नाट्यक्षेत्रात तिचं कौतुक होऊ लागलेलं..

तिला वाटायचं.. हे सगळं त्याच्यासोबत शेअर करावं..पण ते ती करू शकत नव्हती..

एव्हाना तिच्या मित्रमैत्रिणीना या निनावी पत्राबद्दल समजलं होतं. .पण ते सगळे तिला चिडवू लागले..सगळ्यांनीच ही गोष्ट गमतीत घेतली..

ती मात्र आता सिरीयस होऊ लागली...पण आईवडिलांना सांगणं तिला जमेना...

यथावकाश तिचं शिक्षण संपलं..जवळच्याच नात्यातल्या एका चांगल्या मुलाचं स्थळ तिला सांगून आलं..

ती सुरूवातीला तयारच होत नव्हती. .पण सगळ्या बाजूनी जुळतंय तर नाही का म्हणायचं?या आईवडिलांच्या प्रश्नाला ती उत्तर देऊ शकली नाही...आणि विशेष म्हणजे घरात या स्थळाचा विषय सुरू होताच पत्र येणं ही बंद झालं होतं.. याचं तिला खूप नवल वाटत होतं...पण इलाज नव्हताच..

अखेर तिनं हिंमत करून एके रात्री ही गोष्ट आईला सांगितली..सुमनताईच्या काळजात धस्स् झालं..त्यांनी काहीबाही कारणं सांगत ह्या स्थळाचा विषय पुढे ढकलला...सुरेशरावही चक्रावले...पण त्यांनी जुईला वेळ द्यायचं ठरवलं..

सुमनताईंनी त्यांच्यापरीनं पत्रलेखकाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला..पण छे...

मुलाकडील लोकही वेगवेगळ्या प्रकारे सुरेशरावांना विचारत होतेच..पुढची बोलणी कधी करायची वगैरे..

शेवटी सुमनताईंना लेकीची समजूत काढली. या मुलात नाकारण्यासारखं काहीच नव्हतं.. सगळंच कसं छान होतं..शिवाय जुईला नाट्यक्षेत्रात करियर करण्याला तेजससह त्याच्या घरच्यांचा बिलकुल विरोध नव्हता..उलट कौतुकच जास्त होतं..

जुईनेही नाईलाजाने होकार दिला..

जुई आणि रुबाबदार तेजसचा साखरपुडा झाला..लग्नाचा मुहूर्त सहा महिन्यानंतरचा काढला..सुरेशराव साशंक होतेच..शिवाय ज्यांना आयुष्य एकत्र काढायचंय त्यांची मनं जुळायला हवीत..त्यासाठी त्यांना वेळ मिळायला हवा..असं त्यांचं म्हणणं होतं..म्हणूनच सहा महिन्यानंतरचा मुहूर्त..

जुई आणि तेजस.. अगदी अनुरूप जोडी आहे असं सगळेच म्हणत होते..दोन्हीकडचे नातेवाईक जाम खुश होते..

सुरेशरावही आपल्या लाडक्या लेकीचं लग्न धूमधडाक्यात लावून देणार होते...

इकडे दोघांनी एकमेकांना जाणून घेणं सुरू होतं..नावाप्रमाणेच तेजस तेजस्वी होता..कर्तृत्ववान होता..पैशाला काहीच कमी नव्हती..तेजसचा बंगलाही खूप मोठा होता..आईवडील दोघंही सरकारी खात्यात निवृत्त झालेले. तेजसचा एक छोटा भाऊ होता नुकताच डॉक्टर झालेला..इंटर्नशिप करत होता..म्हणजे कुटुंबात तेजसवर फारशी काही जबाबदारी नव्हतीच..

सुमनताई आणि सुरेशराव दोघंही आपल्या लेकीच्या या दृष्ट लागावी अशा सुखाकडे पाहून निश्चिंत मनाने लग्नाची जोरदार तयारी करत होते..

हळूहळू जुईला तेजस आवडू लागला..ती तिच्या अनामिक चाहत्याला विसरू लागली...

अखेर तो दिवस उजाडला..

अगदी शेवटच्या घडीला काहीतरी चुकतंय असं वाटत असतानाही जुई बोहल्यावर चढली

सगळ्या नातेवाईकांनी तोंडात बोटं घातली..असा जुई-तेजसचा लग्न सोहळा पार पडला..कशाचीही कमतरता त्या सोहळ्यात नव्हती..

अत्यंत जड मनानं सुमनताई आणि सुरेशरावांनी आपल्या लेकीची सासरी पाठवणी केली..

जुईचं सासरी धडाक्यात स्वागत झालं..तिच्या मावस नणंदेनं दारातच तिला अडवलं..

उखाणा घेताना जुई खूप लाजली..तिच्या त्या मोहक दिसण्यावर..गोड बोलण्यावर मंडळी जाम खुश होती...तेजसच्या नजरेतलं तिच्याबद्दलचं कौतुक आणि प्रेम ओसंडून वाहत होतं..

विवाहानंतरचे सगळे विधी अगदी हसतखेळत पार पडले..

तेजसच्या आईने दोघांची दृष्ट काढली आणि सगळे झोपायला गेले..जुई तिच्या मावस नणंदेजवळ झोपली...झोपताना तिला तिच्या आईबाबांची खूप आठवण आली..तिनं आईबाबांना लॅण्डलाइनवरून फोन केला..ते दोघंही लेकीचा आवाज ऐकण्यासाठी आतुर झालेले..

जुईला तिचं घर खूप आवडल्याचं ऐकून दोघांनीही आपला निर्णय योग्य ठरला म्हणून सुस्कारा सोडला...

शांत समाधानी मनाने ते झोपी गेले..

तेजस आणि जुईही भविष्याची गोड-गुलाबी स्वप्नं रंगवत झोपी गेले...

आज सगळे अंमळ उशीराच उठले...कालच्या धावपळीनं सगळेच थकलेले होते..हसत खेळत सर्वांचा दिवस सुरू झाला..सगळे खूप खुश होते...

जुई उठली..किचनमधे आली . .सासूबाईनी सगळ्यांसाठी चहा ठेवलेला पाहून ती वरमली...पटकन पुढे होत म्हणाली..."आई, मला नाही का हाक मारायची?मला जागच नाही आली हो..."

तेजसच्या आई म्हणाल्या..."अगं चालायचंच..तू आत्तापासून कशाला काम करतेस?

अगं मजा करायचे दिवस आहेत तुमचे....परत आहेच ची रहाटगाडगे...."

ती हसली.. तेवढ्यात टेबलावरचा फोन खणखणला...नीरजने..तेजसच्या धाकट्या भावाने तो फोन उचलला..

"गुड मॉर्निंग, नीरज बोलतोय.."

ओह..देतोच हं..असं म्हणून त्याने जुईला फोन घेण्याची खूण केली..

नीरजचं तिला. .वहिनी तुझा फोन आहे. असं न म्हणणं तिला खटकतं होतं पण तिनं दुर्लक्ष केलं.

जुईनं ओळखलं..बाबाच असणार...

ती धावतच फोन कडे गेली..तिचं धावणं पाहून सगळे हसू लागले

ती लाजली...बाबांशी पोटभर बोलल्यावर ती आईशीही बोलली...

कल्याणी..जुईची नणंद खट्याळपणे म्हणाली.."वहिनी अगं बास गं आता आईबाबांशी बोलणं....आम्हाला भूक लागलीय..आज तुझ्या आणि दादाच्या आवडीचा बेत करायचाय नाश्त्याला.."

जुई..आईला म्हणाली.."आई मी खुश आहे..आता मी तुझ्यासोबत नंतर बोलते...आता फोन ठेवू.?"

सुमनताईंना खरंतर जुईशी खूप बोलायचं होतं..पण आता ती सासरी खुश आहे हसतेय खेळतेय हे ऐकून त्या सुखावल्या...

जुई पटकन किचनमधे गेली...सासूबाईनी चहा गाळला होता..तिने कपबश्या ट्रेमध्ये ठेवल्या आणि ती हॉलमध्ये आली..सगळ्यांना चहा दिला...सगळ्यात शेवटी ती तेजसकडे वळली...त्याला चहा देताना तिची नजर टेबलवर पडलेल्या पाकिटावर पडली...क्षणभर ती चपापली..तिला निनावी पत्रं आठवली..त्यातला मजकूर आठवला..ती शहारली..पण त्याचक्षणी तो विचार तिने झटकला...

तेजस तिच्याकडे एकटक पहात होता...त्याच्याकडे पाहून तिने नजर वळवली आणि...आणि तिचं लक्ष तेजसशेजारी बसलेल्या नीरजकडे गेलं..तोही तिच्याचकडे पाहत होता..पाकीट पाहून तिचं चपापणं त्याच्या नजरेनं टिपलं होतं . .. त्याच्या नजरेतलं वेगळेपण पाहून ती पुन्हा चपापली...

तिच्या मनात प्रचंड खळबळ माजली...ती आत निघून गेली...

सगळे हसतखेळत गप्पा मारत असताना जुईच्या सासरेबुवांनी तिला हाक मारली आणि सगळ्यांसोबत तूही बस असं ते म्हणाले...

ती संकोचून खुर्चीत बसली..

कल्याणी तिच्या दादावहिनीची खूप चेष्टा मस्करी करत होती...

सगळे हसत खिदळत असताना अंगणातून.... तेजस... तेजस.. अशा हाका ऐकू आल्या

कमलाकर..म्हणजे तेजसचे वडील खिडकीत गेले..त्यांनी खिडकीतून डोकावून पाहिलं तर तेजसचे काही मित्र सायकली घेऊन सायकल सफरीसाठी तयार होऊन उभे होते..

कमलाकर म्हणाले.."अरे..तुम्ही या फिरून..तेजस काही येणार नाही..आता पहिल्यासारखा तो रिकामाही नाही..लग्न झालंय त्याचं.."

मुलं म्हणाली.."काका,प्लीज एकच तास. .पाठवा ना त्याला"

तेजस उठून जाऊ लागला..तेवढ्यात त्याची आत्या त्याला अडवत म्हणाली.."अरे, कुठं निघालास?अजून अंगाची हळद नाही निघाली तुझ्या!"

इकडे मुलं. .तेजस तेजस. .असं ओरडत होती..

कमलाकर म्हणाले.."मुलांनो..आज तेजसचं रिसेप्शन आहे..सूनबाईचं स्वागत करायचंय..निमंत्रणं करायचीत...तुम्ही निघा बघू" . ..

तेजसनं सुवर्णमध्य काढला...

तो उठला सगळ्यांना उद्देशून तो म्हणाला..."मी बाहेर जात नाही कुठे...मित्र बाहेर उभे आहेत रस्त्याच्या पलिकडे..मी भेटून येतो फक्त"

याला सर्वांनी परवानगी दिली.. आई म्हणाली.."बाळा,लवकर ये हं"..

"हो गं, आई "...असं म्हणत त्याने एक तिरका कटाक्ष जुईकडे टाकला..नजरेनंच तिला "आलोच थोड्यावेळाने"असं सांगितलं.. तिनंही नजरेनंच लवकर ये असं खुणावलं...

तेजस बाहेर पडला..जुईनं कपबश्या उचलून ट्रेमध्ये ठेवल्या..ट्रे घेऊन ती किचनकडे वळली...

किचनच्या चौकटीतला छोटा उंबरा तिच्या लक्षात आला नाही..ती ठेचकळली . .कपबश्या हातातून पडल्या आणि खळ्ळकन् फुटल्या...

तितक्यात...

बाहेरून एक जोरात किंकाळी ऐकू आली. .धडाम् असा मोठ्ठा आवाज झाला...धरणीकंप व्हावा इतका मोठा...पाठोपाठ. .तेजऽऽस..अशा किंकाळ्यानी आभाळ फाटलं...

घरातले सगळे बाहेर धावत गेले..

अंगणापासून सात आठ फुटावरच हमरस्ता होता..तिथलं दृश्य पाहून एकच हलकल्लोळ माजला...

जुईही आपली साडी सावरत पळत बाहेर आली..तोवर बरीच गर्दी जमली होती. .गर्दीला बाजूला सारत ती पुढे आली आणि...समोरचे दृश्य पाहून ती एकदम पुतळाच झाली...

एका ट्रकने तेजसला ठोकरले होते..तो रक्ताच्या थारोळ्यात पडलेला..तिथला आक्रोश कानठळ्या बसवणारा होता...

होत्याचं नव्हतं झालं होतं...

एका क्षणात जुईची अवघी दुनिया उद्ध्वस्त झाली होती..

सगळे सोपस्कार पार पडले...

कुणीही काहीही बोलत नव्हते.

हे सगळं घडवून आणण्यात नियतीचं काय प्रयोजन आहे..हेच कुणाला कळत नव्हतं..

जुईच्या आईला ही घटना समजल्यापासून ती बेशुद्धच होती...

जुईच्या तोंडून अजून एकही पुसटशीही वेदना बाहेर पडली नव्हती...

तिची समजूत कशी घालावी..हेच कुणाला समजेनासं झालं..

सुरेशराव आणि कमलाकर हतबुद्ध होऊन बसले होते..

दूरवरून रिसेप्शनसाठी आलेले नातेवाईक समोरचं दृश्य पाहून हळहळत होते..

सांत्वनासाठी शब्दच गोठले होते...

सुरेशराव जुईला डॉक्टर कडे घेऊन गेले होते..

तिला आवश्यक ती औषधे दिली ती सुरेशरावांनी खरेदी केली..आणि घरी आले..

सुमनताई सावरल्या होत्या...

त्या अंगणातच सुरेशरावांना म्हणाल्या.."अहो..आपण जुईला घरी घेऊन जाऊ..इथे तिला कुणी ना कुणी दोष देणारच"

हे ऐकून जवळच उभे असलेले कमलाकर खड्या आवाजात बोलले.."जुई आमची आहे आता...ती कुठेही जाणार नाही..तिला कसलंही दु:ख आता आम्ही देणार नाही..तिचं सुख ही आमची जबाबदारी.."

सुमनताई आणि सुरेशराव यापुढे काही बोलू शकलेच नाहीत..

कार्य उरकलं.. जुई हळूहळू भानावर येऊ लागली होती..

नातेवाईक निघू लागले..तोच कमलाकर पुढे आले...

" तुमच्या सर्वांसमोर आत्ताच मला काही बोलायचं आहे..तुम्ही कुणीही जाऊ नका...मी काही निर्णय घेतलाय..तो मला तुम्हाला सांगायचाय"..

सगळे बसले..सुमनताई सुरेशराव तेजसच्या आई..सगळे आ वासून कमलाकरांकडे पाहत होते..

ते काय बोलतात..याकडे सर्वांचे लक्ष लागले.. जुईला समोर बसवलं.. नीरजही होताच..

कमलाकर बोलू लागले..

"मी घेतलेला निर्णय तुम्हाला पटेल की नाही..माहित नाही..पण..मी ते धाडस करणार आहे..आज जे जुईच्या बाबतीत झालंय ते माझ्या मुलीच्या बाबत झालं असतं तर? तरीही मी असाच निर्णय घेतला असता...

मी जुईला सून म्हणून या घरात आणलं... दुर्दैवाने नको ते घडलं..यात आपल्या कुणाचाच कसलाच दोष नाही..पण मग त्या मुलीनं आपलं आयुष्य याच दुःखात घालवायचं का? . .हे मला अजिबातच मान्य नाही...

मी कालच नीरजशी बोललोय..नीरज खूप धीराचा आणि गुणी मुलगा आहे आणि त्याचा आम्हाला खूप अभिमान वाटतो..मी ठरवलंय.. उद्याच जुईचं आणि नीरजचं लग्न लावून द्यायचं.."

समोर बसलेल्या प्रत्येकासाठी हा मोठा धक्का होता..

सुरेशराव तर धाय मोकलून रडू लागले..काय प्रतिक्रिया द्यावी..हे कुणालाच कळेना...

कुजबुज सुरु झाली..पण कमलाकर ठाम होते..ज्यांना पटलं नाही ते काही नातेवाईक उठून गेले..

तेजसची आत्या म्हणाली.."दादा, पण या सगळ्यात जुईचं मत विचारात घेतलंस का?"

कमलाकर जुईजवळ गेले..तिच्या पाठीवर हात ठेवून त्यांनी तिला जवळ घेतलं..आपल्या बाबांच्या कुशीत शिरावं इतक्या सहजपणे ती त्यांच्या कुशीत शिरली आणि हमसून हमसून रडू लागली..कमलाकरांनी तिला रडू दिलं..बराच वेळ तसाच गेला..ती रडून रडून थकली..

"बाबा, माझ्या हाती काहीच उरलं नाही हो..."

"असं नाही बाळ!..अजून सगळं आयुष्य उरलंय तुझं..आणि तुझं आयुष्य याच घरात फुललेलं मला पहायचंय"..कमलाकर म्हणाले.

एव्हाना तेजसच्या आई या नवीन धक्क्यातून सावरल्या. पुढे येऊन जुईच्या डोक्यावर हात फिरवला त्यांनी आणि कमलाकरांच्या निर्णयाला आपली पसंती दर्शवली..

दुस-याच दिवशी घरातच जुई आणि नीरजचं साधेपणाने लग्न झालं..

ती दगड होऊनच उभी होती.. तेजससोबत बोहल्यावर चढताना. .काहीतरी चुकतंय..असा विचार तिच्या मनात आलेला..तो तिला आठवत होता.. तशाच अवस्थेत तिनं पुन्हा गृहप्रवेश केला..

सासूबाईनी प्रेमानं तिचं स्वागत केलं.. पूजाविधी आटोपले..पाहुणे आपापल्या घरी परतले..

पुन्हा एकदा आपल्या लेकीचं घरटं विणलं गेलं हे पाहून सुरेशराव आणि सुमनताई कृतकृत्य झाले..कमलाकरांचे,नीरजचे आणि सगळ्याच मंडळींचे आभार कसे मानावेत हे त्यांना सुचेना..

जड अंतःकरणाने तेही आपल्या घरी परतले.. रात्र झाली..आता नीरज आणि जुई..भेटणार होते..

ते दोघे त्यांच्या बेडरूममध्ये आले..नीरजने हलक्या हाताने कडी लावली..

"जुई..जोवर तू मनानं पूर्णपणे सावरत नाहीस..तोवर आपण फक्त चांगले मित्र राहू"..नीरज म्हणाला..

ती काहीच बोलली नाही.

"जुई..तू निर्धास्त रहा..मी कधीच तुला दुखावणार नाही"..

आता मात्र जुई उठली..

"नीरज..तुझ्यावर असा निर्णय घ्यायची वेळ आली ना?माझं आयुष्य बरबाद होऊ नये म्हणून..बाबांनी जबरदस्ती केली म्हणून तू हा निर्णय घेतला आहेस ना?"

नीरज म्हणाला.."अजिबात नाही..काही दिवसांपूर्वी मी एका मुलीवर जीवापाड प्रेम केलं..पण तिच्यासमोर व्यक्त नाही करू शकलो..पण दुर्दैवाने तिचं लग्न दुसरीकडे झालं...

मी स्वतःची अशी समजूत घातली की..प्रेमाची परिणती विवाहातच व्हायला हवी..असं काहीच नाही..

प्रेमाची अनेक रुपं असतात.प्रेमाची सगळीच रूपं निराळी,

कधी रम्य वनराई, कधी ऋतू वसंत, तर कधी रात्र काळी...

त्यातलं त्यागाचं रूप माझ्या नशीबी आलं...आणि त्यागातच खरं प्रेम असतं...हे मला पटलं.. तशीच मनाची समजूत घातली..

मौनातच अश्रू ढाळत बसलो सुकलेल्या फुलांना सुगंध मागत राहिलो.

जुई थरारली...तेच पत्रं वाचून शहारणं तिनं क्षणभरासाठी अनुभवलं..

मनानं मनाला ओळखलं..हृदयानं हृदयाशी संवाद साधला.. प्रेम असंही असू शकतं?

शब्द संपले..ती स्वतःच्याही नकळत नीरजच्या कुशीत शिरली..त्याच्या हृदयाशी डोकं ठेवत ती म्हणाली...

"नीरज..मी ओळखलं तुला..का नाही तेव्हाच समोर आलास?का माझा असा अंत पाहिलास?"

शांतपणे नीरजने तिच्या डोक्यावरून हात फिरवला..

जुई, प्रेमाचा हा रंग आपल्याला खूप काही शिकवून गेला. .हो ना? आधीच मनाचं अद्वैत झालेलंच होतं...

श्वासात श्वास मिसळले आणि आता दोन शरीरं एक झाली... कायमची..

**लेखिका:** सविता कारंजकर सातारा

**मोबाईल:** 9922814183

**ईमेल:** karanjkar.savita@gmail.com

***(लेखिका प्रसिद्ध निवेदिका आणि कथा लेखक तसेच पाककला निपुण आहेत. त्यांनी अनेक नाटकांमध्ये भाग घेतला आहे.)***

📖 ⌘ ✶

## कथा: प्रेमात पडताना (भाग 1)- सत्यजीत भारत

सत्यजीत बी.एस्सी च्या दुसऱ्या वर्षात सोमय्या कॉलेज मध्ये शिक्षण घेत होता. कॉलेजचा भरमसाठ खर्च पाहता घरी वारंवार पैसे मागणं त्याला पटत नव्हतं म्हणून त्याने चेंबूर मधील एका नामांकित कोचिंग क्लास मध्ये शिकविण्यास सुरुवात केली जेणेकरून पॉकेटमनी चा खर्च तरी भागेल.

सत्यजीत हा शांत स्वभावाचा. कसल्याही प्रकारचा वायफळ खर्च करने तो टाळत. सिनेमाला जाणे, पार्ट्या करणे, डिरींक्स घेणे, स्मोकिंग करने हा त्याचा स्वभाव नव्हता. मित्रांनी आग्रह केल्यास तो मित्र बदलेल पण सिद्धांत नाही.

त्याला छंद होता तो हरिनामाचा. वर्तमानपत्रा मध्ये आलेली आध्यात्मिक पोस्ट्स तो आर्वजुन कटिंग करून संग्रहित करत. दूरदर्शनवर दाखवलेली संतवाणी वहीत टीपून घेत. मराठीच्या पुस्तकातील अभंग तो नीट अभ्यासत. ईश्वराप्रति व सनातन धर्माविषयी त्याच्या मनात प्रगाढ़ श्रद्धा होती. तो एका आध्यात्मिक संघचा सदस्य होता. समविचारी मित्रांचा सहवास आनंददायकच होता त्याला. प्रत्येक आयितवारी तो सत्संगास जात.

पण जेव्हापासून सुरय्या त्याच्या आयुष्यात आली तेव्हापासून रविवारचा सत्संग बंदच झाला. आठवड्यातून तीनच दिवस त्याचे क्लासेस मध्ये लेक्चरस् असायचे पण आजकाल तो सातही दिवस क्लासेसवर यानं त्या कारणाने जात. तिच्याशी बोलण्याची संधी शोधत. त्याचं बदललेलं वागणं पाहून घरी कोणी काही विचारल्यावर त्याची चिडचिड होत. कारण होतं सुरय्या......

हो सुरय्या..... सुरय्या ही अत्यंत देखणी, मृदु भाषी, रंगाने सावळी पण स्वभावाने धवळ. तिचं शिक्षण उर्दू माध्यमातून सातवी पर्यंत झालेलं. इंग्रजीचा गंध ही तिला नव्हता. पण तरीही तिला एका नावाजलेल्या क्लासेस मध्ये काउंसलरचा (Counsellor) जॉब मिळाला होता. कारण होतं देखणं रूप आणि कमी पगारात काम करण्याची तयारी. तिच्या घरी अठराविश्व दारिद्य. तिचा अब्बा पक्का बेवडा. मोठा भाईजान रिकामटेकडा व उडान-टप्पू. लहान

भावंडांची तर मोठी रांगच होती. तिची अम्मी ही भटक-भवानी. म्हणून घराची सर्व जबाबदारी सुरय्या वर होती.

सत्यजीत आणि सुरय्या च्या प्रेमाची कळी उमलू लागली. त्याचा गंध सगळीकडे पसरू नये याची काळजी दोघे पण घेत. पण उमललेल्या फुलांचा गंध कैद करता येत नाही. तसंच प्रेमाची वार्ता लपविता येत नाही. हो हो म्हणता म्हणता प्रेमाची खबर सुरय्या च्या घरात जाऊन पोहचली. सुरय्या वर प्रश्नांचा भडीमार झाला. तिनं हे सर्व साफ खोटं असल्याचं म्हटलं. तरी सुद्धा तिच्या अम्मीने तिला धम्मक लाडू घातले होते. मोठ्या भाईजान ने तर बकरा हलाल करायचा सुरा काढला होता. पण एवढ्या नंतर ही तिला काम सोड.... घरात बस.... असं कोणीच म्हंटलं नाही. पण जासुसांचा ससामीरा सुरू झाला.

दोघांना भेटण्याची पंचायत झाली.

दोघांची आठवड्याची ऑफ ( सुट्टी ) वेगवेगळ्या दिवशी होती. सुरय्या ची सुट्टी ज्या दिवशी असत त्या दिवशी कॉलेजेला दांडी मारून बेलापुरला भेटण्याचं सत्यजीतने ठरवले. नवी मुंबई मध्ये एवढ्या लांब कोणी कबाब में हड्डी असणार नव्हतं. पण रजेच्या दिवशी घरातून बाहेर पडण्यासाठी सुरय्याला बरीच कसरत करावी लागे. बेलापूर स्टेशन पासून सरळ चालत गेल्यावर खाडी च्या किनार्यावर सुंदर सरोवर विहार उद्यान साकारलं आहे. प्रेमी युगलांसाठी तर चांगले ठिकाण. पण काहींच्या डोळ्यात प्रेम ही खुपणारी गोष्ट. सर्व नैतिकतेचा ठेका या संस्कृती रक्षकांनी घेतलेला

असावा. पोलिसात कंपलेट (तक्रार) करणं हे त्यांचे मजबूत शस्त्र. या शस्त्राचा प्रहार हा सत्यजीत आणि सुरय्यावर झाला.

एकदा दोघे उद्यानात बसले होते. अचानक उद्यानाच्या बाहेरच्या बाजूस वॅन येउन थांबली. एक प्रोढ हवालदार त्यांचं जणु सहा महिन्याचं पोट सांभाळत त्यांच्या मधोमध दत्त म्हणून उभा ठाकला.

कर्णकर्कश आवाजात त्याने दरडावयाला सुरूवात केली.

"पब्लिक प्लेस (सार्वजनिक स्थानी) मध्ये कसले चाळे चाललेत.... "

"सर आम्ही फक्त बसलोत..आणखी काही नाही.. "

सत्यजीतने स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला.

"जास्त बोलू नकोस.... चल वॅन मध्ये बस..... "

"पण सर आम्ही काहीच चुकीचं केलं नाही..... " सत्यजीत म्हणाला.

"मुकाट्याने गाडीत बस.... नाहीतर हा दांडका बोच्यावर पडला म्हणून समज.... " हवालदार जोराने खडसावला.

सुरय्याची तर बोलती बंद झाली. तिच्या दोन्ही कमळनेत्रां मध्ये गंगाजमुना दाटून आल्या. सत्यजीत नाइलाजाने वॅन मध्ये चढला. वॅन मध्ये आधिच तीन-चार टाळकी याच कारणामुळे जमा होती.

वॅन मध्ये जाताच सत्यजीत वर अन्य पोलीसकर्मिन कडून सवालांची फायरिंग सुरू झाली.

"तुझं नाव काय ?

कोणत्या कॉलेज मध्ये शिकतोस ?

कौन होती ती पोरगी....??

थांब.... तिला पण आत घेतो....

कुठे राहतोस ?

बाप काय करतो.....? बापाचा नंबर दे...."

सत्यजीत पूर्ण भांबावून गेला.

बेचारा सत्यजीत केविलवाणा चेहरा करून चालत्या वॅन मध्ये स्थीर उभा राहण्याचा प्रयत्न करत होता.

शेवटी पोलीस ते पोलीस..... त्यांच्या मुळ स्वभावावर आले.

एक हवालदार म्हणाला,

"तुला जायचं असेल तर फाइन भरावी लागेल."

सत्यजीत ने उत्तर देण्या आधिच दुसरा म्हणाला,

"..... आठशे रूपये ची पावती फाडावी लागेल"

"पण सर माझ्या कडे इतके रूपये नाहीत.... ", असं म्हणत सत्यजीत ने वॉलेट समोर धरलं.

"आम्ही कोणाच्या पाकिटाला हात लावत नाही. .... " असं म्हणत अन्य एका पोलीसकर्मींने

पूर्ण वॉलेट तपासलं. त्याच्या मध्ये फक्त अठ्यान्नव रूपये पन्नास पैसे होते. यामुळे तर पोलीसांचा पारा चांगलाच चढला. हाती आलेला बकरा काहीच कामाचा नव्हता.

सत्यजीतचा रडकुंडी चेहरा पाहून जमा टाळक्यां पैकी एक जण हळूच त्याच्या कानात म्हणाला, "भाई काय को रोता है, थोडी देर घुमायेंगे, खर्चा पाणी निकालकर सबको छोड देंगे.... टेन्शन नॉट.... समजा" बहुतेक तो महाशय बराच अनुभवी होता.

झालं ही तसच. बराच वेळ वॅन बेलापूर च्या परीसरात फिरली....शेवटी ज्याच्या कडून जितके निघतील तितके पैसे काढून सर्वांना वॉर्निंग देवून सोडलं. कोणाला ही पैसे घेतल्याची कसलीही पावती वा रसीद दिली नाही.

गाडी तून उतरताच ईश्वराचं आभार मानत पुन्हा इकडं यायचं नाही असं त्याने मनोमन ठरविले. भानावर येताच.....

सुरय्या कुठे असेल....? तिची हालत कशी असेल ? अशा अनेकानेक प्रश्नांचा कोलाहल त्याच्या मनात चालला होता. तिला शोधण्यासाठी त्याने संपूर्ण सरोवरविहार उद्यान परिसर, आजूबाजूचा स्टेशन एरिया पालथा घातला. बराच वेळ शोधल्यावर सुद्धा ती काही सापडली नाही.

क्रमशः . ..

उर्वरित कथा पुढील भागात....

प्रस्तुत कथा सत्य घटनेतून प्रेरीत आहे....कथे संदर्भात वाचकांनी आपला अभिप्राय लेखकास WhatsApp च्या माध्यमातून नक्की कळवावा..... WhatsApp No. 7208789104

**लेखक:** सत्यजीत भारत, नवीन पनवेल

**मोबाईल: 7208789104**

**ईमेल :**excelindia786@gmail.com

📖 ⌘ ✶

बाल कथा: ते दोन अद्वितीय - लेहिनी नायर, मलेशिया

**टॉम यंग**

टॉम यंग एक सत्तर वर्षांचा स्कायडाइव्हर होता जो खेळण्याच्या कारखान्यात अर्धवेळ म्हणून काम करीत होता. तो हिमालयातील माउंट के 2 च्या वरुन डावीव्हिंगचे स्वप्न पाहत असे.

माउंटनच्या शिखरावरुन उडी मारण्याआधी त्याला खूप सराव करावा लागला. बऱ्याच सरावानंतर तो काही उंच टेकड्यांवरून स्कायडाइव्ह करू शकला.  काही दिवसांनतर त्यांना या माउंट के 2 डोंगरावरुन स्कायडाइव्ह करण्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी महिनाभर शाळा सोडण्याची गरज होती.

अखेरीस तो दिवस आला जेव्हा तो डोंगरावरुन जायला निघाला. एका वेगवान विमानाने त्याला के 2 माउंटच्या वर आणले. पण त्याचा संरक्षक पट्टा तुटला आणि  दुर्दैवाने त्याचे डोके खडकावर आपटले गेले, त्याच्या चेहऱ्यावर आणि पायांवर बऱ्याच जखमा झाल्या.

थोड्या वेळाने तो जमिनीवर सपाट पडलेला होता आणि विचार करीत होता की तो कुठे आहे आणि त्याचे नाव काय आहे? कारण टॉमला मेमरी लॉस झाला होता.

पर्वताचा आत्मा शांतपणे त्याचेकडे पाहात राहिला.

बचाव टीमने त्याला हॉस्पिटलमध्ये नेले. टॉम दुःखाने हॉस्पिटलच्या बेडवर पडलेला होता. स्कायडाइव्हिंग आणि त्याच्या कुटुंबासाठी त्याच्या इच्छा वगैरे अशा त्याच्यासाठी सर्वात महत्त्वाच्या गोष्टी देखील त्याला आठवत नव्हत्या.

एक दिवस टॉम फक्त थकला होता म्हणून सहज लोळला होता तेव्हा सहज म्हणून त्याने एका टेबलावरुन एक मासिक घेतले. त्यात माउंट के 2 बद्दल लिहिले होते. ते पुस्तक वाचल्यानंतर त्याला पर्वतावर चढवायची इच्छा झाली.

त्या दिवशी, तो जगाला दाखवत होता की काहीही अशक्य नाही. तो माउंट के 2 वर चढत होता. लोक म्हणाले की कुणीही तेथून जिवंत खाली येत नाही. आपले जाकीट घेऊन तो चढला आणि त्या ठिकाणी पोहोचला पण टॉम पर्वताच्या शिखरावर पोचला पण अस्वस्थ झाला आणि बेशुद्ध पडला कारण ऑक्सीजन कमी पडला.

पर्वताचा आत्मा बघत होता, त्याला दया येऊन त्याने टॉमला त्याची मेमरी परत केली.

दुसऱ्या दिवशी बचाव टीमने त्याला परत घरी नेले. तो त्याच्या खोलीत बराच वेळ झोपला. जेव्हा तो जागे झाला तेव्हा टॉम म्हणाला, "हं ममी आणि पप्पा"!

त्यांनी त्याला आलिंगन दिले. टॉम खूप आनंदी होता आणि त्याच्यामुळे बऱ्याच लोकांना प्रेरणा मिळाली.

**डायना स्ट्राँग**

डायना स्ट्राँग एक 19 वर्षीय चित्रकार होती, जिने लाकडी खेळणी बनवणाऱ्या कारखान्यात काम केले. जगातील सर्वांत महान चित्रकारांपैकी एक बनण्याबद्दल तिने नेहमीच स्वप्न पाहिले.

एके दिवशी जेव्हा कारखान्यात कोणीतरी अनुपस्थित होते तेव्हा तिला त्याच्या ऐवजी काम करण्यास सांगितले गेले. लाकूड तोडणे हे काम होते. तिने मशीन सुरू केली तेव्हा तिचा फोन वाजला. तिने एक क्षण दूर बघितले. तोपर्यंत मशीन तिच्या दोन्ही हातावर चालत आले आणि तिने दोघेही हात गमावले. तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, पण डॉक्टर तिचे हात वाचवू शकले नाहीत.

डायनाच्या फक्त शरीरातच नव्हे तर तिच्या मनातही वेदना होत होत्या. उत्कृष्ट पेंटिंग्जची तिची स्वप्ने विस्कळीत धुळीस मिळाली की काय असे तिला वाटू लागले.

एका वर्षानंतर...

तिच्या पायांनी सामान हाताळण्याची डायनाला आता सवय झाली होती. ती लिहिण्यास, तिचे केस बांधण्यास आणि पोहायला जाण्यास मदत करायला ते पाय सक्षम होते. म्हणून तिने तिचा पेंटब्रश तिच्या उजव्या पायासह धरण्याचा प्रयत्न केला आणि हेतिला जमले. तिचा पुढची पायरी चित्र पेंट करण्याचा प्रयत्न ही होती. तिने प्रयत्न केला पण तिने चित्रित केलेले सर्व चित्र विचित्र दिसू लागले. तिने हार मानली नाही कारण तसा प्रयत्न करण्यात तिला खूप मजा वाटू लागली.

डायना म्हणाली, "मी आता प्रयत्न सोडले तर मी एक कायम बिछान्यावर पडून राहिलेला एक बिनकामी व्यक्ती होऊन जाईल! "

म्हणून तिने दररोज प्रयत्न चालू ठेवले.

एके दिवशी तिने चित्रांविषयी एक लोकप्रिय पुस्तक वाचले. तिने पुस्तकासाठी चित्र काढण्याचा प्रयत्न केला. दिवसेंदिवस तिने चित्रांवर काम केले. एक दिवस त्यात यश आले.

डायना यांनी त्या पुस्तकाचे लेखक शॉन स्टीव्ह यांना चित्र पाठविण्याचा निर्णय घेतला. शॉन स्टीव्ह तिच्या चित्रांमुळे प्रभावित झाले आणि त्यांनी तिला भेटायचे ठरवले.

नियोजित भेटीच्या ठरलेल्या दिवशी डायना जेव्हा श्री स्टीव्हच्या घरी पोहोचली तेव्हा तिने तिच्या कपाळाने दरवाजावर बेल दाबली. श्रीमान स्टीव्हने दरवाजाची घंटी ऐकली आणि दार उघडले. डायना बेलला डोके मारताना त्यांनी पाहिले.

डायना म्हणाली, "हाय मिस्टर स्टीव्ह!"

श्रीमान स्टीव्ह म्हणाले, "आपण साक्षात डायना आहात का?"

डायना म्हणाली, "हो मी डायना आहे. आपण शॉन स्टीव्ह असणे आवश्यक आहे ".

तो म्हणाला, "पण आपल्याकडे हात नाहीत. आपण कसे पेंट करू शकता? " तो आश्चर्यचकित झाला.

डायना म्हणाला "हो, मी करू शकतो. माझ्या पायांसह ".

श्री स्टीव्हने तिच्यामध्ये स्वागत केले.

तो म्हणाला, "मी त्याबद्दल विचार केला आहे आणि मी माझ्या पुस्तकासाठीचे आपण काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन करू इच्छितो".

डायना ने संमती दर्शवली. अनेक लोक प्रदर्शनाकडे आले कारण ते लोकप्रिय पुस्तक होते आणि तिने फक्त तिचे पाय ते पेंट करण्यासाठी वापरले होते. प्रदर्शन संपल्यानंतर ती लोकप्रिय झाली आणि जगातील महान चित्रकारांपैकी एक बनली.

ती जगातील सगळ्यांसाठी एक प्रचंड प्रेरणा स्रोत बनली.

दोन वर्षांनंतर...

डायना तिच्या कामाच्या जुन्या ठिकाणी भेटायला गेली.

तिने दोन वर्षापूर्वी कारखान्यात अनुपस्थित असलेले टॉम दिसले, ज्यांच्यामुळे तिला लाकूड कापावे लागले होते. ती त्यांच्याकडे गेली.

ती म्हणाली, "अहो आपण तेच आहेत ना , माउंट के 2 पर्वतावर चढून विक्रम करणारे?."

टॉम म्हणाला, "होय आणि तुम्ही डायना स्ट्राँग, प्रसिद्ध चित्रकार आहात. बरोबर?"

डायना म्हणाली, "मला माहित नव्हते की तुम्हीही इथे काम केले होते. तुझा प्रवास कसा झाला ?"

टॉम म्हणाला, "फार चांगला नव्हता, परंतु मी खुश आहे की मी एक आनंदी जग माझ्याभोवती बनविले आहे".

"मी सुद्धा" डायना म्हणाली.

त्यांच्यात बऱ्याच गोष्टी समान होत्या. दोघेही चांगले मित्र झाले आणि जग एकत्र प्रवास केला.

ते प्रथम स्विझर्लंडमध्ये गेले होते. स्वित्झर्लंडनंतर ते वॉर्सा येथे गेले. एक कलाकार म्हणून, यावेळी, डायनाने या सर्वांचा आनंद घेतला.

**लेखिका:** लेहिनी नायर (इयत्ता 9 वी), मलेशिया

**ईमेल:** storybonds@gmail.com

**अनुवाद:** निमिष सोनार (मूळ कथा इंग्रजीतून आहे)

📖 ⌘ ✶

## शनि ग्रहाचे महत्व – मंजुषा सोनार

***(हा लेख ज्योतिषशास्त्राशी संबंधित आहे)***

शनि हा सूर्यमालेतील सहावा ग्रह आहे. शनीच्या भोवती कडे आहे. शनीचा व्यास 120500 किमी आहे. अडीच वर्षांमध्ये शनी एक रास पुढे सरकतो. शनीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास साधारण 29 वर्षे लागतात.

शनीदेवांच्या डोक्यावर सुवर्ण मुकुट, गळ्यात माळा शरीरावर निळ्या रंगाचे वस्त्र असते. शनीच्या हातात धनुष्यबाण आणि त्रिशूल असते. शनीच्या फेऱ्यात शंकराला बैल बनवून जंगलातून फिरायला लागले होते. रावणाला पण मृत्यूच्या फेऱ्यातून जावे लागले.

शनिदेवाचे वडील सूर्य आहेत. कुंडलीतील शनीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. अंकशास्त्र नुसार शनि 8 अंकाचा कारक आहे. शनि मकर व कुंभ राशीचा अधिपती आहे. शनीचा शरीरातील हाडांवर अंमल आहे. ज्योतिषशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास शनि आयुष्याचा कारक आहे. शनीचा मूळ पिंड दुःख आणि नैराश्यवादी आहे. शनी हा मृत्यूचा कारक आहे. शनीचा अंमल शरीरातील हाडांवर असतो.

कंपवात, दीर्घ मुदतीचे आजार, संधिवात, खोकला, अर्धांगवायु, मुकेपणा, व्यंग वगैरे दृष्टीने शनीचा अभ्यास कुंडली साठी करता येतो. शनी हा व्यवसाय आणि उद्योग यांचा कारक आहे. ज्योतिषांनी शनीचा संबंध आयुष्य मरण भय लोखंड शिसे वृद्धावस्था दारिद्र्य चोरी आळस व्यंग मोह नाश निष्ठुरता दुर्बुद्धी आपत्ती दैन्य कष्ट या गोष्टींशी लावला आहे. या सर्व गोष्टींचा कारक ग्रह म्हणजे शनी. शनि हा शांत मंद विचारी गंभीर आहे, शनी काटकसरी आहे. शनी आतल्या गाठीचा आहे. दीर्घ विचार, हळूहळू घेतले जाणारे निर्णय, सतत टोचणी, काळजी, हळूहळू ग्रासणारे नैराश्य, पीछेहाट होणे, उतरती कळा हे सगळे शनीच्या कारकत्व खाली येते.

शनि ची सकारात्मक बाजू म्हणजे तो कुंडलीतील चांगल्या स्थितीत आणि अनुकूल असेल तर चिकाटी, दीर्घोद्योगी पणा, उत्तम नियोजन, सूत्रबद्धता, सुसंगतता, कार्य-कारण परिणाम वगैरे सर्व देतो. त्यासोबत तो काटकसर, शांतपणा, व्यवहारीपणा हे सगळे देतो.

शनी हा पूर्वजन्मी केलेल्या कर्माप्रमाणे फळ देणार असतो. म्हणून हा ज्योतिष शास्त्र मधील सगळ्यात महत्त्वाचा ग्रह ठरतो. हे फळ साडेसाती तसेच शनीच्या महादशेत मिळते. साडेसाती साडे सात वर्षांची तसेच शनीची महादशा 18 वर्षांची असते.

शनिच्या साडेसाती आणि त्याच्या महादशेत आणि अंतर्दशेत तो कुंडलीमध्ये ॲक्टिव्ह होतो. शनि प्रत्येकालाच वाईट फळ देतो असे नाही. कुंडलीतील द्वितीय स्थान तसेच इतर ग्रहांशी असणारे संबंध त्यावरून हा निर्णय घेता येतो.

**लेखिका:** मंजुषा सोनार, पुणे (ज्योतिष प्राज्ञ)

**मोबाईल:** 9767676972

**ईमेल:** sonar.manjusha@gmail.com

***(लेखिका अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासक असून त्या ज्योतिष विषयातील पदवीधारक तसेच अंकशास्त्र प्रवीण आहेत)***

📖 ⌘ ✶

## त्या रात्री मला कोण बरे भेटले? – प्रभाकर पटवर्धन

आजकाल दैवी गोष्टी घडत नाहीत असे काहीजण म्हणतात परंतु माझा अनुभव वाचल्यावर त्यांचे मत निश्चित बदलेल असा मला विश्वास आहे. त्या अनुभवातून गेल्यावर मी एवढा सुन्न झालो होतो, एवढा रोमांचित झालो होतो, की मी एवढा भाग्यवान आहे यावर माझा विश्वासच बसत नव्हत. उगीचच न कळण्यासारखे गोलगोल लिहित बसण्यापेक्षा मी पहिल्यापासून काय झाले ते तुम्हाला सांगतो!

त्या दिवशी मला काही कामानिमित्त रत्नागिरीला जावयाचे होते. आमच्या गावाहून एसटी नसल्यामुळे दोन तीन किलोमीटरवरील गावात जाऊन तिथून एसटी पकडावी लागे.एसटी बरोबर आठ वाजता होती. आमच्या गावाहून सुमारे चाळीस  मिनिटे पावस, जिथून एसटी सुटते, तिथे पोचेपर्यंत लागतात. मी सकाळी सात वाजता घरातून निघालो. वाटेत आमच्या गावचे एक आदरणीय गृहस्थ काकासाहेब भेटले. काकासाहेब नेहमीच जरा अघळपघळ बोलतात. मला जायचे आहे असे म्हणून चटकन तोडून जाता येत नाही. आपण जरी मला गाडी पकडायची आहे म्हणून जोर केला,तरी ते जाशील रे, असे म्हणून आपली कथा पुढे चालू ठेवतात. त्यात पंधरा मिनिटे गेली. अजूनही आठची एसटी पकडणे सहज शक्य होते. जर भरभर चालत गेले आणि उतारांवरून पळत गेले तर अर्ध्या तासात पोहोचता येते. पुढे वाटेत बैलांची एक झुंज लागली होती. दोघे एकमेकांना एवढे रेटत होते की त्यांच्या जवळून रस्त्यातून जाणे धोक्याचे होते.रस्त्यात गर्दी अर्थातच नव्हती. गर्दीच काय चिटपाखरूही नव्हते. खेडेगावातील रस्त्यांवर एका गावाहून दुसऱ्या गावाला जाताना  कुणी भेटले तर एखादे माणूस भेटते, अन्यथा सर्व शुकशुकाट असतो.  रस्ता अरुंद आणि रस्त्यातच त्यांची झुंज चालू होती. झुंज सुटेपर्यंत आणखी दहा मिनिटे गेली. आता एसटी मिळणे दुरापास्त होते. लेट असेल नशिबात असेल तर मिळेल असे म्हणून मी भरभर चालत स्टँडवर गेलो.

एसटी निघून गेलेली होती दुसरी एसटी नऊ वाजता होती. ती एसटी पकडून रत्नागिरीत पोचेपर्यंत साडेदहा वाजून गेले होते. आता माझी सर्व कामे आटपून संध्याकाळी वेळेवर घरी परत येणे कठीण होते.तरीही मी पटापट कामे उरकत होतो.  कधी नव्हे ते आज बरेच ओळखीचे लोक भेटत होते. त्यांच्याशी दोन चार शब्द बोलण्यात आणखी वेळ जात होता. माझी दंतवैद्याकडे अपॉइंटमेंट होती.जेवून मी त्यांच्याकडे गेलो. तिथे गर्दी होती. आत गेलेल्या पेशंटने बराच वेळ खाल्ला. नंतर माझे काम होऊन तिथून निघेपर्यंत संध्याकाळचे पाच वाजले. अजून दोन तीन कामे उरकेपर्यंत संध्याकाळचे सात वाजले.

संध्याकाळची सहाची एसटी निघून गेली होती. आता शेवटची आठची एसटी मिळणे शक्य होते.रात्री सव्वानऊ साडेनऊनंतर मला एकटय़ानेच सड्यावरून कातळ तुडवीत जाणे भाग होते. रत्नागिरीला काकांकडे वस्ती करावी असा एक विचार केला. परंतु घरची मंडळी काळजी करतील.  मी रत्नागिरीला  राहिलो हे त्यांना कळविण्याचे काहीही साधन नव्हते. तेव्हा रत्नागिरीला राहण्यापेक्षा आपण आठच्या एसटीने जावे असे मी ठरविले.रस्ता पायाखालचा आहे आपल्याजवळ बॅटरी आहे हा हा म्हणता घरी पोचू असा विचार मी केला. चांदणी रात्र आहे काळजीचे कारण नाही.असाही मी  विचार केला. शेवटी हो ना, हो ना, करता करता मी आठची एसटी पकडली. दुर्दैवाने ती एसटी वाटेत बंद पडली. काही तरी खाटखूट करून ड्रायव्हरने ती सुरू केल्यावर पुढे टायर पंक्चर झाला. टायर बदलून पुढे स्टँडवर पोचेपर्यंत रात्रीचे साडेबारा वाजले. पावसला कुणाला तरी उठवून त्याच्याकडे वस्ती करण्यापेक्षा सरळ आपल्या  घरी जावे असे मी ठरविले.

आणि अशा प्रकारे मध्यरात्रीनंतर सड्यावरून मी एकटाच चालत घरी निघालो. निघालो तेव्हा मनात काहीही भीती नव्हती.चालत असताना मनात केव्हा भीतीचा प्रादुर्भाव  झाला ते माझे मलाच कळले नाही. सड्यावरून अशाचप्रकारे एकटे जाणाऱ्या लोकांच्या ऐकलेल्या हकीगती आठवू लागल्या. फलाणा असाच रात्रीचा सड्यावरून एकटा जात होता त्याला फुरसे चावले आणि तो दोन महिने अंथरुणावर पडून होता.

दुसरा एक असाच जात असताना त्याला भुलीचे झाड भेटले आणि तो रात्रभर एकटाच वाटोळा वाटोळा सड्यावर सकाळपर्यंत भटकत होता.

तिसरा एक सड्यावरून जात असताना त्याला वाघरू भेटले सुदैवाने वाघाने त्याला काही केले नाही.

कुणाला कोल्हे भेटले. कुणाला लांडगे भेटले. कुणाला रानडुक्कर भेटले.कुणाला भूत भेटले. एक ना दोन नाना हकीगती. मिंय्या मूठभर आणि दाढी हातभर या म्हणीप्रमाणे छोट्या गोष्टीना वावभर शेपूट जोडून कहाण्या निर्माण करण्यात आणि घोळून घोळून त्या सांगण्यात खेडेगावातील मंडळी वाकबगार.

त्या सगळ्या कहाण्या मला आठवू लागल्या. रत्नागिरीला राहिलो असतो तर फार चांगले झाले असते असे वाटू लागले. निदान पावसला तरी एखाद्याकडे जाऊन राहायचे एवढ्या माझ्या ओळखी पण आता या विचाराचा काय उपयोग. आगे बुद्धी वाणिया व पीछे बुद्धी बामणीया या म्हणीप्रमाणे सर्व कारभार!असे करता करता मी चालतच होतो आता निम्मे वाट सरली होती.चांदण्यात झुडपांच्या सावल्या काहीतरी विचित्र आकार दाखवत होत्या.कुठेही बघितल्यावर काहीतरी विचित्र आकार दिसत होते. भरभर भरभर चालता चालता मला धाप लागली होती. समुद्राचे गार वारे अंगावर बसत असतानाही मला दरदरून घाम फुटला होता. आता उतार लागला होता. उतारावरून धावत सुटावे आणि एकदा घर गाठावे असे वाटत होते. परंतु पाय विचारांना साथ द्यायला तयार नव्हते.

इतक्यात पाठीमागून मला कुणी तरी हाक मारली. प्रभाकर प्रभाकर अरे थांब.माझ्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला. भीतीने पाय लटपटू लागले. झक मारली आणि या रात्री घरी जाण्याच्या फंदात पडलो असे मला वाटू लागले. एवढय़ात पाठीमागून हाक मारणारी व्यक्ती माझ्या पुढय़ात येऊन उभी राहिली. पाहतो तो ते आमच्या गावचे मला सकाळीच भेटलेले काकासाहेब होते.सकाळचाच पोषाख त्यांच्या अंगावर होता.फक्त भरीला एक दणकट काठी त्यांच्या हातात होती.कातळावर आपटल्यावर त्याचा एखादे नाणे खणकन वाजावे तसा खणकन आवाज येत होता.काकासाहेबांना भेटल्या बरोबर माझी भीती कुठच्या कुठे पळाली. घाम येणे थांबले. लटपटणारे पाय स्थिर झाले.

अरे इतका रात्रीचा तू घरी कसा काय निघालास?रत्नागिरीला, पावसला, कुठे थांबायचे नाही का ?किती भरभर चालतोस ?मघापासून मी तुला गाठण्याचा प्रयत्न करीत आहे. तू तर धावतच सुटला आहेस.नेहमी प्रमाणे काकासाहेबांनी अघळपघळपणे फटकारले आम्ही हळूहळू उतारावर चालू लागलो. चालताना ते कातळावर काठी आपटून आवाज करीत होते. अशा आवाजाच्या लहरी सरपटणार्या प्राण्यांपर्यंत पोचतात आणि ते वाटेतून बाजूला होतात. यासाठी कोकणात रात्री चालताना काठी आपटत जाण्याची पद्धत आहे. त्याचप्रमाणे मुद्दाम करकर वाजणाऱ्या चपला,वहाणा, बनवून घेतल्या जातात. मी काकासाहेबांबरोबर उतारावर चालत असताना, ते सकाळी भेटल्यापासून झालेली सर्व हकीगत सांगितली. मला निरनिराळ्या कारणांनी उशीर का झाला ते सांगितले. वाटेत उशीर का झाला तेही खुलवून खुलवून सांगितले. कुठेही न थांबता घरी जाण्याचा निर्णय का घेतला तेही सांगितले. काकांबरोबर चालताना मला आश्वस्त सुखरूप असल्यासारखे वाटत होते. ते मला बोलता ठेवून,मला सुखरूप वाटेल ,असे पाहात होते,हे माझ्या लक्षात आले. काका एवढ्या रात्री इथे कसे काय हे माझ्या लक्षात येत नव्हते.कुणीतरी ओळखीची मोठी सोबत भेटल्याच्या आनंदात माझे तिकडे दुर्लक्ष झाले होते. तो विचार आता मनात जोरात डोकवू लागला.

काकांना माझ्या मनातील विचार जसे काही कळतच होते त्याप्रमाणे त्यांनी मी विचारण्याअगोदर आपणहून खुलासा करण्यास सुरुवात केली. ते पावसला कुणाच्यातरी कीर्तनासाठी गेले होते.कीर्तन संपल्यावर गप्पा मारता मारता उशीर झाला. काकासाहेब रात्रीचे कुठेही बिनधास्त जातात हे सगळ्यांना माहित होते. भीती हा शब्द त्यांच्या शब्दकोषात बहुधा नसावा. गप्पा नंतर कॉफी झाली आणि काकासाहेब एकटेच घरी येण्यास निघाले. काकांचा गप्पिष्ट स्वभाव, त्यांची कीर्तन प्रवचनाची अावड, त्यांचे बिनधास्त रात्रीचे फिरणे,त्यांचा धाडसी स्वभाव,हे सर्व मला माहित

असल्यामुळे ,त्यांचे असे एकटे मध्यरात्री येणे,मला कुठेच खटकले नाही. उलट ते मला त्यांच्या एकूण स्वभावाशी सुसंगत वाटले.

बोलता बोलता आमचे घर केव्हा आले ते कळलेच नाही. आमच्या घराच्या पुढे त्यांचे घर होते. मला बेड्यात (एक प्रकारचे फाटक) सोडून गुड नाइट म्हणून ते पुढे काठी वाजवीत गेले.मीही आपल्या घरी गेलो.इतका उशीर कां? म्हणून विचारता मी काकासाहेबांना सांगितलेली सर्व हकीगत पुन्हा सांगितली.कुणी सोबतीला होते का ?असे विचारता मी वडिलांना काकासाहेब बरोबर होते असे सांगितले. काकासाहेबांचा स्वभाव सर्वांना माहित असल्यामुळे त्यांचे रात्रीचे असे एकटे येणे भेटणे कुणालाही खटकले नाही.

दुसऱ्या दिवशी मी काही कारणाने काकासाहेबांच्या घरी गेलो होतो. सहज बोलता बोलता मी त्यांना कालचे कीर्तन कुणाचे होते? असे विचारले.त्यावर त्यानी कुठचे कीर्तन? कुठे होते? असे मला उलट विचारले.तुम्ही काल पावसला कीर्तनाला गेला होता ना? असे मी विचारता त्यांनी छे: मी काल रात्री घरीच होतो असे सांगितले. मला तू असे का विचारतोस ?असे विचारता मी त्यांना मला कुणीतरी पावसला कीर्तन होते असे म्हणत होते आणि कीर्तन म्हणजे तुम्ही तिथे जाणार म्हणून सहज विचारले असे म्हणून वेळ मारून नेली.

घरी येताना आणि अजूनही माझ्या मनात एकच प्रश्न आहे मला रात्री कोण भेटले?आमच्या घराच्या शेजारी आमच्या कम्पाऊंडमध्ये आमचे दत्तमंदिर आहे.आमच्या घराण्यात दत्त उपासना अनेक पिढ्या चालत आलेली आहे. "मला दत्ताने तर नाही सोबत केली ? मी इतका भाग्यवान आहे का ?आणि मी करंटा त्याला ओळखू शकलो नाही. "असे तर नसेल झाले ?की मी घाबरू नये म्हणून माझ्या मनानेच एक आकृती निर्माण करून मला अाश्वस्त केले.*मला काही कळत नाही दत्तप्रभूच खरे काय ते जाणे*.

**लेखक:** प्रभाकर पटवर्धन

**ईमेल:** pvpdada@gmail.com

📖 ⌘ ✶

## कुठे असेल नागी? - सारिका उबाळे

कधीतरी आपसूकच मन दूर दूर चालत जातं. हरवलेल्या मैत्रिणी शोधत. खूप म्हणजे खूप म्हणजे खूप दूर निघून गेलेल्या.. बालवयातल्या. जात धर्म यांच्या पलिकडच्या.... मैत्रीणी.

बालपणात शिरलं की आलम साहब आजोबांच्या वाड्यातच धावत जातं मन.. त्याशिवाय पर्याय च नसतो काही!

शुभ्र कपडे पायजामा व नेहेरु शर्ट. तोंडाने काहीतरी नामस्मरण. मागे बांधलेले हात. हातातली जपमाळ. त्याचा रेशमी गोंडा.सगळ्या वाड्यातल्या लहान मुलांवर लक्ष ठेवत इकडून तिकडे फेऱ्या मारणारे अब्बा....

कारखान्यात इस्ततः पसरलेल्या मोठाल्या लाकडाच्या ओंडक्यांवर आम्ही नदी की पहाड खेळत असू.कधी मोठ्या ओंडक्यांच्या मागे लपणा छपणी (हा बालपणीचा शब्द) तर कधी नुस्तंच ओंडक्यावर गप्पा मारत बसायचो. एक एक ओंडका सहा सात महिने पडून राहायचा. आणि त्या वर अक्षरशः जीव जडायचा.

अचानक एखाद्या दिवशी मग तो कापण्यासाठी उचलून आरीजवळ अर्धवट अवस्थेत दिसायचा किंवा त्याचं अनेक फळ्यांमधे रुपांतर झालेलं दिसायचं..त्याची जागा सूनी सुनी वाटायची अन् उगाच गलबलून यायचं..

वाड्याच्या कोपऱ्यात एका छोट्याश्या झोपडीत नागी राहायची. आरीवर लाकूड कापणार्या हानूची मुलगी. हानू वाड्यात सगळ्यांची मेहनतीची कामे करुन द्यायचा..नेहेमी हसतमूख. एक छिद्र पडलेली बनियान आणि लुंगी. लाकूड कापत असेल तर एक रबरी एप्रन त्याच्या गळ्यात अडकवलेलं असायचं आणि एक मोठा पॅक बंद चष्मा. त्याला पूर्ण कपडे घातलेला कधी कोणी पाहिलाच नाही.

बारिक डोळे , पसरट नाक मजबूत बांधा...याउलट त्याची बायको नाजूक गोरी , कुरळ्या पिंगट केसांची , पिंगट डोळ्यांची. ती दिवसभर काम करायची. तिला मराठी बोलता येत नव्हतं. घरमालकाकडे काम करुन थोडंबहूत हिंदी यायचं.ती फेंट कलरचे नऊवारी पण खूप छोटे छोटे पातळ नेसायची.नागीशी ती गोंडी भाषेतच बोलायची.

नागी....... अशी घोगर्या आवाजातली हाक ऐकली की ,'बता...ल' म्हणत नागी पळतच जायची.

आईची तिला खूप काळजी वाटायची कारण दिवसभर कामाने थकलेला हनू संध्याकाळी दारु प्यायचा आणि बायकोला खूप मारायचा. मग सकाळी ती काही कामानिमित्त वाड्यात आली की तिचा चेहरा सुजलेला, कधी डोळा काळा निळा पडलेला तर कधी तिच्या गोऱ्या चेहेऱ्यावर व्रण दिसायचे. आईसगट वाड्यतल्या इतर बायकाही हळहळायच्या. अन् ती काहीच न समजून किंवा समजूनही असेल कसंनूसं हसत राहायची.

“किती मारलं गं माय कडू भाड्यानं" या वाक्यानं मलाही हनूमामाचा राग..राग.. यायचा.

संध्याकाळी स्वैपाकाच्या वेळी आई मला माझ्या छोट्या भावाला कडेवर द्यायची. "ह्या ला जरा न्ह्या गं घंटाभर कूठतरी"

हे ऐकून ऐकून तो सुध्दा" मला जरा न्ह्या ये कूटतरी घंटाभर" असं म्हणून दोन्ही हात पसरायचा वर्षा दिड वर्षाच्या छोट्या भावाला कडेवर घेऊन मग मी लाकडांवर नागीसोबत खेळायला जायचे. त्याला घेउन खेळता यायचं नाही. मग आम्ही गप्पा मारत त्याला संध्याकाळी आकाशात उडत परतणारे पोपट, कावळे, बगळे दाखवत बसायचो. वाड्याच्या मागेच मस्जिद होती. बहुधा पाच साडेपाचला अल्लाहू अकबर अल्ला... अशी आजान व्हायची.

त्यावेळी मी नागी, छोटा रेणू तर कधी कधी वाड्यातली इतर मराठी लहान मुलं आब्बाच्या घरात नमाज पडणाऱ्या अम्मी संजिदा, नाहेदा बाजी आणि घरातली इतर नोकर मंडळी कडे कितीतरी वेळ कुतूहलाने बघत बसायचो. त्याआधी

नळावर अम्मी वजू करायची ते बघायचो... आणि वेळ कसा जायचा ते कळायचंच नाही. त्यांना ते सगळं करताना बघणं हा एक सोहळा च होता. सरळ नाकाची , मोठ्या सुंदर डोळ्यांची गोरी अम्मी आणि त्यांच्या सुंदर पोरी कपाळापट्टी झाकून कानामागे सारलेली ओढणी अंगाभोवती गुंडाळून घ्यायच्या आणि डोळे मिटून, दोन्ही तळवे वर धरायच्या तेव्हा आम्हाला ही तस्संच करुन अल्लाकडे दुवा मागावीशी वाटायची. मग इकडे आमच्या अड्ड्यावर येऊन आम्ही ते करुन घ्यायचो.अगदी मनोभावे.नागी जवळपास माझ्या च वयाची पण खूप थोराड वाटायची.तिची आई गोरी असूनही नागी मात्र गोरी नव्हती. तिचं नाक थोराड आणि बसकं होतं. ओठ बाबरे होते.आणि केस कुरळे. ती त्या दोघांपेक्षाही खूपच वेगळी दिसायची. तिला रेणूला सांभाळायला खूप आवडायचं त्याला घेउन माझाही हात अवघडून जायचा.

मी तिला त्या बदल्यात आईने खिशात दिलेले काजू, भाजके शेंगदाणे, षटकोनी खारे बिस्किट द्यायचे. नागी अजूनच खूश व्हायची. शाळेची वेळ सोडून सकाळ संध्याकाळ सुट्टीचा दिवस मी नागी फरजाना, शमीम, निर्मला लाकडांमधे हुंदडत राहायचो.

लाकूड कापताना बघत तासंतास तिथे उभे राहायचो.अब्बाशी डिल करण्यासाठी बरीच लोकं येत राहायची. मग अब्बा आम्हाला 'अगे अम्मा चलो अंदर जाओ गे...'म्हणत ऑफिसात शिरायचे आणि आम्ही थेट त्यांच्या घरात. तिथे कधी बायका पान खात बसलेल्या असायच्या तर कधी तखत पोशावर बसून जेवत. मग आम्ही दुसऱ्या दरवाजातून धूम ठोकायचो. नवीन घर बांधाल्यावर त्या धावपळीत, उत्साहात इकडे राहायला आल्यावर काही दिवसात नागी कूठे , कशी हरवली कळलं नाही. त्यानंतर कधी कधी स्टेशन च्या रस्त्यावर अब्बाच्या वाड्यासोरुन जातांना ती भेटायची. मग आम्ही गप्पा करताना अम्मी चष्म्यातून बघत आवाज द्यायची..

'कोन है गे. ..?

काशिराम की बेटी की.....? सारिखा..?

अई इधर आ गे मा....कितनी बडी हो गयी गे....

मग मी अम्मीकडे नी नागी घराकडे धूम ठोकायची...

आता वाड्यात णा अम्मी आहे ना अब्बा ना नागी....

त्या लाकडाच्या ओंडक्याच्या रिकाम्या जागेसारखं सूनं सूनं सगळं.

गावी गेल्यावर कधीतरी तिकडून जातांना तसंच गलगलबलून येतं. . अजूनही...

कुठे असेल नागी...?

**लेखिका:** सारिका उबाळे (परळकर), अमरावती

**मोबाईल:** 9423649202

**ईमेल:** sarikaubale077@gmail.com

***(लेखिका कवयित्री आणि समुपदेशक आहेत)***

📖 ⌘ ✶

## असावे घरकुल आपुले छान - भरत उपासनी

माणसाच्या तीन मूलभूत गरजा पूर्वापार आपण मानत आलो आहोत. अन्न वस्त्र आणि निवारा. जगतांना माणसाला जी विविध स्वप्न पडतात त्यात एक स्वप्न असतं, 'असावे घरकुल आपुले छान!, छोटंसं का होईना पण स्वतःचं घरकुल असावं असं प्रत्येकालाच वाटतं पण जीवनाच्या या भाऊगर्दीत आणि प्रचंड जीवघेण्या स्पर्धेच्या युगात किती जणांचं हे स्वप्न साकार होतं ? आजही कितीतर जीव कुठेतरी झाडांच्या आडोशाला, एस टी स्टँडवर, मंदिराच्या आवारात, धर्मशाळेत, रेल्वे फलाटांवर, रिकाम्या मोठ्या पाईपांमध्ये, जागा मिळेल तिथे हे आपलं आयुष्य कंठत आहेत. विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर अशा पद्धतीने आजही जीवन जगणारी माणसं आहेत.

आमच्या लहानपणी आम्ही एक गाणं ऐकायचो ते असं, "उद्याच्या पोटाची काळजी कशाला ? आकाश पांघरू दगड उशाला, नाचतो डोंबारी गं नाचतो डोंबारी!" 'वर आभाळ खाली धरती' अशा प्रकारचं घरकुल जगणारीही माणसं या पृथ्वीतलावर आजही दिसतात. नटसम्राट नाटकातला अप्पासाहेब बेलवलकर जीवाच्या आकांताने टाहो फोडतो, "कुणी घर देता का घर!" तर दुसरीकडे 'जो जे वांछील तो ते लाहो' असं पसायदान मागणारा ज्ञानियांचा राजा म्हणतो,हे विश्वची माझे घर,ऐसी मती जयाची स्थिर,किंबहुना चराचर आपण की जाहला !"

चार काडक्या जमवून चुल बोळक्यांचा संसार चिमण्या कावळे सुद्धा मांडतात असं निर्धाराने बायकोला सांगून स्वतःचा घर संसार राष्ट्राच्या स्वातंत्र्यापुढे यःकश्चित मानणारे स्वातंत्र्यवीर सावरकर उदात्त ध्येय डोळ्यासमोर ठेवून जन्मठेपेची शिक्षा भोगतात आणि मृत्युंजय स्वातंत्र्यवीर ठरतात. तर दुसरीकडे समर्थ रामदास 'चिंता करतो विश्वाची' असं म्हणत आत्मकल्याणासाठी आणि राष्ट्रकल्याणासाठी घराचाच काय पण सगळ्या ऐहीकाचाच त्याग करतात. 'कि घेतले न व्रत हे आम्ही अंधतेने, लब्धप्रकाश करी हा इतिहास माने'अशा तऱ्हेचा उर्जःस्वल ध्येयवाद बाळगणाऱ्या माणसांची नव्हे नव्हे महामानवांची घरं तुमच्या आमच्या घरांपेक्षा कितीतरी विस्तीर्ण आणि व्यापक असतात. राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात, "सबके लिए खुला है, मंदिर यह हमारा" अशी त्या घरांची धारणा असते.

आधीच कपाळावर भरगच्च आठी,त्या तही मग आयहोलमधून पहायचं,नंतर मग फक्त तीस अंशातून दरवाजा उघडून 'साहेब घरात नाहीत' किंवा त्यापुढेही जाऊन 'अपॉइंटमेंट' घेतली होती का? अशा विविध सबबी पुढे करून जिवंत माणसाची दखलही न घेणारी घरंदारं महामानवांची नसतात किंवा असेही म्हणता येईल की, काळाच्या आणि दिशांच्या मर्यादा ओलांडून गेलेल्या परिणत प्रज्ञेच्या, या सगळ्या विश्वाचं आर्त काळजात उतरलेल्या महापुरुषांच्या घरांना दारंच नसतात. आणि असलीच तर ती सगळ्यांसाठी खुली असतात.

माणसांच्या वृत्तीनुसार त्यांच्या घरांच्या कल्पना सापेक्ष असतात. चिमण्या घरटं बांधतात, कावळे घरटी बांधतात,सुगरण किती सुबक खोपा तयार करते. अशा वेळी तिला विचारावंसं वाटतं, "सुगरणी, सांग मला खोपा कसा केला? इंजीनियरचा डिप्लोमा गं तुला कुणी दिला ? उत्कृष्ट वास्तूशिल्पज्ञासारखी प्रतिभा ह्या सुगरण पक्ष्याला निसर्गाने बहाल केल्यासारखी वाटते.

गाईम्हशींना गोठा असतो,घोड्यांना तबेला असतो,वाघ सिहांना गुंफा असते आणि ऋषीमुनींना गुंफा असते. माणसांना घर असतात आणि देवतांना देवघरं असतात. किंवा देवघरं ही छोटी मंदिरं असतात आणि मंदिरं म्हणजे मोठी देवघरं असतात. मुंगीपासून माणसांपर्यंत सर्वानाच हवं असतं एक छोटंसं घरकुल. स्वतःचं घर असलं म्हणजे 'भाड्याचं घर आणि खाली कर'हि वंचना संपते. घरादारांच्या रचनांमध्येसुद्धा कालानुसार फरक दिसतो. मुंगी वारूळ असंच का बांधते आणि सुगरण खोपा असाच का विणते तर तिची तशी गरज आणि आवड आहे म्हणून. हडप्पा संस्कृतीतीलं घरं कशी होती.इग्लू पिग्मी घरं अशीच का उभारतात,काही माणसं झोपडीत राहतात तर काही फार्म हाउस उभारतात. कोणाला फ्लॅट आवडतो तर कोणाला स्वतंत्र बंगला. कंपाऊंड, गेट, दरवाजे-खिडक्या, बाथ, किचन,

फर्निचर.वीज यंत्रणा,झुंबरं,शो पीस,वॉलपीस याबाबत प्रत्येक घराची रचना वेगळी असते कारण काय तर गरज आणि आवड. आपण आर्किटेक्चरला सांगतो त्यानुसार काही संकल्पचित्र, मॉडेल्स आर्किटेक्चर आपल्याला सुचवतो. आपण निवडतो त्यातलं एक संकल्प चित्र.अमुकच एक संकल्पचित्र आपण का निवडलं तर ते आपल्याला आवडलं म्हणून.तात्पर्य काय तर निवड ही आवडीशी संबधित असते. दहा मुली दाखवल्यानंतर त्या दहांमधून अमुकच एक मुलगी बायको म्हणून का निवडली तर ती आवडली म्हणूनच ना !

चित्रकलेमध्ये रंगसंगती विचारात घेतात. चांगल्या साजेलशा शोभेल अशा कपड्यांसाठी ड्रेस डिझायनरचा सल्ला घेतात. केशभूषा, वेशभूषा, रंगभूषा अशा वेगवेगळ्या प्रांतात वेगळे वेगळे सल्लागार असतात. त्याचप्रमाणे असलेल्या सामानाची मांडणी कशी करावी, कोणती रंगसंगती साधावी, याचा सल्ला इंटेरियर डेकोरेटर देतो.आता वास्तु कशाप्रकारे बांधली म्हणजे ती सुखाला, स्वास्थ्याला कारणीभूत होते याचा विचार करून  वास्तुशास्त्र नावाचे एक नवीन शास्त्र आता विकसित झाले आहे.

अभिजात संगीत, अभिजात चित्रकला, अभिजात वास्तुकला, अभिजात संस्कृत साहित्य,अभिजात शिल्पकला या सगळ्याच क्षेत्रात आणि प्रांतात भारतीय संस्कृती आघाडीवर होती,ह्याला इतिहास साक्षी आहे, पण आता सर्वच क्षेत्रात असं अभिजातपण किती शिल्लक आहे? अजिंठा-वेरूळ घारापुरी सारखी लेणी पुन्हा निर्माण झाली का?प्राचीन हेमाडपंती मंदिरांसारखं शिल्प पुन्हा निर्माण झाली का? लेण्यांमध्ये जे रंग आहेत तसेच रंग पुन्हा निर्माण करता आले का ?बालाजी मंदिर, कोल्हापूरची महालक्ष्मी मंदिर या सारखी रचना, शिल्पाकृती पुन्हा निर्माण झाली का ? दीपराग गाऊन तानसेनासारखे कोणी दिवे प्रज्वलित केले का? दीपराग आळवल्यानंतर अंगाचा दाह असे तो शांत करण्यासाठी मेघमल्हार राग आळवला जात असे. संगीतातलं असं अभिजात सामर्थ्य आज कुठे लोप पावलं आहे ? प्राचीन वारशाचे डोळे दिपवून टाकणारे प्रचंड वैभव जर पाहिले तर प्रत्येकच क्षेत्रात आमची पीछेहाट झाली आहे.

भर्तृहरिचं नीतिशतक आणि वात्सायनाचं कामसूत्र किंवा कामशतक दोघांनीही शंभर सूत्रं सांगितली. एकाने मुल्यशिक्षणाची तर एकाने निरामय सुदृढ आणि संपन्न अशा कामजीवनाची सूत्रं सांगितली. पतंजली मुनींनी  योगसूत्रं सांगितली. आणि निरामय शरीर आणि आत्मविकासाचा पाया घातला. इस्ट इज वेस्ट आणि वेस्ट इज बेस्ट असं आता आमच्याकडे काही मंडळींना वाटू लागलं आहे.आणि म्हणून कोणताही नवा विचार मांडला की टीकेचा पवित्रा घेतला जातो.ज्योतिष हे शास्त्र आहे की नाही? वास्तुशास्त्र हे शास्त्र की थोतांड ? मी नथुराम बोलतोय हे नाटक चालावं की बंद पाडावं ?अशा दोन्ही बाजूंनी टोकाची भूमिका घेणारे आपापली बाजू मांडत जातात. वैचारिक खळबळ किंवा फॅड निर्माण करतात. समाजातला जो सामान्य बहुजन समाज आहे त्याने ह्या दोन्ही बाजूंचा विचार करावा आणि स्वतःच्या विचारसरणीला जो विचार पटेल तो स्वीकारावा.मुठभर लोकांनी त्यांच्या विशिष्ट मतांचा शिक्का का म्हणून मारावा?

याद्दष्टीने विचार करता वास्तुशास्त्र म्हणून जो नवीन विचार मांडला जात आहे आहे तो ज्याला घर बांधायचं आहे त्याने स्वतःच स्वीकारायचा की नाकारायचा  हे ठरवावं.नवं ते सगळंच स्वीकारार्ह आणि जून ते सगळंच आक्षेपार्ह ही भूमिका चुकीची आहे. दोघांमधलं इष्ट ते  स्वीकारावं अनिष्ट ते नाकारावं. इष्टअनिष्टाचा मूल्यविवेक स्वतःच करावा.

वास्तुशास्त्र हे सौंदर्यशास्त्र आहे.घर चांगलं नीटनेटकं प्रसन्न असावं. सुबक असावं.वास्तू म्हणून आपण जो वेळ, पैसा, परिश्रम खर्च केला आहे तो सत्कारणी लागल्याचं समाधान मिळावं,यासाठी प्राचीन आणि नवीन अशा दोन्ही विचारांमधील सम्यक धागा पकडून वास्तुशास्त्राकडे सौंदर्यशास्त्र म्हणून पाहावं. आपणा सर्वांना लाभावं असं समाधान,थोडक्यात असावं घरकुल आपुलं छान!

**लेखक:** भरत उपासनी   **ईमेल:** br1957u@gmail.com

📖 ⌘ ✶

## आमची आजी म्हणायची! - श्रेया गोलिवडेकर

आताची चाळीशी पंचेचाळीशीत असलेल्या पिढीने आजी आजोबांच्या सहवासातील समृद्ध बालपण बऱ्यापैकी अनुभवलं आहे आई वडिलांबरोबर आजी आजोबांच्या संस्कारानी त्यांना घडवलं आहे त्यामुळंच आजच्या पिढीला काही सांगताना आमची आजी म्हणायची अस आपसूकच येत.....

आमची आजीही अशीच आम्ही तिला इन्नी म्हणायचो इन्नी म्हणजे वहिनीचा अपभ्रंश तर अशी ही आमची आजी किती साध्या साध्या गोष्टींमधून ती छान शिकवण द्यायची. ...

तरुण वयात आलेल्या आम्ही मुलामुलींनी कामात आळस केला ,चालढकल केली की म्हणायची लोखंड पिळायच वय तुमचं* आळस काय कामाचा किंवा म्हणायची जणू पंधरावा महिना लागलाय असं करताय तेव्हा हसू यायचं रागही यायचा पण सगळी काम मात्र पटापट उरकली जायची

कोणतीही सवय कितीदा सांगूनही जात नाही असं वाटलं तर म्हणायची पाचावं ते पन्नासाव म्हणजे आताच चांगल्या सवयी लागल्या तर त्या मोठेपणी हि राहतील अस...आपोआपच चांगल्या सवयी लागल्या

एखादं काम झाल्यावर समजा चुकून सगळा पसारा तिथंच राहिला तर म्हणायची आमच्या मुलीचं काम कसं जिथल्या तिथे. ..आपोआपच जिथंल्या तिथं वस्तू ठेवायची सवय लागली

आणि म्हणायची पडेल ते काम करायला हवं त्यामुळं हे माझं ते तुझं अशी कामाची विभागणी

न करता समोर आलेलं काम करून मोकळं व्हायचीही सवय लागली

कधी तिच्या बोलण्यावर लगेच आपण उत्तर दिलं काही म्हटलं तर म्हणायची ठिकरीवर थेंब पडू देत नाहीत अगदी त्यामुळं विचार करूनच बोलण्याची सवय लागली.

एखादया स्वभाव आवडणाऱ्या व्यक्तीबरोबर भिन्न स्वभाव असणाऱ्या व्यक्तीची जोडी असेल तर म्हणायची "सोन्याबरोबर चिंधीलाही जपलं पाहिजे"...असं सांगून सर्वांबरोबर जुळवून घ्यायची शिकवण दिली.

अशा खरतर अनेक छोट्या छोट्या गोष्टी.... लहानपणीचे संस्कारच स्वभाव घडवतात त्यासाठी घरातील मोठ्या व्यक्तींचं वागणं बोलणं खूप महत्त्वाचं ठरतं आंणि ज्यावेळी आपण त्या वयात त्या भूमिकेत जातो तेव्हा हे सगळं आठवतं लहानपणी त्या गोष्टींचे किंवा त्यांच्या वागण्या बोलण्याचे सगळेच अर्थ कळतात असं नाही पण कुठेतरी मनावर ते बिंबल जातं आणि आपल्या आयुष्याला एक चांगलं वळण लागतं.

**लेखिका:** श्रेया गोलिवडेकर, सातारा

**ईमेल:** shreyagoliwadekar10319@gmail.com

📖 ⌘ ✶

## एक वात्सल्यपूर्ण पिता - प्रिया निकुम

पिता: आज पहिल्यादांच त्याच्याविषयी मांडण्याचा प्रयत्न मनापासून करीत आहे. ही व्यक्ती माझ्या आयुष्यात सर्वात महत्त्वाची आहे. लहानपणापासून ते आत्तापर्यंत जीवनांतील जोडले गेलेले प्रत्येक तास, दिवस त्यांच्यांसोबत जास्त घालवल्यामुळे त्याचं महत्त्व हि त्यामुळे तेवढंच आहे.जर कोणी मला "तुला देव दिसला का?" हा प्रश्न विचारल्यास मी बोट त्याच्याकडेच दाखवून ' हो ' म्हणून सांगते.

आपल्याकडे मुलांना वाढविण्यांत ,त्यांच्यावर संस्कार करण्यांत आईचे नाव साहाजिक पुढे येते. आई नऊ महिने बाळाला पोटांत सांभाळत असली तरीसुध्दां जन्मांच्या आधीपासून ते आयुष्यभर जी व्यक्ती आपल्याला डोक्यांत ठेवते. तिचा मात्र आपल्याला कुठेतरी विसर पडतो. आपल्याला वाढवितांना ते काय काय खस्ता खातात. ह्यांबद्दल जर देखील उल्लेख कुठेही आढळतं नाही.

त्यांच्यामुळे आईशी एक वेगळी जवळकी निर्माण होऊन तिच्याबद्दल आपल्या मनांत एक वेगळीच भावना निर्माण झालेली असते. म्हणूनच, तिच्यासाठी काहीही आणि केव्हाही काहीपण करायला आपण नेहमीच तयार असतो. आणि मग लेख, कविता, वैगरें अश्या माध्यमांतून ते ऋण देखील आपण निश्चित व्यक्त करतो. तिने आपल्यासाठी घेतलेल्या कष्टाच्या जाणिवेतुन आपली ही कृती घडतं असते.

हे सगळं जरी खरं असलं तरीसुद्धा ह्या सगळ्यांत एका व्यक्तीला आपण आपल्यासाठी घेतलेल्या त्या अनेक कष्टाच्या जाणिवेचा उल्लेख करायला कुठेतरी मागे पडतो. त्यांच्याशी असलेलं नातं त्यांच्या असलेल्या दराऱ्यामुळे कदाचित मागे रहात असेल असं मला वाटत. ते नातं असतं आपलं आपल्या वडिलांशी. माणसाला ठेच लागल्यावर पटकन ओठांवर "आईssगं "असा शब्द बाहेर पडतो. मात्र मोठी वादळे,आव्हानं पेलतांनाचा प्रसंग आल्यावर बाबाच आठवतो. म्हणजे, अश्यावेळेस एका खंबीर माणसांची आपल्याला साथ असणे आवश्यक असते. त्यामुळेंच प्रत्येकांच्या आयुष्यात कोणत्याही रूपांत आपल्या वडिलांविषयीचे स्थान हे महत्त्वाचे असतेच.

कापसांच्या नाजुक धाग्यांनी विणुन नात्यांचे महावस्त्र तयार होईपर्यंत ते तुटणार नाही, फाटणार नाही याची दक्षता ही व्यक्ती घेत असते. कारण, ती ह्या कुंटुबातील प्रमुख असते. त्याच्यांच पंखाखांली व्यतित केलेले सर्व दिवस आयुष्यातील सर्वात सुंदर, सुरक्षित आणि स्मरणीय असतात. मोठे होऊन त्यांच्या वर्तुळातुन बाहेर पडायचं म्हटलं की, जगण्याची लढाई सुरु होते आणि तेव्हा जीवनाचा अर्थ उलगडायला लागतो. त्यांच्या असण्यांमुळेच नात्याला पूर्णत्व लाभते. वडिलांचा स्वभाव प्रसंगी रागीट व कणखर असल्याने आई इतकी जवळीक नसेल. पण,त्यांच्या इतकी काळजी घेणाऱ्या व्यक्तीला शोधुनही पर्याय सापडणार नाही. हे देखील तितकंच खरं!

असं म्हणतात की, बाकी कोणाशी नाही पण जगातल्या प्रत्येक वडिलांचं आपल्या मुलीशी एक वेगळंच नातं असत. जरी ते बोलून दाखवत नसले तरी सुध्दा काही भावना ह्या केवळ जाणायच्या असतात. कदाचित, ती मोठी झाल्यावर आपल्या काळजाचा तुकडा दुसऱ्याला सुपूर्त करायचा असतो. म्हणून एखाद्या वेळेला जगातील प्रत्येक वडील आपल्या मुलींबाबत फार हळवे असतात. आणि म्हणूनच,मुलीचं आणि वडिलांचं हे फार वेगळं असत.

माझ्या देखील वडिलांचं माझ्या आयुष्यात एक वेगळं स्थानं आहे.त्यांचं नावं आहे.बाबा" या दोन अक्षरांच मुल्य मापन केले तर आपल्यासमोर कितीही संपत्ती तसेच कोणतीही मोठी व्यक्ती आली तरी त्यांची या दोन अक्षरांच्या शब्दांशी तुलना करताच येणार नाही.माझे पप्पा त्याचं नावं. श्री. प्रकाश निकुम.

मुळचे नामपूरचे असून देखील त्यांनी त्यांच्या हुशारीच्या जोरांवर तेथुन बाहेर पडून आपली प्रगती केली. आज आंम्ही सगळे जण नाशिक येथे स्थायिक आहोत.आम्ही त्यांची तीन मुलं.गायत्री,सुरज,आणि मी (प्रिया). आम्हांला तिघांना काय

हवं न सांगता आधीचं समजत गेल्याने हट्ट काय ? हे कधी माहितीच नाहिये. माझ्या प्रत्येक निर्णयांत मी त्यांना सामील करून घेते. कोणताही कठीण प्रसंग आला तरी आपण खचायचं नाही. अशी त्यांची शिकवणं असते. त्याच्यांशी निगडीत अश्या काही आठवणी आहेत ज्यामुळे त्याचं आणि माझं नातं फार घट्ट आहे. घरांत मी भावंडांमध्ये सर्वात लहान असल्यामुळे शेंडेफळ म्हणून अगदी लाडाची आहे.

माझ्या वडिलांशी असलेल्या जवळीक मुळे आणि रोजच्या सहवासामुळे ते कुठे जरी लांब गेले तरीसुद्धा मला फार बैचेन व्हायला लागते. त्यांच्याविना हे घर खूप सुनंसुनं व्हायला होत. कारण काही का असेना ते दोघ घरात असली की, एक प्रकारचा धाक असतो. सगळी काम वेळच्यावेळी पूर्ण होत असतात. नाहीतर काय आज कोणी घरात नाही म्हणून काम सगळे रेगाळत पडून राहता. ते घरात नसले की घरातील जिवतपनणाच निघून गेल्यासारखा वाटत.खरंच गंमत असते, ते असतात तेव्हा नाही जाणवत पण, नसले की मात्र रोजचाच दिवस तो सुध्दा खूप मोठ्ठा मोठ्ठा वाटायला लागतो. ते गावावरून घरी आल्यावर वाटत की , किती दिवसाचा काळ लोटून गेलां त्यांच्या शिवाय ते दिवस मला खूप खायला उठतात.आज सासरी आल्यानंतर जास्त जाणवत कि,आपण त्यांना खूप त्रास दिला का?खूप हट्ट तर केले नाही ना ?पण, एवढं मात्र खर कि,त्यांच्या सहवासात ते दिवस खूप छान होते. ज्याप्रमाणे म्हणतात ना प्रत्येक बापाला आपली मुलगी एका राजकन्येपेक्षा कमी वाटत नाही. आणि त्याप्रमाणेच तो तिला ठेवतो सुद्धा. माझ्या वडिलांनी देखील मला खरच ठेवलंय. अजूनही!!!

म्हणूनच, त्यांच्याशी जोडल्या गेलेल्या नात्यामुळे देवाला सांगून ठेवते कीयेणाऱ्या प्रत्येक जन्मांत वडील म्हणून तेच लाभू दे कारण, ते माझं आभाळ आहे. त्यांच्या सान्निध्यात जग आहे, त्यांच्यामुळे बाप - मुलगी नात्याला अर्थ आहे!

**लेखिका:** प्रिया भांबुरे - निकुम, पुणे

**मोबाईल:** 9890048474

**ईमेल:** priyanikum@gmail.com

📖 ⌘ ✶

## सात लघु लेख - अभिलाषा देशपांडे

***( खाली दिलेले सर्व लेख माहितीपर आणि प्रासंगिक आहेत)***

### डायनोसॉँर:

हा प्राणी इतिहासपूर्व काळातील पृथ्वीवर सरपटणारे प्राणी व पक्षी होते. सुमारे १६ कोटी वर्षापूर्वी हे प्राण्यांचे पृथ्वीवर वर्चस्व होते. 9000 पेक्षा अधिक जाती अस्तित्वात असलेल्या डायनोसॉँर पैकी काहींमध्ये उडण्याचु क्षमता होती. काही शाकाहारी होते. तर काही मासांहारी ,काही द्विपादी होते तर काही चतुष्पाद. साधारणतः अवाढव्य आकारासाठी विख्यात असणाऱ्या डायनोसॉँर पेकी मानवी आकाराचे देखील अनेक प्राणी होते. सुमारे 6.5 कोटी वर्षापूर्वी घडलेल्या एका मोठ्या विनाशचक्रादरम्यान डायनोसॉँरचा अस्त झाला. हिंदी महासागरात अफ्रिका खंडाच्या पूर्व किना-याच्या लगत असलेल्या मादागावस्कर या प्रचंड बेटवजा देशांमध्ये आढळलेल्या डायनोसॉँरच्या पायांच्या अवशेषावरून डायनोसॉँर मासांहारी होते. या कल्पनेला पुष्टी मिळाली आहे. सुमारे 65 लक्ष वर्षापूर्वी पृथ्वीतलावर वावरणा-या डायनोसॉँर ना 'बालाऊर बोंडॉँक' शास्त्रीय संज्ञेने ओळखण्यात येते. पाय उचलून पावला मार्फत जोरदार प्रहार करण्याच्या क्षमता या जीवांमध्ये होती. डाव्या ,उजव्या पावलांच्या कडेला वक्राकार नख्या असल्याने भक्ष्याला रक्तबंबाळ करून खाणे शक्य होते. बालाऊर बोंडॉँक या प्रकारच्या डायनोसोरचे अवशेष उत्तर कॅँनडा,रोमेनिया , ऑस्ट्रिया या देशामध्ये सापडले आहेत. त्यामुळे त्याचा वावर शीत कटिबंधातील प्रदेशात होता असे मानले जाते. भक्ष्यांची संख्या कमी कमी होत राहिल्याने उपासमार, शिकार करण्यासाठी प्रचंड भटकंती इत्यादी कारणांमूळे डायनोसॉँर पृथ्वीवरून सुमारे 30 लक्ष वर्षापूर्वी नामशेष झाले असावेत असे मानणारे काही विचार प्रवाह आहेत. जीवाष्म - आशिया, अफ्रिका, युरोप व उत्तर अमेरिका खंडात सापडलेले जीवाश्म अंडी ,सांगाडे व इतरही माहिती यांचे आधारे इतिहासाचे दर्शन होते.

### राष्ट्रीय विज्ञान दिवस:

राष्ट्रीय विज्ञान दिवस 1928 मध्ये भारतीय भौतिक शास्त्रज्ञ सर चंद्र शेखर वेंकट रमन यांनी कलकत्ता येथे केलेल्या वैज्ञानिक आविष्कार म्हणजे 'रमण प्रभाव 'यांचा स्मृती दिन म्हणून 28 फेब्रुवारी रोजी संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. याचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांना विज्ञान व वैज्ञानिक उपक्रमाबद्दल आकर्षित व सतर्क करण्याचा आहे. विज्ञान दिनाचा इतिहास: भारतामध्ये 28 फेब्रु 1928 हा एक महान दिवस होता. ह्या दिवशी प्रसिद्ध भारतीय भौतिक शास्त्रज्ञ वेंकट रमण द्वारा भारतीय विज्ञान.क्षेत्रात एक आविष्कार पूर्ण झाला. भविष्यात हा कार्यक्रम नेहमी आठवणीत राहण्यासाठी 1986 मध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रचारासाठी राष्ट्रीय परिषदेव्दारे भारतात 28 फेबु हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून नामांकन करण्यात आले.

### वि.दा.सावकरांच्या पुण्यतिथी निमित्त:

1857 च्या स्वातंत्र्य समरानंतर सशस्त्र क्रांतीचा इतिहास वीर सावरकरांच्या नावाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडामध्ये त्यांनी दिलेली ती पूर्णाहूती त्यासाठी ज्या यातना सहन केल्या. त्याचा इतिहास जर साक्षीनसता तर पुढील क्रांती घडणे अशक्य होते. सावरकरांचे मुळचे घराणे कोकणचे परशूराम भूमीतील गुहागर विभागतले. छत्रपती शिवराय व बाजीरावांच्या काळात त्यातील काही घराणी देशावर आली. त्यातीलच सावारकर कुटूंब नाशिक जवळील भगूर येथे स्थिर झाले. सौं. राधाबाई यांनी 4 थ्या मुलाला जन्म दिला. परंतु यांना मातृप्रेमापासून वंचित रहावे लागले. लहानाचे मोठे होत असताना त्यांना लेखन व वक्तृत्व या गुणांचा छंद जडला. एकदा एका वक्तृत्व स्पर्धेची बातमी त्यांना उशिरा समजली. तरीही त्यांनी त्या स्पर्धेत भाग घेतला. परंतु भाषण करणाऱ्याचा यादीत त्यांचे नाव शेवटी आले. सर्व स्पर्धकांची भाषणे ऐकताना परिक्षक कंटाळले.अशावेळी सावरकर भाषणासाठी उभे झाले.

त्यांच्या बाणेदार विचारांनी ओघळल्या भाषेनी परिक्षकाचा कंटाळा कुठल्या कुठे गेला. त्या स्पर्धेत सावरकराना पहिला क्रमांक मिळाला. ते शिक्षणाकरिता पुढे इंग्लंडला गेले. तेथे शिक्षण चालू असताना देश कार्यात खंड पडू दिला नाही. वयाच्या १६व्या वर्षी सक्रिय राजकारणात ते भाग घेऊ लागले.इंग्लंड तेथे त्यांनी 'अभिनव भारत' ही क्रांती संघटना चालू केली. गावठी पिस्तुले तयार करून मित्रांकरवी 21 पिस्तुले भारतात पाठवली. 1857 सहस्त्र उठावाची माहिती व्हावी म्हणून "स्वातंत्र्य समर" हा जवळ जवळ 500 पृष्ठांचा मौलिक ग्रंथ लिहिला. त्यात हिंदू राष्ट्रांच्या दृष्टीकोनातून क्रांती युध्दांचे समीक्षण पूर्णपणे केलेले असल्याने याची परिणिती म्हणजे स्वांतंत्र्य यूध्द भडकवण्याची होती. अखेर 26 फेब्रुवारी 1966 रोजी ते काळाच्या पडद्याआड गेले. परंतु त्याच्या साहित्य, ग्रंथ लेख या रूपाने इतिहास कायम आहे, त्याची स्मृती आजही अजरामर आहे. "सागरा प्राण तळमळला" जय हिंद जय भारत!!

## मराठी राजभाषा दिन आणि त्याचे महत्त्व:

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी! जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी! धर्म ,पंथ,जात एक जाणतो मराठी! एवढया जगात माय मानतो मराठी ! 27 फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मराठी भाषा दिवस,मराठी भाषा दिन, मराठी भाषा गौरव दिन'आशा अनेक नावाने साजरा केला जातो. मराठी भाषेतील ज्येष्ठ साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्याने 'मराठी भाषा दिन' साजरा करण्याची सुरूवात करण्यात आली. कुसुमाग्रज यांचे मराठी साहित्यातील योगदान खरच अवर्णनीय असून आपण आणि भविष्यातील पिढीने मराठीचा वारसा पुढे चालवावा. म्हणून 'मराठी राजभाषा दिन 'साजरा करण्याची प्रथा सुरू करण्यात आली. याचे महत्त्व आपण पुढे पाहूयात. 27 फेब्रुवारी या दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्रात, जगभरात, देशभरात जिथे मराठी माणसे वास्तव्यास आहेत. तेथे मराठी राजभाषा दिन साजरा केला जातो. या दरम्यान विविध प्रकारचे मराठी नाटके चित्रपट, शास्त्रीय संगीत ,काव्य संमेलन, निबंध ,वक्तृत्व स्पर्धा व मराठी भाषेला उत्तम दिशा देण्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठी भाषा संवर्धनाची जबाबदारी आपलीच दरम्यान आज आपण आपल्या भाषेचा म्हणजे आपल्या मायबोलीचा त्याग करून इंग्रजी भाषेचा अवलंब करित आहोत. इंग्रजी ही काळाची गरज आहे. नक्कीच याबद्दल दुमत नाही, परंतु त्यासाठी आपण मराठीची कास सोडावी,हे मनाला पटणारे नाही. आज आपण आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिक्षणासाठी पाठवतो, मध्ये मराठी भाषा कशी अवघड आहे. व काना,मात्रा,उकार व वेलांटीने आम्ही कसे हैराण झालो आहोत, अशा आशयाचे विद्यार्थ्यांच्या व्हिडियो व्हॉटसअपवर व्हायरल करण्यात आले होते. मुलांना मराठीचे ज्ञान योग्य देण्याऐवजी आपण ते व्हिडियो एकमेकांना पाठवून मजा घेत होते. अशा रितीने मराठी भाषा संवर्धन होणार नाही. तरूण मुलांना इंग्रजी सोबत मराठी भाषेचे ज्ञान द्या. मुलांना मराठी शाळेत पाठवा ,जर इंग्रजी शाळेत गेला तर आपल्या विद्यार्थ्यांची दुसरी भाषा मराठी असावी. आपल्या भाषेतील साहित्य वाचायला प्रवृत्त करा हे करताना तुम्ही ते पहिले करित आहेत का ,हे पहा पहिले स्वतः करा नंतर दुसऱ्यामध्ये बदल करायला जा. म्हणून सुरूवात स्वतःच्या घरातून करा. माझ्या मराठी मातीचा , लावा ललाटास टिळा, हिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोर्यातील शिळा!!

## यशवंतराव चव्हाण जन्मदिवस:

यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे विभाजननंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि भारताचे पाचवे उपमुख्यमंत्री होते. परिचय- महाराष्ट्रातील सतारा जिल्ह्याच्या जन्म गाव देवराष्ट्र नावाचे गाव महान नेते मराठा शेतकरी कुटूंबात जन्मलेले 12 मार्च 1913 मध्ये मुंबई विद्यापीठातून राज्यशास्त्र व इतिहास मध्ये पदविधर झाले. आई विठाबाई त्यांचे बंधू ज्ञानदेव यांनी कष्ट करून घर चालवले. यशवंतराव या पुत्राने खूप शिकावे ही त्या माऊलीची इच्छा. यशवंतरावांनी शालेय जीवनात वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिके पटकावली. त्यांनी संगीत,भजन-किर्तन याचाही आस्वाद घेतला. ते येरवडा तुरुंगात असताना आचार्य भागवत एस.एम. जोशी यांच्यासारखे नेते तेथे होते. तुरुंगामध्ये राजकीय,सामाजिक विषयावर चर्चा होत. यशवंतरावांना त्या वयातच विचारवंत,साहित्यिक यांच्या ग्रंथासंबंधी आकर्षक वाटू लागले. त्यांनी

कोल्हापूरातील राजाराम महाविद्यालयामध्ये असताना त्यांचा व्यासंग वाढवला.ना.सी फडके यांच्यासारखे नामवंत ह्यांचे प्राध्यापक होते. ते बी.ए.एल.एल.बी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर 1942 मध्ये स्वातंत्र्य लढ्यात भूमिगत होऊन कार्य केले. 1947 नंतर मंत्री ,मुख्यमंत्री नंतर देशाचे संरक्षण मंत्री ,गृह,परराष्ट्र व वित्तमंत्री पदे सांभाळली. यशवंतराव चव्हाण यांनी 25 नोव्हेंबर 1984 जगाचा निरोप घेतला. यशवंतराव ब्राम्हण ब्राहणेतर चळवळी पासून अलिप्त राहिले. त्यांनी महाराष्ट्रातील सर्वांगिण विकासाला प्राधान्य दिले.

**कलावस्तू व अवशेषाचे संरक्षण:**

प्रस्तावना - वारा, ऊन, पाऊस ,धूळ,आग ,महापूर,भूकंप यासारख्या नैसर्गिक आपतीमूळे तसेच यूध्दासारख्या मानवनिर्मित आपतीमूळे विविध प्रकारची चित्रे,धातूचे व मातीचे पुतळे ,स्मारके धातूचे व मातीचे पुतळे ,स्मारके, मंदिर इत्यादी कला वस्तूचा नाश होतो.

ऐतिहासिक आढावा - नैसर्गिक व मानवनिर्मित आपतीमूळे इजिप्शियन ,बॅंबेलोनियन सम्राट हामुराबी याने पुरातन कलावस्तू जतन करण्याचा त्यावेळच्या रुढीस कायद्याचे स्वरूप दिले होते. इ.स.पूर्व 550 सुमारास होऊन गेलेल्या बेलशेंझर नावाच्या बॅंबेलोनियन राजाने पुरातन अवशेषांसाठी बांधलेले एक खास दालन आढळले. हवेतील धूळीचा विपरीत परिणाम वस्तूवर होतो. संरक्षण करिता वातानुकूल व्यवस्था असणे आवश्यक आहे.

पुरातन वस्तूंचा संग्रह व रक्षण- 18 व्या शतकापासून युरोपात पुरातन वस्तुंचा संग्रह व त्यांचे संरक्षण याविषयी विशेष आवड निर्माण झाली. अशा वस्तू नीट व सुरक्षित राखण्यासाठी संग्रहालये स्थापन झाली. तथापि 19 व्या शतकाच्या अखेरीस व 20 व्या शतकाच्या सुरूवातीस युरोपात आधूनिक व शास्त्रीय पध्दतीचा कार्यासाठी वापर सुरू झाला. पुरातन अवशेषाच्या स्थळी पध्दतशीर उत्खनने होऊ लागली. नाशिवंत वस्तू करिता उदा-बांधकाम.त्यांचे नकाशे तयार करुन,छायाचित्रे घेवून त्यांची नोंद करण्यात येऊ लागली.

भारतातील संरक्षण विषयक प्रयत्न - भारतावर झालेल्या परकीय स्वा-यांमध्ये अनेक ठिकाणाच्या कलावस्तूंची व अवशेष स्थानाची फार मोठी हानी झाली. तथापि त्या काळात अडचणीस तोंड देऊन ठिकठिकाणी सतत जिर्णोध्दाराची कार्ये झालेली आढळतात. अनेक राजे लोकांनी मंदिराचे जिर्णोध्दार करण्याकरिता तसेच त्यांची योग्यप्रकारे देखभाल व्हावी ,म्हणून काही उत्पन्न दान दिल्याचे उल्लेख तत्काळ लेखातून आढळतात. उदा-महाराष्ट्राचे मार्डी इ.स.१२१२) याशिवाय विजयनगरचा राजा कृष्ण देवराय (1509-1529) याने मंदिराच्या जिर्णोध्दाराकरिता एक निधी उभारला होता. या पुढे मोठे स्वरूप प्राप्त झाले असे विविध लेखातून आढळतात.

**मंगल पांडे: भारताचा आद्य क्रांतीकारक:**

1857 मध्ये भारताच्या 1ल्या स्वातंत्र्य चळवळीत एक महत्त्वाची भूमिका बजावणा-या भारतीय स्वातंत्र्य सैनिक होते. ते ईस्ट इंडिया कंपनीचे 34वे बंगाल इंफर्टीचे सैनिक होते. मंगल पांडेचा जन्म 19 जुलै 1927 ला झाला. उ. प्रदेशच्या 'बलिया' गावात झाला. त्यांच्या वडलांचे नाव दिवाकर पांडे होते. तसेच आईचे नाव अभैरानी होते. ज्यावेळी 1849साली त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात नोकरीस सुरुवात केली. त्यावेळी ते 22 वर्षाचे होते. हे बराकपुर सैन्य दलातील बंगालच्या 34 व्या बी.एन.आय तुकडीच्या 5व्या कंपनीत काम करत होते. एवढ्यात शेख पालटू नावाचा शिपाई मंगल पांडेच्या दिशेने येऊ लागला. तो आपल्या पलटनीतील असल्यामुळे तो आपल्याला मदत करायला येत आहे असे पांडेना वाटले. पण तसे नव्हते शेख पालटून पांडेना पाठिमागून विळखा घातला. पांडेनी तो सोडवला. भारत सरकारने 5 ऑक्टोबर 1984 रोजी पांडेची प्रतिमा असलेली टपाल टिकीटे जारी केली. व पांडे यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यावर हल्ला केला व नंतर त्यांना फाशी देण्यात आली. त्या जागेवर शहिद मंगल पांडे महाउद्यान नावाच्या एका पार्कची उभारणी बराकपुर येथे करण्यात आली आहे.

## कविता :गरिबीतील जीवन - सुवर्णा कांबळे

*संसाराचा गाडा ओढताना, मेटाकुटीला यावं लागतंय*
*रोजचं कष्ट करून सुद्धा, अर्धपोटी राहावं लागतंय*

*जीवनातील गरजेसाठी, राब राब राबाव लागतंय*
*गरिबीचा वणवा पाहून, आम्हा पोट जाळाव लागतंय*

*संकटाला तोंड देता , देत-होरपळून जावं लागतंय*
*दुःखाचे वेदना सोसताना, आसवात भिजावं लागतंय*

*पोराबळाच्या शिक्षणा साठी, सावकार शोधावा लागतोय*
*कर्ज परत करण्यासाठी, पार खचून जावं लागतंय*

*भावनेचा निचरा होताना, रडतच राहावं लागतंय*
*रडत असताना देखील, हसतच जगावं लागतंय*

*या गरिबीतील जीवनात, रखडत बसावं लागतंय*
*कोणीतरी एकच दिवस, गरिबीला पाहावं लागतंय*

*जीवनातील घडामोडीना, मनात साठवाव लागतंय*
*ते मन मोकळे करताना, कागद , पेन लागतंय*

**लेखिका:** सुवर्णा कांबळे

**पत्ता:** साई ओंकार सोसायटी, सेक्टर- 12, रुम नं- 25, कळंबोली

**मोबाईल:** 9960354673

**ईमेल:** Suvarnakamble474@gmail.com

📖 ⌘ ✶

## कविता :पोरी पदर तुझा सावर - सुवर्णा कांबळे

*पोरी पदर पदर तुझा सावर गं सावर! आलीस यौवनांच्या उंबरठ्यावर!*

*खळी तुझ्या गालावर, स्मित तुझ्या ओठावर,*
*दृष्ट लागेल रूपावर, पोरी पदर तुझा सावर ग सावर!*
*तोल तुझा आवर ग आवर ! जाशील वळणाच्या वाटेवर,*
*मऊ होईल तो रुळल्यावर, पोरी पदर तुझा सावर ग सावर!*

*नजर फिरव या जगावर! मायाजाल फसवेगिरी वर ,*
*जगू नको फसव्या आशेवर, पोरी पदर तुझा सावर ग सावर!*

*विश्वास ठेव ग मनावर! प्रेम कर तू जगण्यावर,*
*नौका येते ती किनाऱ्यावर, पोरी पदर तुझा सावर ग सावर!*

**लेखिका:** सुवर्णा कांबळे

📖 ⌘ ✶

## कविता :तू जीवनात आला आणि असं वाटलं - प्रिया निकुम

तू जीवनात आला आणि तेव्हा वाटलं ...

जीवन सगळं बदललं
तुझ्या आगमनात जरा जास्तच बहरलं
तुला पाहिल्यावर वाटलं
क्षणभर माझं हृदय हरवलं
पुढच्याच क्षणी मला ते
तुझ्या मनात दिसलं

तुझ्या येण्याने वाटलं
एक स्वप्न पूर्णत्वाला आलं
लाड पुरवायला हक्काचं कुणीतरी मिळालं

तुझ्या आगमनाने सुरु झाला
सोहळा नवीन आयुष्याचा
साजरा होईल प्रत्येक दिस
तुझ्या माझ्या नात्याचा

तुझ्या येण्याने सजीवता
मिळाली एका मूर्तीला
फुलाप्रमाणे नातसुद्धा
लागल बहरायला

तू जीवनात आल्यावर वाटलं
अनेक जन्मच प्रेम माझ्या नशिबी आलं

तुझ्या रूपात ते माझ्यापर्यंत पोहचलं

तुझ्या येण्याने ह्या उचकीशी
एक नवीन नातं जुळलं
तूच आठवण काढत असशील म्हणून
भेटण्यास मन तेव्हा तेव्हा आतुर झालं

तुझ्या सहवासात जाणवलं
सगळं आहे जगात
एक हक्काचं घर मिळालं
मला तुझ्या मनात

मला वाटलं तुझ्या रूपाने एक
तारा माझा झाला
कारण,माझी कविता ऐकून तो बघ
किती प्रेमाने गालात लाजला

तुझ्या येण्याने वाटलं
म्हातारपण देखील सुखात जाईल
काठीची गरज कशाला ?
जेव्हा तुझी सोबत राहील

तू आल्याने वाटलं सर्व क्षण मी जगले
आता श्वासाने थांबु का?
म्हटलं तरी आनंदाने म्हटले " हो "

तू जीवनात आल्याने माझ्या
डोळ्यातील अश्रूंची जागा संपली
कारण, तुझ्या हर्षेची कळी
माझ्या आयुष्यात उमलली

तू जीवनात आला तेव्हा
निसर्गापासून  ते पशु-  पक्षांपर्यंत
सर्वांनी तुझे निवासस्थानं विचारले
तेव्हा अभिमानाने मी प्रत्येकाला
बोट माझ्या हृदयाकडे दाखविले

म्हणूनच ; माझ्या प्रिया ,
आज एकाच सांगणे तुला,
"मरण जरी आलं तरी
ते ऐटीत असावं
फक्त इच्छा एवढीच
मी तुझ्या मिठीत रहावं .. ."

**(लेखिका:** प्रिया निकुम**)**

🕮 ⌘ ✶

# कविता संग्रह: शारदेय(भाग1)- कपिल नवले

**1. आठवण**

स्मरते जेव्हा आठवण तुझी
येतात त्या सर्व स्मृती मन:चक्षूसमोर

आपण सोबत घालवलेले ते क्षण
आपल्या त्या सर्व आठवणी

साद घालतात  मनात जेव्हा
असह्य होते जगणे तेव्हा

हवा हवासा वाटतोस तु
मला दिलेल्या नि:स्वार्थी प्रेमामुळे

एकत्र आपण यावे वाटते मला
त्या जुन्या आठवनी उजळवण्यासाठी

परत यावे वाटतात ते दिवस
आपण हसत खेळत घालवलेले

समजते मला
आता तू नाहीस म्हणुन

पण मन माझे

हे एकायला तयार होत नाही

सारखे वाटत असते मनाला माझ्या
तू इथेच आहेस म्हणुन

भेटशील पुन्हा केव्हातरी
रोज या आशेत रहातो मी

**2. कविता**

शब्दरुपी कविता ही
अक्षराच्या समुद्रातून

अर्थरुपी गाभ्यासह
गहन आशय घेऊन

आकर्षक रचना करुन
स्पष्ट विचार मांडून

कल्पनेचा मुक्तसंचार करुन
कवित्वाची कसोटी देऊन
रहावी स्मरणात टिकून

**३ स्वप्न असावित कशी**

स्वप्न असतात, आशा आकांक्षा पूर्ण करणारी

स्वप्न असतात, भावना पुलकित करणारी

स्वप्न असतात, सत्यात सहसा न घडणारी

स्वप्न असतात, भावविश्व निर्माण करणारी

स्वप्न असतात, दुरावलेल्यांना जवळ आणणारी

स्वप्न असतात, नव्या कल्पना मांडणारी

स्वप्न असतात, असाध्य गोष्टी साध्य होताना बघणारी

**लेखक:** कपिल नवले, औरंगाबाद

**मोबाईल:** 8459526141 / 8888893548

**ईमेल:** kapilnawale@yahoo.com

📖 ⌘ ✶

## चारोळी: दर्शन - सिद्धेश प्रभुगावकर

आलो मी तुज भेटाया गावाला,
पण झाले नाही तुझे दर्शन
वाट पाहूनी पाहूनी
आक्रंदूनी गेले मन

**लेखक:** सिद्धेश प्रभुगावकर

**ईमेल:** siddheshpg@gmail.com

📖 ⌘ ✶

## फिल्मी गॉगल: चोरीचा मामला - निमिष सोनार

एफ एम रेडिओवर एकदा सहज "एक लडकी को देखा तो ऐसा लगा" या गण्याचं रिमेक गाणं माझ्या ऐकण्यात आलं. त्यात "एक लडकी को देखा तो ऐसा लगा" यानंतर पुढे कोणती शब्दरचना ऐकायला मिळेल याबद्दल मी उत्सुक होतो. पूर्वीच्या शब्दांपेक्षा आणखी चांगलं काहीतरी असेल का किंवा त्या तोडीचं असेल असं वाटून पुढे ऐकल्यावर मला आत्यंतिक घोर निराशा झाली कारण "एक लडकी को देखा तो ऐसा लगा" नंतर अचानक, "तेणू साडे गल्ली विच्च, मेणू किंदा, तेरे नाल, चालिया बलिया, किंदा, कुडी नचंदी" असले शब्द ऐकायला मिळाले आणि दुधाची घट्ट बासुंदी पिता पिता अचानक कुणीतरी त्या बासुंदीत मोठमोठे मिठाचे पर्वत टाकून मला जबरदस्तीने प्यायला लावतोय असे वाटले. अचानक गाण्याची चव बिघडली. नुसतं जुन्या गाण्याचं कडवं वापरलं आहे, बाकी काही नाही. जुन्यात नवीन शब्द टाका रे बाबांनो पण त्यात काहीतरी थोडातरी कॉमन सेन्स असला पाहिजे ना?

मी गाणे किंवा चित्रपटांच्या रिमेकच्या विरोधात नाही, मात्र रिमेक करतांना सुद्धा थोडी तरी बुद्धी आणि सृजनशीलता वापरावी लागते, हे काही रिमेक वाल्यांना आजकाल कळत नाही. बरेचदा काही गाण्यांचे रिमेक हे ओरिजिनल गाण्यांइतकेच चांगले झाले आहेत किंवा त्याहीपेक्षा अधिक श्रवणीय झाल्याची उदाहरणी आहेत.

मला "आशिक बनाया आपने", "आज फिर तुम पे प्यार आया है", "आंख मारे लडका", "दिलबर दिलबर", "जाब कोई बात बिगड", "राबता", "हर किसीको नही मिलता", या सर्व गाण्याचं ओरिजिनल इतकंच रिमेक आवडलं आहे. मी फक्त ऑडिओबद्दल बोलतोय, व्हीडिओबद्दल बोलायचं तर तो संपूर्ण वेगळा विषय होईल. "दम मारो दम" चं रिमेक गाणं असंच फसलं होतं त्यावर ओरिजिनल वाली झीनत अमान चिडली होती. मात्र चित्रपटाची प्रसिद्धी मिळावी म्हणून काहीच बुद्धी न वापरता रिमेक गाणे बनवण्यात काहीच अर्थ नाही. रिमेक ऐकल्यावर ओरिजिनल गाण्यांचे कॉपीराईट वाले मालक रिमेकच्या सीडी वर दणादण डोके आपटून स्वतःची सृजनशीलता डोक्यातून घालवून बसत असतील.

अमिताभच्या डॉन चित्रपटाचा रिमेक करताना फरहान अख्तरने शेवट इतका बदलला आहे की डॉन चित्रपटाच्या मूळ कथानकाच्या उद्देशालाच सुरुंग लावला जातो पण त्यांनी तशी ट्विस्ट घेतली कारण त्यांना डॉन पार्ट 2 काढायचा होता. पण हा जो डॉन पार्ट २ होता, तो तर पार्ट 1 मधील फक्त काही व्यक्तिरेखा घेऊन एक स्वतंत्र कथा असलेला "चोरी वाला" चित्रपट होता ज्याचा तसा डॉन 1 शी डायरेक्ट संबंध नव्हता. डॉन 1 मधले सगळ्यात फसलेले रिमेक गाणे आहे, "खैके पान बनारस वाला". हे गाणे शाहरुखच्या डॉन मध्ये थायलंड मध्ये घडते. थायलंड मध्ये बनारसचं पान आणि त्यात प्रियंकाचा अति विचित्र डान्स! काय तो गाण्याचा रिमेक! मात्र इतर रिमेक गाणी चांगली झाली आहेत.

"चोरी वाला" चित्रपट म्हणजे "फास्ट अँड फ्युरियस 5" या चित्रपटासारखा ज्यात एखाद्या ठिकाणची कडक बंदोबस्तातली तिजोरी किंवा सोने किंवा हिरे एखादी चोर टोळी मिळून सुरक्षा भेदून चोरतात, जसा अभिषेक बच्चनचा "प्लेयर्स" होता. प्लेयर्स हा चित्रपट "द इटालियन जॉब" चा रिमेक होता ज्यात ते एका रेल्वेतील सोने त्या रेल्वेला आणखी एक समांतर रेल्वे चालवून लुटतात, तसेच आणखी चोरी वाला चित्रपट म्हणजे धूम2 ज्यात आपला हृतिक जेम्स बॉण्ड वाल्या हिरे चोरीच्या आयडिया वापरतो, म्हणजे हाही चित्रपट जेम्स बॉण्ड मुव्ही च्या आयडिया वापरून बनवलेला! जुना धर्मेंद्र चा शालिमार आठवतोय? तो पण आयडिया चोरलेला चोरपट!

सतत भुतांच्या मागे असलेल्या राम गोपाल वर्माला सुद्धा एकदा अचानक रिमेक काढायची बुद्धी झाली होती (आणि तोही शोलेचा) आणि नाव दिले "आग!" त्यात गब्बरची भूमिका अमिताभला दिली (आणि अमिताभने कशी काय स्वीकारली??) आणि चित्रपट एवढ्या जोरात आपटला की त्या आवाजाने अनेक सिनेमा मालकांचे कान बधिर झाले आणि राम गोपाल वर्मा पुन्हा भुतांच्या मागे लागला, पण आजकाल भुते सुद्धा त्यांचेवर नाराज आहेत. आजवर शोले

चित्रपटाचे सगळे रिमेक किंवा भ्रष्ट नकला फसल्या आहेत: धडाकेबाज (कवट्या महाकाल म्हणजे मराठीतला गब्बर), थरथराट, मेला, आग, शान, चायना गेट.

मुकेश भट सारखा दिग्दर्शक त्याही पुढे जातो. तो भुतांचे चित्रपट काढतो आणि त्यांचे सिक्वेल म्हणजे पुढचे भाग काढतो. तीन भाग झाल्यावर आणखी पहिल्याच भागाचा रिमेक बनवतो आणि विषेश म्हणजे ठराविक प्रेक्षकवर्गात हा रिमेक सुद्धा हिट होतो. बिपाशाचा "राज" सुपरहिट झाल्यावर त्याचे पुढचे दोन भाग विशेष चालले नाहीत पण "राज रिबूट" हा मला पहिल्या राजचा रिमेक मला मात्र आवडला (यात इम्रान हाश्मी होता, आणि परदेशातील नेत्रसुखद स्थळांचं चित्रीकरण होत) यात पहिल्या "राज"ची तीच कथा घेऊन पण त्याला इंटेलिजंट तडका मारून ट्विस्ट दिलेली होती ती मला फार आवडली.  1920, 1920 Retunrs, 1920 London, 1921 असे कालचक्र ही भट्ट मंडळी फिरवत राहतात, पुढे काही सुचेनासं झाला की मग तेच चक्र पुन्हा गोल फिरून पहिल्या भागाचा रिमेक. या १९२० वाल्या आणि इतर भूतपटांत  आणि त्यांच्या सिरीज मध्ये असलेले बहुतेक हिरो हे मख्ख चेहेऱ्याचे आणि चेहऱ्यावरची मख्खी न उडणारे का असतात हे मात्र न उलगडलेले कोडे आहे. कदाचित हिरोच्या ऍक्टिंगवर लक्ष देत बसण्यापेक्षा भूत, भीती आणि त्यातील हॉट हिरोईन्सची शारीरिक मिती हेच अशा चित्रपटाचे हिरो आहेत असं भट्ट मंडळींचा समज झालेला असतो आणि प्रेक्षकांनी तो खराही ठरवलेला असतो.

जुना शोले हा अतिशय सुपरहिट चित्रपट सुद्धा तीन ते चार हॉलिवूड चित्रपटांवरून बनवला आहे. बाजीगर (अ किस बिफोर डाईंग), डर (केप फियर) हे पण हॉलिवूड चित्रपटांचे रिमेक आहेत. बाजीगर मध्ये तर काजोलच्या हातातून टीव्ही वरची न्यूज बघतांना कपबशी ज्या पद्धतीने खाली फरशीवर पडते ती तो सिन अगदी तसाच्या तसा ओरिजिनल चित्रपटातला उचलला आहे.  इतकाच काय तर "प्यार तो होना ही था" हा सुद्धा फ्रेंच किस या हॉलिवूड चित्रपटाचा रिमेक आहे.

आणि अनेक जुनी प्रसिद्ध हिंदी गाणी ही हॉलिवूड गाण्यांवरून बिनधास्त चोरली आहेत म्हणजे त्यांची धून किंवा काही वाक्ये किंवा संपूर्ण गाणे सुद्धा! (ऑफिशियल रिमेक नाही) आणि तेही मूळ मालकांची परवानगी न घेता! पण त्यावेळेस इंटरनेट नसल्याने सामान्य प्रेक्षकांना त्याबद्दल काळात नव्हते. अनु मलिक ने इतरांच्याच नाही तर स्वतःच्याच गाण्यातून सुद्धा चोरी केली आहे. इष्क हुवा कैसे हुवा या गाण्यातील "ना मै जानू  ना तू जाने" या वाक्याची चाल त्याने त्याच्या स्वतःच्या बाजीगर मधल्या "ए मेरे हमसफर" या गाणयातील एका शिटीतून चोरली आहे (किंवा घेतली आहे असे म्हणूया फार तर). ताल साठी सुभाष घाई ने ए आर रेहमान ला घेतले पण तेव्हा अनु मलिक नाराज झाला होता. असं ऐकिवात आहे की "रमता जोगी" हे गाणं रहमान पेक्षा त्याने आणखी किती चांगल्या प्रकारे कंपोज केलं असतं हे सुभाष घाई ला ऐकवून दाखवलं होतं.

बरेचदा म्युझिशियन्स (संगीतकार) यांची एक विशिष्ट स्टाईल असते त्याद्वारे ते संगीत कुणाचे आहे हे लगेच ओळखू येते. पण त्यातही बरेचदा एकमेकांच्या स्टाईलची सुद्धा चोरी होतांना दिसतंय. ए आर रहमान इलायराजा टीम मधून बाहेर पडला पण त्याच्या म्युझिकवर इलायराजाची छाप जाणवते. फना मधल्या "चांद शिफारीश" या गाण्यावर तसेच परदेस मधल्या "दो दिल मिल रहे है, मगर चुपके चुपके" या गाण्यांवर रहमानची छाप जाणवते. लक्ष्मीकांत प्यारेलालच्या म्युझिक स्टाईलचा प्रभाव इस्माईल दरबार आणि त्याचा प्रभाव संजय लीला भन्साळीच्या म्युझिक वर आणि त्याचा प्रभाव कलंक मधल्या प्रीतमच्या म्युझिकवर जाणवतो. रहमानच्या स्टाईलचा प्रभाव संदीप चौटा वर सुद्धा जाणवतो आणि माझ्याअ मते अजय अतुल यांच्या म्युझिक वर पण जाणवतो. गजनीमधील रहमानच्या म्युझिक वर इतर संगीतकारांच्या प्रभाव जाणवतो. रहमान च्या लगान मधील म्युझिक वर लक्ष्मीकांत प्यारेलाल किंवा इस्माईल दरबारचा थोडा थोडा प्रभाव जाणवतो. असो. एकातून दुसरी लिंक ही अशी आठवत जाते. अर्थात हे माझे वैयक्तिक मत आहे. या प्रभावाबद्दल मतभेद असू शकतात आणि त्याचा मी आदर करतो.

तसेच सारख्या धाटणीच्या चित्रपटांची सुद्धा एक लाट येते. म्हणजे कथा बीज तेच फक्त हाताळणी वेगळी! अग्निसाक्षी (नाना, मनीषा) आणि दरार (जुही, अरबाज) आणि कुछ ना कहो (अभिषेक, अरबाज, ऐश्वर्या) आणि त्याच विषयावर आणखी बरेच; लिजंड ऑफ भगतसिंग आणि 23 मार्च शाहिद; बायोपिकची लाट; फॅमिली चित्रपटांची आणि लांबलचक नावे असलेल्या चित्रपटांची लाट जसे हम आपके है कौन, हम साथ साथ है, हम आपके दिल मे राहते है, हमारा दिल आपके पास है; कॉमेडीची लाट जसे हेराफेरी सिरीज, यावर पागल दिवाना सिरीज, क्या कुल है हम सिरीज, धमाल सिरीज; रामगोपाल वर्मा च्या "सत्या" नंतर क्राईम आणि अंडरवर्ल्ड चित्रपटांची लाट आली; बाहुबली नंतर ऐतिहासिक फँटसी चित्रपटांची लाट आली, हॉलिडे आणि बेबी नंतर दहशतवादावर आणि देशभक्तीवर आधारित चित्रपटांची लाट आली; "मर्डर" (मल्लिका शेरावत) नंतर हॉट चित्रपटांची लाट आली अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

आता सारख्या धाटणीचे काही गाणे बघू. बाजीगरचे टायटल साँग चे उदाहरण घेऊ. त्यातील काही वाक्ये बघा: "ओ मेरा चैन चुरा के, मेरी नींदें उड़ा के, खो न जाना किसी मोड़ पर, बाज़ीगर मैं बाज़ीगर...मुझको गलत ना समझना, मैं नहीं बादल आवारा!" म्हणजे यात प्रेमी प्रेमिकांना एकमेकांविषयी असलेल्या निष्ठेविषयी शंका किंवा भीती आहे. मग यानंतर अशाच धाटणीची अनेक गाणी लिहिली गेली. जसे "दिल को चुराके, अपना बनाके, धोका ना दूंगा व बेखबर, गॅम्बलर गॅम्बलर हा मै गॅम्बलर!", चुराके दिल मेरा गोरिया चली या गाण्यातील "किसी मोड़ पर मैं, तुमको पुकारूं, बहाना कोई बना तो ना लोगे!...नही बेवफ़ा तुम ये मुझको खबर है, बदलती रुतों से मगर मुझको डर है" वगैरे. लिहायला बसलं की खूप काही लिहिता येईल, खूप आठवत जातं. या लेखात आता इथेच थांबतो. पुन्हा पुढे भेट राहू आणि चित्रपटांतील असेच काही धागे पकडून फिल्मी गॉगल लावू!! लेख संपवता संपवता तुम्हाला डोक्याला खाद्य किंवा होमवर्क देतो. खाली दिलेल्या गाण्यांची ओरिजिनल गाणी तुम्ही शोधून काढा पाहू!

काही जुन्या गाण्यांची चोरीची उदाहरणे:

हा यही प्यार है, बिन तेरे दिल काही लागता नही

तीरछी टोपीवाले (त्रिदेव)

ऐ दिल है मुश्किल (देवानंद CID)

मिल गया (RD बर्मन हम किसींसे कमी नही)

मेरे रंग मे (मैने प्यार किया)

सून सून सून बरसात की धून (अनु मलिक, सर)

एक शरारत होणे को है (अनु मलिक, डुप्लिकेट)

कोई याहा नाचे नाचे (बप्पी लाहिरी, डिस्को डान्सर)

पहली बार मिले है (नदीम श्रवण, साजन)

जय माँ काली (राजेश रोशन, करणं अर्जुन)

📖 ⌘ ✶

## एक विचार: पाकीट - उदय जडिये

आपल्या हृदयाप्रमाणेच आपण आपलं पाकीट जपून ठेवत असतो,
पाकीटातील जुन्या- नव्या नोटा आपण खर्च करीत असतो.
अगदी तसंच हृदयातील जुन्या- नव्या आठवणी, अनुभव खर्च करायला काय हरकत आहे.
धकाधकीच्या जीवनात चार शब्द सांगणारा अपवादानेच आढळतो.

## एक विचार: वाढदिवस - उदय जडिये

खरोखरच एखाद्याला वाढदिवशी किंवा लग्नाच्या वाढदिवशी शुभेच्छा देण्यात किती आनंद आहे. त्या निमित्ताने आपल्याला त्या व्यक्तीची व तिच्या संदर्भातील अनेक गोष्टींची आठवण येते. त्या आठवणींमध्ये आपण आपल्या रोजच्या आयुष्यातील  ताणतणाव काही काळ तरी विसरतो. हे तर झाले दुसऱ्याच्या बाबतीत, पण आपल्या वाढदिवसाला जर आपल्याला कोणी शुभेच्छा दिल्या तर तोही आनंद वेगळाच असतो.

**लेखक:** उदय सुधाकर जडिये, पिंपरी, पुणे
**मोबाईल**: 9552626496
**ईमेल:** udayjadiye2006@rediffmail.com

## ग्राफिटी: अविनाश हळबे















व्यंगचित्रे: सिद्धेश देवधर





हे मी तयार केलेला नवं उपकरणं "खड्डे डिटेक्टर ". हा "खड्डे डिटेक्टर " असा गाडीला लावायचा . गाडी चालवताना जर हा हलला तर हॅन्डल जरा तिरका करायचा की तुमची गाडी खड्ड्यात जाण्यापासून वाचेल . पुढच्या आठवड्यात पेटंट साठी अप्लाय करतोय
वा वा !!! मस्त


अहो हेच ते 'अच्छे दिन'. पालिकेने खड्डे बुजवले नाहीत , पण खड्ड्यांची खोली सांगणारे बोर्ड तरी लावलेत.
15 cm
7 cm
4 cm


© www.siddheshcreations.blogspot.com
देवा, उन्हाळा असाच राहुदेरे बाबा आणखी थोडे दिवस या उन्हाळ्यात धंदा मस्त चालला आहे.
कधी एकदा पावसाळा सरु होतो अस झालंय. या उन्हाळ्यात कायबी धंदा होत न्हाय.. देवारे, पाऊस टाक आता , लई झाली गर्मी .
Vada
Pav
Bhaji
Tea

# त्रिरश्मी लेणी : फोटोग्राफ्स






26/10/2011 13:00


24 12 2006





वाचक मित्र मैत्रिणींनो

मराठी भाषेतील नवप्रतिभाशाली साहित्यिकांना वाचकांपर्यंत नेणे आणि जगभर विखुरलेल्या मराठी वाचकांना उत्तमोत्तम साहित्य उपलब्ध करून देणे. आजवर अनेकांनी हे काम केले. आजही अनेक संस्था व व्यक्ती हे काम करतात. बुक स्ट्रक आणि मराठी अर्थ या अशाच संस्था आहेत. त्यांनी चालवलेले आरंभ हे नियतकालिक विनामूल्य वितरित करण्याचे अधिकार त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला दिले आहेत. आणि ई साहित्य प्रतिष्ठान ते अधिकार आपल्या वाचकांना देत आहे.

आपण हे नियतकालिक वाचावे आणि आपल्या मित्र आप्तांना ते विनामूल्य द्यावे. तसेच आपल्याला यात काय आवडले व यात अजून कशा सुधारणा करता येतील तेही आम्हाला सांगा. आपल्याला यात भाग घ्यायचे आमंत्रण आम्ही देत आहोत.

आपण सर्वजण मिळून आपली समृद्ध मराठी भाषा अजून समृद्ध व आधुनिक करुया.

या अंकातील लेखनाचे सर्वाधिकार त्या त्या लेखकांचे/ कलाकारांचे आहेत. त्याचा इतर कुठेही वापर करण्यापुर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

धन्यवाद

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com